क्र. ४- प्रवास
५४३



# राष्ट्र जिज्ञासा

दि. घ. दातार

EFBK-0019002

सदर्भ
७८८६५ भू-प्रवास
११८०२ 3.7.73
४०३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 DEC

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

# राष्ट्र जिज्ञासा

REFBK 0019002
REFBK-0019002

दि. घ. दातार

★ लेखकः—
श्री. दि. घ. दातार
बी. ए. ( ऑनर्स ) एस्. टी. सी.
भिडेबाग, देवपूर,
धुळे २

★ प्रकाशकः—
श्री. ह. अ. भावे
डी. सी. ई. बी. ए. ( ऑनर्स )
सरिता प्रकाशन
'स्नेहदीप', सरस्वती हौसिंग सोसायटी
देवपूर, धुळें. २

★ मुद्रकः—
श्री. अरविंद दामोदर जोशी
नारायण प्रिन्टर्स, देवपूर, धुळें. २

★ चित्रकारः—
जनार्दन भानुदास उपासनी धुळें. १

★ मुखपृष्ठः—
रविउदय विजय फोटो लिथो
ऑफसेट वर्क्स प्रा. लि. मुंबई ७७.

मूल्य – सात रूपये

सरिता प्रकाशन
धुळे

# अनुक्रमणिका


- प्रस्तावना — श्री. ब. मा. जोग
- जिज्ञासूंसाठी दोन शब्द — लेखक

१ जगातील राष्ट्रांची वैशिष्टये १

२ राष्ट्र निर्मितीचे निकष ८

३ राष्ट्ररूप भारत १७

४ भारताचे राष्ट्रियत्व २४

५ भारतातील मुसलमान ३७

६ मुसलमानांचे भारतीयकरण ४९

७ राष्ट्रवाद आणि कम्युनिस्ट ६३

८ लोकशाही ( भारतीय स्वरुप) ७५

९ हिंदू जीवन ( पतन आणि उत्थान विचार ) ८९

परिशिष्ट — जगातील देश आणि त्यांची लोकसंख्या १०३


* * * * *

# प्रस्तावना

स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा होत असतानाच 'राष्ट्र जिज्ञासा' हें पुस्तक वाचकांसमोर येंत आहे हा मोठा चांगला योग आहे. आजचे स्वातंत्र्य हे नोकरशाहीने चालविलेले एक यंत्र आहे की काय अशी शंका येण्याइतपत नोकरशाहीची पकड घट्ट होत आहे. याचे कारण असे की स्वातंत्र्य हे राष्ट्राचे व्यक्तिमत्व संपन्न करण्याचे आवश्यक आणि प्रभावी साधन आहे ही जाणीव क्षीण झाली आहे. विद्यार्थ्यांपासून मंत्र्यापर्यंत ज्यांना ज्यांना थोडीफार संधी मिळत आहे ते बहुतेक सर्वजण स्वतःचाच उत्कर्ष करुन घेण्याच्या मागे लागलेले दिसतात.

अशा बिकट संक्रमणकालात श्री. दिनकरराव दातार यांनी जनतेला मार्गदर्शन करण्यास पुढें सरसावावे हे उचित होय. श्री. दातारांचा आणि माझा गेल्या दोन तपांचा परिचय आणि स्नेह आहे. खानदेशातील वनवासीमध्यें त्यांनी काम केले असून नगरपालिकेच्या राजकारणातही आपला प्रभाव गाजवला आहे. सतत कार्यरत असणें, अंथरुणावर रुग्ण म्हणून पडले असतानाही समाजकार्याचाच विचार करणे हा त्यांचा स्वभाव आहें. थोडक्यात म्हणजे, लेखन वाचन या दृष्टीने ते पंडित आहेतच. वृत्तपत्र व्यवसायातही त्यांची गती आहेच पण मुख्य म्हणजे ते क्रियावान् आहेत. यः क्रियावान् सः पंडितः या उक्तीप्रमाणेही ते पंडित आहेत. श्री दातार यांचा हा थोडाफारच पण अपरिहार्य परिचय या प्रस्तावनेत

करून देण्याचे कारण एवढेच की लेखकाचे जीवन आणि त्याचा अधिकार या गोष्टींची माहिती वाचकांना व्हावी.

कारण "राष्ट्र जिज्ञासा" सारख्या विषयावरील पुस्तक हे केवळ आराम खुर्चीत बसून लिहिण्यासारखे पुस्तक नाही. पुस्तकातील 'जगातील राष्ट्रांची वैशिष्टये', 'राष्ट्र-निर्मितीचे निकष' 'राष्ट्ररूप भारत' ही सुरुवातीची प्रकरणे वाचन, चिंतन, मनन यांची द्योतक असून पुढील 'भारतातील मुसलमान, मुसलमानांचे भारतीयकरण, 'लोकशाही,' 'हिंदू जीवन' वगैरे प्रकरणांना प्रत्यक्षातील सामाजिक अनुभवाचीही जोड आहे. दातार मुसलमान समाजाला भारतीय जीवनात आत्मसात करून घेण्यासाठी केवढी पथ्ये पाळली पाहिजेत हे हळुवारपणे सांगतानाच, हिंदूंनी स्वतःचे स्वार्थलोलुप जीवन बदलून देशोद्धारासाठी कसे पुढे आले पाहिजे हेही आवेशाने सांगतात. हिंदूंच्या आजच्या पतित आणि व्यक्तिकेंद्री जीवनाची बोच त्यांना सलत असतानाच भविष्य काळातील समृद्ध भारताचा प्रकाशही त्यांना सुखावत आहे. कार्यकर्त्याला वर्तमानातील दोष स्पष्टपणे दिसून त्याने भविष्यकाळ उज्ज्वल करण्याचा निकराने विचार केला पाहिजे. श्री. दातार हे नुसतेच लेखक नसून कृतिवंत लेखक आहेत आणि म्हणूनच ते स्वसमाजावर नुसती टीका करीत नाहीत, स्वसमाजाची नुसती बाजू घेत नाहीत तर स्वसमाजाचा भाग्योदय कसा होईल याचा वेध घेतात. त्यांच्या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील अशी मला खात्री आहे.

ब. ना. जोग

# जिज्ञासूंसाठी दोन शब्द

"राष्ट्र जिज्ञासा" या पुस्तकाची अनुक्रमणिका आपण चाळून पाहिल्यास असे लक्षात येईल कीं, त्यातील पहिल्या दोन प्रकरणात जगातील विविध राष्ट्रांच्या घडणीचा संदर्भ घेऊन. "राष्ट्र" या संज्ञेची व्याख्या निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि प्रकरण क्र. ३ ते ९ ही सात प्रकरणे "भारत राष्ट्रा संबंधी" सर्वकष विचार मांडण्यासाठी विषयवारीनें योजिली आहेत. प्रकरण १ व २ यामध्यें विविध राष्ट्रांच्या इतिहासाचे, भूगोलाचे, धर्म व संस्कृतींचे उल्लेख आलेले आहेत. मुळात अत्यंत व्यापक असलेला विषय थोडक्यात देणे भाग पडल्याने, जिज्ञासूंना तो थोडा किचकट वाटण्याचा संभव आहे. त्या प्रकरणांच्या तुलनेने "भारत राष्ट्रासंबंधींच्या चिंतनाची" प्रकरणें, त्यातील परिचित माहितीमुळें समजण्यास सुलभ वाटतील अशी आहेत.

पहिल्या दोन प्रकरणांतील चर्चेचा संबंध पुढील सात प्रकरणांत ठिकठिकाणी घेतलेला आहे. त्यामुळें प्रकरण ३ ते ९ चे वाचन आधी करुन नंतर प्रकरण १ व २ यांचे वाचन केले तरी चालण्यासारखे आहे. विशेषत: ज्यांचा या विषयाशी नवीन परिचय होत आहे अशांनी हा क्रम अनुसरल्यास त्यांना क्लिष्टता मुळीच जाणवणार नाही. ज्यांना या विषयाचा पूर्वपरिचय आहे,

असे वाचक, प्रकरणासांठी मी योजलेल्या क्रमाशी सहमत होतील अशी खात्री आहे.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जागतिक घडामोडी मोठ्या प्रमाणावर होऊन जगाचा चेहरा मोहरा पूर्णपणे बदलून गेला. जुना साम्राज्यवाद खिळखिळा झाला. अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. काहींचें तुकडे झाले. वैचारिक साम्राज्यवादाचा नव्यानें उदय झाला. नवे जागतिक सत्तागट तयार झालें. कांही नवी राष्ट्रे निर्माण झाली. राष्ट्राराष्ट्रातील आर्थिक व राजकीय संबंधांची जुळणी नव्या स्वरुपात होऊ लागली.

शास्त्रीय प्रगती व सुखोपभोगांच्या सोयी यामुळें जीवन-मूल्यांची फेर तपासणी सुरु झाली. धर्म, संस्कृति, तत्वज्ञान, आचारपद्धति, कला यांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून तपासले जाऊ लागलें. रेडिओ, सिनेमा आणि टेलिव्हिजन यांच्या माध्यमामुळे जगाचा तात्काळ व साक्षात् परिचय होऊ लागला. एकमेकांची जीवनमूल्ये ताडून पहाणे सर्वसामान्य जनतेलाहि शक्य झाले.

आपला भारत देश म्हणजे तत्वज्ञान, धर्म, संस्कृती वाङ्मय यांचे स्वयंभू भांडार! परंतु पारतंत्र्यामुळें हे भांडार अंधारात गडप झालें होते. स्वातंत्र्य सूर्याच्या प्रकाशामुळें हें भांडार आता उजेडात आणणें शक्य झालें आहे. राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रियत्व यांच्या व्याख्या भारतीय

राष्ट्रवादाच्या संदर्भात करण्यासाठी भारतीय विचार परंपरेचा मागोवा घेणेंच इष्ट आहे. सृष्टीच्या संपूर्ण पसाऱ्याकडे पाहण्याचा एक स्वतंत्र दृष्टिकोन भारतीय विचार परंपरेत आहे. आधुनिक विज्ञानाच्या दृष्टिकोनाशी तो पूर्णपणे जुळणारा तर आहेच; शिवाय भौतिक सृष्टीच्या संवेदने पलिकडे असणाऱ्या सूक्ष्म आत्मिक शक्तीचा शोध घेण्याचाहि प्रयत्न भारतीय विचारसरणीने केला आहे. त्यमुळे भारतीय विचारांना संकुचिततेच्या मर्यादा पडलेल्या नाहीत. भारतीय राष्ट्रवादाचा विचार करतांनाहि ठोकळेबाज व्याख्या अपुऱ्या पडतात ( Dogmatic views ) असे आढळून येते. त्यमुळे केवळ व्याख्यांचे निकष लावण्याऐवजी वस्तुस्थितीचा आधार घेऊन व्याख्यांचा विचार या पुस्तकात केला आहे.

आग्रही आणि ठोकळेबाज सिद्धांताच्या चौकटी निर्माण केल्याने जगांतील राष्ट्राराष्ट्रांत सामंजस्य निर्माण होणें कठीण होऊन बसले आहे भारतीय दृष्टिकोन जगाने स्वीकारल्यास असे सामंजस्य निर्माण होणे फारसे कठीण पडणार नाही अशी माझी धारणा आहे. माझ्या अल्पमतीप्रमाणे त्या दृष्टिकोनाची चर्चा मी येथें केली आहे. तिला विचारवंतांचा प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा आहे.

दि. ग. दातार

७९६९५ भू.प्र
५७३ २.२.७३.
१६००२

प्रकरण १ ले

# जगातील राष्ट्रांची वैशिष्टये

जगाच्या नकाशावर आज लहान, मोठी मिळून सुमारे १६० राष्ट्रे आहेत. राजकीय कारणाने किंवा भौगोलिक परिस्थितीमुळे काही अत्यंत कमी लोकसंख्येची राष्ट्रेहि स्वतंत्रपणे नकाशात दिसत आहेत. परंतु राष्ट्र म्हणजे काय याचा नीट विचार करून राष्ट्रनिर्मितीच्या जगन्मान्य कसोट्या लावल्यास काही राष्ट्रे त्या कसोट्यांमुळे समान भूमिकेवर येतील. त्या संबंधीचा विचार पुढे करू.

हजारो वर्षांच्या इतिहासात बहुतेक सर्वच राष्ट्रात मोठमोठ्या उलथापालथी झाल्या आहेत. त्या सर्वांचा इतिहास येथे देता येणार नाही. आज विसाव्या शतकाच्या ( खिस्ती सनानुसार ) उत्तरार्धात स्वतःच्या वैशिष्ट्याने जी राष्ट्रे जगापुढे आली आहेत त्यांचाच उल्लेख येथे केला आहे. अनेक अरब राष्ट्रे, दक्षिण अमेरिका व आफ्रिकेतील राष्ट्रे यामधून अंतर्गत राज्यक्रांत्या होत आहेत. बलाढ्य राष्ट्रांचाहि त्यामागे

हात असतो. त्या राज्यक्रांत्यांचा विचार येथे करण्याचा विचार नाही. शासन संस्थेत कितीही बदल झाले तरी राष्ट्रीय स्वभावात फारसा बदल होत नाही. राष्ट्र आपल्या मूळ स्वभावानुसार पुन्हा बदल करून घेतेच. राज्यसंस्थेला न जुमानणारा हा राष्ट्रीय स्वभाव म्हणजे काय किंवा थोडक्यात म्हणजे राष्ट्र म्हणजे काय याचा विचार प्रथम करू. राष्ट्रासंबंधीचा विचार ध्यानात आला कीं त्या त्या राष्ट्रांच्या इतिहासांनी पूर्वी कोणकोणती वळणे घेतली व पुढेही ती राष्ट्रे कोणत्या मार्गाने जातील याचा अंदाज बांधणे शक्य होते. राष्ट्राची उन्नती किंवा अवनती कोणत्या मार्गाने होते याचाही बोध राष्ट्राच्या घडणीवरून घेता येतो.

जगाच्या पाठीवर आज जी राष्ट्रे आहेत त्या राष्ट्रांपैकी काही राष्ट्रे आज प्रत्यक्ष वैभवशाली जीवन जगत आहेत. काही राष्ट्रे नव्यानेच निर्माण झाली आहेत. त्यांना अद्याप आपल्या राष्ट्राचा विकास करण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. आफ्रिका खंडात अशा नवोदित राष्ट्रांची संख्या बरीच आहे. आपल्या शेजारी "बांगला देश" हे नवे राष्ट्र उदयाला आले आहे.

जर्मनी, जपान, इटली ही राष्ट्रे अशी आहेत की त्यांनी प्राप्त केलेले वैभव दुसऱ्या महायुद्धात पूर्णपणे नष्ट झाले. इंग्लंड आणि फ्रान्स यांची कथा वेगळी आहे. या राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात मोठमोठी साम्राज्ये निर्माण करून स्वतःचे वैभव वाढविले होते परंतु जागतिक परिस्थितीच्या रेटयामुळे त्यांना ही साम्राज्ये मोडून टाकावी लागल्याने ती राष्ट्रे इतर सामान्य राष्ट्रांच्या ओळीला येऊन बसली आहेत.

पोर्तुगाल व स्पेन या राष्ट्रांचे उदाहरण मोठे चमत्कारिक आहे. या राष्ट्रांची आफ्रिका, दक्षिण अमेरिका व आशिया खंडात मोठमोठी साम्राज्ये होती व अद्यापही काही प्रदेशावर त्यांची राज्ये आहेत. परंतु साम्राज्यातील राष्ट्रांची लूट करूनहि या राष्ट्रांना स्वतःचे वैभव वाढविता आलेले नाही. अरब व तुर्क या राष्ट्रांचेहि असेच उदाहरण इतिहासात आहे. त्यांची साम्राज्ये युरोप, आफ्रिका व आशिया खंडाच्या विस्तृत भागात पसरलेली होती परतु साम्राज्यातून केलेल्या लुटीतून स्वतःची राष्ट्रे वैभवाला नेण्याचे मात्र अरब व तुर्क यांना जमले नाही.

चीन व भारत या दोन राष्ट्रांना जगातील अत्यंत प्राचीन राष्ट्रे समजण्यांत येते या दोन राष्ट्रांच्या जोडीला पूर्वी ग्रीक, इराणी आणि रोमन लोकांची राष्ट्रेंहि होती. परंतु भारत व चीन यांनी आपला सांस्कृतिक वारसा जतन करून ठेवला तसा ग्रीक, रोमन, इराणी, असीरियन किंवा मोगल लोकांना ठेवता न आल्याने त्यांची राष्ट्रे आता इतिहासजमा झाली आहेत. चीनमध्ये कम्युनिस्टांची राजवट आल्यानंतर तेथील राज्यकर्त्यांनी आपला जुना इतिहास, धर्म व परंपरा यांचे नाते तोडण्याचा प्रयत्न चालविला आहे तसेच भारतातहि कॉंग्रेसी राज्यकर्त्यांनी भारताचा इतिहास, धर्म, संस्कृति, परंपरा आदींना गौण लेखण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. असे असले तरी राष्ट्रीय स्वभाव बदलणे अल्पकाळात शक्य नसल्याने अद्यापही दोन्ही राष्ट्रे आपआपल्या स्वभावधर्मानुसारच वर्तणूक करीत आहेत.

या दोनही राष्ट्रांना प्राचीन काळापासून आक्रमकांशी झगडा करून आपले राष्ट्रीय अस्तित्व टिकवावे लागलेले आहे. दोघांचाहि भौगोलिक आकार व लोकसंख्या प्रचंड असून भौतिक वैभवाचे दृष्टिने दोन्ही राष्ट्रे जवळजवळ समान अशा गरिबीच्या पातळीवर आहेत. सुमारे दीड हजार वर्षे दोन्ही देशात बौद्धमताचा प्रभाव असल्याने, सांस्कृतिक दृष्ट्याहि दोन्ही राष्ट्रात स्वाभाविक बंधुभाव वसत होता.

रशिया हे राष्ट्र भौतिक वैभवाच्या दृष्टिने आज बऱ्याच वरच्या पातळीवर आहे. गेल्या पन्नास वर्षांत या राष्ट्राने स्वावलंबनाने जीवनाच्या सर्व क्षेत्रात मोठी क्रांती घडवून विकास केला आहे. युरोप खंडातील बहुतेक सर्वच राष्ट्रे भौतिक दृष्ट्या संपन्नावस्थेला पोहोचलेली असली तरी रशियाचा प्रचंड भौगोलिक आकार व मोठी लोकसंख्या यामुळे रशियाच्या प्रगतीची दखल विशेषत्वाने घेतली जाते.

गेल्या दोनशे वर्षांत उदयाला आलेली अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया ही राष्ट्रे वैभवशाली बनण्याला त्यांची उद्योगशीलता कारणीभूत असली तरी आणखी काही घटकांनीही त्यांच्या वैभवास हातभार लावला आहे. या देशाजवळ प्रचंड भूभाग, विपुल खनिज व निसर्ग संपत्ती आणि बेताची

लोकसंख्या असल्याने त्यांचा विकास फारच झपाट्याने झाला. युरोपातून या तीन राष्ट्रांत जे लोक वसाहतीसाठी गेले त्यांनी स्थानिक लोकांना नामशेष करून किंवा गुलाम म्हणून त्यांचा वापर करून अत्यंत क्रूरपणाने स्वतःचा उत्कर्ष करून घेतला. अमेरिकेचे सारे वैभव तर आफ्रिकेतून पकडून आणलेल्या नीग्रो गुलामांच्या कष्टावर उभारले गेले आहे.

अगदी नव्याने म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या नकाशावर विराजमान होऊन वैभवाकडे चाललेले इस्रायल हे राष्ट्र इतर सर्व राष्ट्राहून अगदी वेगळ्याच वैशिष्ट्याने उदयास आले आहे.जॉर्डन नदीच्या काठावर अरबस्तानच्या वाळवंटात ज्यू नावाची एक जमात दोन हजार वर्षांपूर्वी नांदत होती. याच जमातीत अब्राहम आणि येशू हे दोन महापुरुष जन्माला आले. परंतु येशूच्या या ज्यू पुत्रांवर त्यानच निर्माण केलेल्या ख्रिश्चन धर्मीय अनुयायांनी आणि त्या नंतर अरबस्तानातच उदयाला आलेल्या इस्लाम धर्मीय अनुयायांनी अत्याचार सुरू केले. त्याचा परिणाम म्हणून लक्षावधी ज्यू लोकांना आपली मातृभूमी सोडून जगाच्या पाठीवर जेथे कोठे आसरा मिळाला तेथे जाऊन विस्कळित स्वरुपात रहावे लागले.

स्वतःची हिब्रू भाषा, रीतीरिवाज, पोषाख, हवामान या सर्वांना मुकलेली ज्यू कुटुंबे. दोन हजार वर्षे परांगदा अवस्थेत राहिली. अनेक देशात या परांगदा लोकांचा अनन्वित छळ झाला. पण राखेखाली दडपला गेलेला अग्नीचा कण ज्या प्रमाणे अनुकूल वारा आणि इंधन मिळताच पुन्हा प्रज्वलित होतो. त्याप्रमाणे ज्यू लोकांनी आपल्या अंतःकरणात जतन केलेले मातृभूमीच्या पुनर्प्राप्तीचे ध्येय दुसऱ्या महायुद्धानंतर साकार झाले.

एकमेकापासून सर्व दृष्टीने दूर गेलेले जगाच्या पाठीवरील ज्यू लोक इस्रायल (पॅलेस्टाइन ) च्या वाळवंटात आता एकत्र आले असून आपली भाषा, धर्म, आचारविचार याचे पुनरुज्जीवन घडवून त्यांनी आपले प्रबल राष्ट्र पुन्हा उभे केले आहे. राष्ट्रभक्तीच्या सामर्थ्याचा वापर करून वाळवंटाचे रूपांतर त्यांनी नंदनवनात करून दाखविण्याचा चमत्कार केला आहे.

जर्मनी व जपान यांचा ओझरता उल्लेख सुरुवातीस केला आहे. एक राष्ट्र पाश्चात्य तर दुसरे पौर्वात्य. दोघांत धर्म, भाषा, इतिहास परंपरा, हवामान इत्यादी बाबत कसलेही साम्य नाही. परंतु स्वावलंबनाने व उद्योगशीलतेने प्रयत्न करुन, स्वतःचे नष्ट झालेले वैभव केवळ वीस पंचवीस वर्षात पुन्हा प्राप्त करण्याबाबत या दोन्ही राष्ट्रांनी सारखाच पराक्रम करून दाखविला आहे. औद्योगिक प्रगतीचा या राष्ट्रांचा सध्याचाच वेग कायम राहिल्यास पुढील पंचवीस वर्षात ही राष्ट्रे अमेरिकेच्याही पुढे जातील असा तज्ञांचा अंदाज आहे. अमेरिकेला गेल्या दोनशे वर्षात युद्धाचा प्रसंग स्वतःचे भूमीवर आलेला नाही. त्यामुळे त्या राष्ट्रांची औद्योगिक प्रगती अखंड चालू राहिली. पण जर्मनी दोन महायुद्धात जवळ जवळ संपूर्ण उध्वस्त होऊनही फक्त एका पिढीत त्याने आपले वैभव पुन्हा उभे करुन सर्व जगाला आव्हान देण्याइतके सामर्थ्य प्राप्त करून घेतले. विशेष म्हणजे, परस्परविरुद्ध विचारसरणींच्या दोन राजकीय सत्तेखाली जर्मनीचे दोन भाग असूनही प्रगतीचे बाबतीत मात्र दोघेही जवळजवळ समान राहिले आहेत. राष्ट्रभक्तीतून उत्कर्ष साधलेल्या जर्मन राष्ट्राचे उदाहरण सर्व जगाने आदर्श मानावे असे आहे.

जपानवर दुसऱ्या महायुद्धाचे अखरीस अमेरिकेने अणुबॉम्बचा प्रयोग केल्याने ते राष्ट्रहि मोठ्या प्रमाणात उध्वस्त झाले होते. त्याचप्रमाणे विकासाचे बाबतीत अमेरिकेने जपानवर अनेक निर्बंध लादले होते. तरीहि तेथील राष्ट्रभक्त नागरिकांनी प्रचंड उद्योग करून पुन्हा आपले राष्ट्र वीस वर्षाचे आत संपन्न बनविले.

पूर्व युरोपातील युगोस्लाव्हिया हे राष्ट्रहि एका वेगळ्या वैशिष्ट्याने जगापुढे आले आहे. रशियाच्या पखाखाली राहून इतर शेजारची लहान लहान राष्ट्रे आपली प्रगती करून घेत असतांना, युगोस्लाव्हियाने मात्र रशियाचे वर्चस्व स्वीकारण्याचे नाकारून, एका बलाढ्य शक्तीशी विरोध पत्करला परंतु त्या विरोधामुळे स्वतःच्या राष्ट्राच्या प्रगतीत येणाऱ्या कोणत्याहि अडथळ्याला तेथील नागरिकांनी जुमानले नाही. युगोस्लाव्हियाचे उदाहरणापासून स्फूर्ती घेऊन पोलंड, हंगेरी, रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया यांनीही रशियन वर्चस्वातून मुक्त होण्याचा झगडा आपआपल्या कुवतीनुसार चालू ठेवला आहे.

अमेरिकेच्या सान्निध्यात असलेल्या क्युबा या लहानशा राष्ट्रानेही आपले स्वतंत्र अस्तित्व अमेरिकेशी विरोध पत्करुनहि कायम ठेविले आहे. दक्षिण अमेरिकेतील अनेक राष्ट्रे क्युबापासून प्रेरणा घेत आहेत.

# मोठ्या राष्ट्रांनी स्वतःच्या राजकीय स्वार्थाखातर काही राष्ट्रांचे तुकडे केले आहेत तर काहींना इच्छा नसताना एकत्र डांबून ठेवले आहे. उत्तर व दक्षिण कोरिया, उत्तर व दक्षिण व्हिएटनाम, पूर्व व पश्चिम जर्मनी, चीन व तैवान ही अशीच तुकडे झालेली राष्ट्रे आहेत. तर पाकिस्तान आणि बांगला देश, चीन व तिबेट यांना निष्कारण बळाने एकत्र डांबण्यात आले. या दोनहि प्रकारची राष्ट्रे आपणावर लादलेली बंधने झुगारून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. उत्तर व्हिएटनाम या छोट्या राष्ट्राने अमेरिकेसारख्या शेकडो पटीने प्रबल अशा राष्ट्राशी गेली वीस वर्षे चालविलेला झगडा व त्यात अमेरिकेचा होणारा पराभव, देशभक्तीच्या ठायी असणाऱ्या सामर्थ्याची साक्ष पटवीत आहे.

बांगला देशातील नागरिकांनी स्वतंत्र होण्यासाठी केलेले प्रयत्न हे सुद्धा राष्ट्रभक्तीच्या सामर्थ्याचीच साक्ष पटविणारे आहेत. पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांनी लष्कराच्या बळावर अत्याचार करून बांगला देशाच्या लाखो नागरिकांचे बळी घेतले व लक्षावधींना देशत्याग करण्यास भाग पाडले. तरी राष्ट्रप्रेमाची ज्योतबांगलाच्या नागरिकांच्या अंतःकरणात तेवत राहिली. आफ्रिकेतील अल्जीरिया व मोरोक्को या राष्ट्रांनीही फ्रेंचांशी असाच तीव्र झगडा करून स्वातंत्र्य मिळविले, इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारतालाहि असाच झगडा करावा लागला होता.

पोर्तुगीजांच्या जुलमाखाली भरडली गेलेली आफ्रिकेतील राष्ट्रे व रशियाच्या नियंत्रणाखालील पूर्व युरोपातील राष्ट्रेहि आज ना उद्या स्वतंत्र होतील. तिबेट, दक्षिण आफ्रिका इत्यादींनाहि त्यांचे स्वातंत्र्य पुन्हा प्राप्त होईल. कारण राष्ट्रभक्तीची आणि स्वातंत्र्याची ज्योत कधीच विझत नसते. त्या ज्योतीला सामर्थ्य लाभताच धुळीस मिळालेली

राष्ट्रेसुद्धा पुन्हा सतेज होऊन आपले वैभव पुन्हा वाढवू शकतात हाच हजारो वर्षांच्या इतिहासाचा धडा आहे.

---

* निरनिराळे देश व त्यांची लोकसंख्या सन १९६१ च्या शिरगणतीनुसार परिशिष्टात दिली आहेत. राजकारणाच्या सोयीनुसार एकाच देशाची अनेक राज्ये निर्माण केली गेली आहेत व कित्येक, बळाने एकत्र डांबण्यांत आली आहेत. संयुक्त राष्ट्र संघाने मान्यता दिल्याप्रमाणे ती परिशिष्टात घेतली आहेत.

★ ★ ★

प्रकरण २ रे

# राष्ट्र निर्मितीचे निकष

जगातील विविध राष्ट्रांच्या वैशिष्टयांचा विचार आपण केला. तो करताना आपण असे म्हटले कीं काही राष्ट्रांची घडण मोठ्या (बलिष्ट) राष्ट्रांच्या सोयीनुसार कृत्रिमरीत्या करण्यात आली आहे; तर कांहींना बळाने दुसऱ्या राष्ट्राच्या दावणीला डांबून ठेवले आहे. तशा राष्ट्रांचा उल्लेखहि आपण केला आहे. आता अशातऱ्हेने राष्ट्राची कृत्रिम घडण म्हणजे काय व नैसर्गिकरीत्या राष्ट्र कसे घडते ? याचा आपण विचार करु, म्हणजे आपल्या म्हणण्याचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

राष्ट्र आणि देश हे दोन्ही शब्द व्यवहारात समान अर्थाने वापरले जातात. देश म्हणजे भूमीचा सलग भाग. यावरुन एक गोष्ट सरळपणे दिसते की राष्ट्राचा संबंध भूमीशी निगडित आहे. इंग्लंड राष्ट्र, भारत राष्ट्र असे शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यासमोर त्या त्या राष्ट्राचा भौगोलिक नकाशा उभा राहतो. पर्वत, नद्या, समुद्र, वाळवंटे, अरण्ये

यांच्या योगाने भूमीच्या स्वाभाविक मर्यादा तयार होतात. या स्वाभाविक मर्यादांमुळे जगाचे शेकडो भूखंड आपोआपच निर्माण झाले आहेत. उदाहरणार्थ आपल्या देशाच्या शेजारचे लंका किंवा सिलोन हे राष्ट्र पहा. त्याच्या सर्व बाजूंनी समुद्र असल्याने त्याची क्षेत्रमर्यादा निश्चित झाली आहे. आपल्या भारतासंबंधीही प्राचीन ऋषींनी " पृथिव्यै समुद्र पर्यंता एकराट " म्हणजे समुद्राच्या मर्यादांनी निश्चित झालेले पृथ्वीचे क्षेत्र असा भारत हे एक राष्ट्र आहे. असाच उल्लेख केला आहे. जगातील बहुतेक सर्व राष्ट्रे अशा कोणत्याना कोणत्या मर्यादांनी एकसंध राहिलेली आहेत. जेथे भौगोलिक मर्यादा स्वाभाविकपणे नाहीत तेथे कृत्रिम भिंती बांधून किंवा कुंपण घालून मर्यादा ठरविण्यात आल्या. उदा. चीनच्या उत्तरेस असलेली भिंत, जर्मनी व फ्रान्स यांच्यामधील मॅजिनो व सिगफ्रीड या तटबंदी किंवा बर्लिन मधील भिंत या कृत्रिम सीमा आहेत.

कित्येक वेळा भौगोलिक सीमांच्या आतहि एकापेक्षा अधिक राष्ट्रे असलेली आढळतात. तर एखाद्या राष्ट्राचा विस्तार नैसर्गिक भौगोलिक सीमांच्याही पलिकडे गेलेला आढळतो. उदा. युरोपखंडातील बहुतेक राष्ट्रांना नैसर्गिक सीमा नसूनहि ती अलगपणे नांदताना दिसतात. इग्लंड व आयर्लंड ही दोन राष्ट्रेतर एकाच समुद्राने वेष्टिलेली व युरोपच्या मुख्य भूमीपासून अलग असूनहि, ती एकमेकांचे शत्रू असल्याप्रमाणे नांदतात. त्याच्या उलट पाकिस्तान या राष्ट्राचे दोन तुकडे एकमेकापासून पूर्ण अलग असूनहि त्यांचे एकराष्ट्र बनविले गेले होते. अर्थात पाकिस्तानची ही विचित्र घडण अनैसर्गिक असल्याने त्याची एकसंधता राहू शकली नाही हे आपण पहातच आहो. पण जपान. इंडोनेशिया ही राष्ट्रे पाहिली तर त्यांची वसाहत एकमेकांपासून अलग असलेल्या अनेक बेटांवर झाली असूनहि ती एकसंधपणें नांदत आहेत.

अशा तऱ्हेने भूखंड एक असूनहि अलगता असणें व भूखंड अनेक असूनही, राष्ट्र एकसंध असणे, असे परस्पर विरोधी दोन प्रकार राष्ट्र-घडणीत कां आढळून येतात याचा आपण विचार केल्यास असे आढळून येते की राष्ट्राच्या घडणीला आणखीही काही घटकांची आवश्यकता

असते. त्यापैकी एक म्हणजे विशिष्ट भूखंडात राहणाऱ्या लोकांची संस्कृति सुद्धा एक असावी लागते. इंग्लिश व आयरिश लोकांची संस्कृती एक नसल्याने त्यांना एकत्र नांदता येत नाही. युरोपातहि राष्ट्राराष्ट्राच्या संस्कृतीतील भिन्नत्वामुळेच एका भूखंडात राहूनहि एकमेकात दुरावा असलेला आढळतो. एकाच प्रकारच्या संस्कृतीचा विस्तार जवळजवळच्या परंतु निसर्गाने अलग केलेल्या बेटांसारख्या भूखंडावर असल्यास त्यांचे एक राष्ट्र जपान प्रमाणे एकसंध राहू शकते.

संस्कृतीचा विकास कसा होतो याचा विचार केल्यास तिचा संबंध राष्ट्राच्या आत्मशक्तीशी असल्याचे दिसून येते. व्यक्तीला जशी आत्मशक्ती असते त्याचप्रमाणे राष्ट्रालाहि आत्मशक्ती असते. एखादा समाज अनेक वर्षे ( म्हणजे अनेक शतके ) एका विशिष्ट भूभागात वसाहत करून राहूं लागला की त्या मानव समूहात एक स्वाभाविक आत्मशक्ती निर्माण होते. या आत्मशक्तीलाच चैतन्यशक्ति किंवा चिति असे नांव आहे. ही शक्ती त्या समूहाच्या सर्व हालचालीद्वारा व्यक्त होते. त्या मानवसमूहाच्या विकासासाठी ही आत्मशक्ती विविध संस्था निर्माण करते. त्या मानव समूहाचे आचार विचारांची घडण या आत्मशक्तीच्या स्वभावाला अनुसरून होते. त्या समूहाचे वाङमय विद्या, कला, संस्कार या सर्वांमधून त्या आत्मशक्तीचा जो आविष्कार होतो त्यालाच संस्कृति असे म्हणतात.

अमेरिका ( संयुक्त संस्थाने ) हे राष्ट्र गेल्या तीन साडेतीनशे वर्षात निर्माण झालेले आहे. प्रथम इंग्लंडमधून व नंतर युरोपच्या अनेक देशातून तेथे लोक वसाहतीस गेले एकत्र राहण्यामुळे व विशिष्ठ भूखंडाविषयी आत्मीयता निर्माण झाल्याने त्या विविध ठिकाणाहून आलेल्या लोकात एक नवीच आत्मशक्ती निर्माण झाली. या आत्मशक्तीचा आविष्कार विविध संस्थांद्वारे होत जाऊन आज अमेरिका हे विशिष्ठ अमेरिकन संस्कृतीने युक्त असे विकसित राष्ट्र जगासमोर उभे आहे

याच्या उलट उदाहरणेहि जगात आहेत. उदाहरणार्थ ग्रीक व रोमन

हे ज्या देशात राहात, तेथील सर्व नागरिक नष्ट झाले किंवा ते प्रदेश भूकंपाने गडप झाले असे नाही. पण तेथील म्हणजे ग्रीक व इटली या देशात प्राचीन काळी जी आत्मशक्ती निर्माण झाली होती ती काही कारणाने क्षीण झाली. ग्रीक व रोमन लोकांच्या संस्था व संस्कार नष्ट झाले त्यामुळे त्यांची संस्कृती नष्ट झाली. संस्कृतीचा आविष्कार संपल्यामुळे ती राष्ट्रे नष्ट झाली असे आपण म्हणतो. यहुदी किंवा ज्यू लोकांचे उदाहरण आपण पहिल्या प्रकरणात घेतलेच आहे, त्या लोकांची भूमी गेली होती. वाङ्मय लुप्तप्राय झाले होते. राज्यसंस्था नव्हती पण यहुद्यांची आत्मशक्ती कायम राहिली होती; त्यामुळे अनुकूल समय येताच ती पुन्हा राष्ट्ररुपाने उभी राहिली.

मनुष्यांमध्ये ज्याप्रमाणे काही व्यक्ती सत्वगुणप्रधान म्हणजे सात्विक मनोवृत्तीच्या असतात, तर काही तामस मनोवृत्तीच्या असतात त्याप्रमाणे विविध राष्ट्रांच्या आत्मशक्तीही सात्विक. राजस व तामस गुणांच्या असतात. असे होण्याला त्या राष्ट्राची भौगोलिक परिस्थिती म्हणजे ' प्रकृति ' ही कांही प्रमाणात कारणीभूत असते. त्याचप्रमाणे धार्मिक संस्कारांचाहि राष्ट्राच्या मनोवृत्तीच्या घडणीत मोठा वाटा असतो. भौगोलिक परिस्थितीची उदाहरणे म्हणून आपण अतिशीत, अतिउष्ण व अतिशय पर्जन्यमानाचे असे प्रदेश घेतल्यास काय आढळून येते ? अतिशीत प्रदेशातील एस्किमो अतिउष्ण प्रदेशातील अरब किंवा बदाउन आणि सतत वृष्टी असणाऱ्या प्रदेशातील निग्रो लोक यांना निसर्गाशी झगडून जिवंत राहण्याला इतके सामर्थ्य वापरावे लागते की, त्यांना अन्य प्रकारे आपला विकास घडविण्याचे सामर्थ्य उरतच नाही. व एकप्रकारचे तमोमय आलस्यपूर्ण जीवन ते कंठीत असतात तसेच दुसऱ्याच्या जीविता-बद्दलची बेफिकीरीहि त्यांच्या समूहात स्वाभाविकतयाच निर्माण होते.

या व्यतिरिक्त जगाचे स्वाभाविक विभाग पाहिल्यास यूरोप व उत्तर अमेरिका यांचा एक पट्टा, उत्तर आफ्रिका व पश्चिम आशियाचा दुसरा पट्टा, दक्षिण यूरोप व उत्तर आशिया यांच्या सरहद्दीवरील पट्टा, दक्षिण व पूर्व आशियाचा पट्टा असे भाग आढळून येतात. यापैकी यूरोप व

अमेरिकनांची भौतिक वैभवाची ओढ ही राजस गुणप्रधान आहे. अरब तुर्क, मोगल या दुसऱ्या व तिसऱ्या पट्ट्यात लुटारू व तामसी गुणाचा प्रभाव आहे. भारत ते जपान या चौथ्या पट्ट्यात सात्विक ( धार्मिक ) गुणांचा प्रभाव आहे. अर्थात वर उल्लेख केल्याप्रमाणे या पट्ट्यातील विविध राष्ट्रांवर भौगोलिक परिस्थितीप्रमाणे धर्ममतांच्या प्रभावाचाहि परिणाम झालेला आहे.

मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, हिंदु, यहुदी, पारशी इ. धर्ममते व त्यांच्या शाखोपशाखांच्या मतांप्रमाणे राष्ट्रांचे स्वभाव बदललेले दिसतात. गेल्या पाऊणशे वर्षांत उदयास आलेल्या कम्युनिझम नावाच्या धर्माचाहि प्रभाव विविध राष्ट्रांच्या प्रकृतीवर झालेला दिसतो. राष्ट्राची आत्मशक्ती विविध संस्थाद्वारा संस्कृतीचा जो आविष्कार करते त्यावर ज्या धर्माचा प्रभाव पडेल तसे तिचे सात्विक, तामस किंवा राजस गुणात रुपांतर होऊ शकते. पश्चिम आशियातील एकाच भौगोलिक पट्ट्यात मुसलमानी, ख्रिश्चन, यहुदी व पारशी या चार धर्मपंथांचा उदय झाला. या पंथांचा स्वीकार केलेले लोक एकाच वंशाचे असूनही त्यांच्या त्यांच्या धर्ममता-प्रमाणे त्यांचे स्वभाव घडले आहेत. यहुदी व ख्रिश्चन हे राजसगुणप्रधान आहेत. पारशी सात्विकगुणप्रधान आहेत. तर मुसलमानांवर तामसगुणांचा प्रभाव अधिक आहे. धर्मांच्या व पंथांच्या मतांना अनुसरून राष्ट्राची घडण होते. पाश्चात्य राष्ट्रांपैकी जी राष्ट्रे शास्त्रीय ज्ञानात पुढे गेली ती सर्व ख्रिश्चन धर्माच्या प्रॉटेस्टंट पंथाची होती व कॅथॉलिक पंथीयांनी मागाहून त्यांचे अनुकरण केले, असे आढळून येते.

कम्युनिझम या नव्या जडवादी धर्माचा उल्लेख वर केला आहे. ज्या ज्या राष्ट्रांनी या धर्ममताचा स्वीकार केला आहे. त्यांचाहि स्वभाव किंवा संस्कृती कांही प्रमाणात बदलल्याचे दिसून येते. चीन देशाचे उदाहरण या दृष्टिने मोठे लक्षणीय आहे. चीन देशाने बौद्ध मताचे प्राधान्य झुगारून कम्युनिझमचा स्वीकार करताच त्या राष्ट्राचा स्वभाव आक्रमक झाल्याचे आपण पहातच आहोत. राष्ट्राच्या संस्कृतीच्या घडणीत वंशाचाहि वाटा असतो असे पाश्चात्य पंडितांचें मत आहे. जर्मन, स्लाव्ह अँग्लो सॅक्सन

इत्यादी वंशाचे लोक वेगवेगळी राष्ट्रे उभी करुन युरोपात नांदत आहेत. विशेषत: जर्मन लोकांना आपल्या ( ज्याला ते शुद्ध आर्यवंश म्हणतात ) वंशाचा फारच अभिमान असल्याने तेथील विद्वानांनी जगातील राष्ट्रांच्या श्रेष्ट कनिष्टतेचे निकष वंशावरुनच ठरविले आहेत. पण त्यांच्या त्या मतानुसार भारताकडे पाहिल्यास आपणास काय दिसून येते? भारतात आर्य, द्रविड, मंगोल व नीग्रो ( अंदमानात ) या व इतरहि वंशाचे लोक रहात असूनहि ते स्वत:ला भारतीय म्हणवून घेण्यात अभिमान बाळगतात. याच्या उलट उदाहरण पश्चिम आशियातील अरब व यहुदी यांचे आपण घेतलेच आहे यावरुन धर्ममताचा प्रभाव हा वांशिक प्रभावाहून अधिक असतो असेच दिसून येते. भारतातहि विविध वंश असूनहि हिंदू धर्म मताने सर्वांना एकत्र जोडल्याचे दिसून येते. संस्कृतीच्या घडणीत धर्ममताला अधिक महत्व आहे. वंश या घटकाचा प्रभाव त्या मानाने अगदीच गौण आहे.

भाषा साम्यामुळेहि राष्ट्रे उभारली जातात असे काही पंडितांचे मत आहे. युरोपात वेगवेगळया भाषा बोलणारांची वेगळी वेगळी राष्ट्रे आहेत हे खरे आहे. पण युरोपातीलच एक भाषा जी इंग्लिश, ती बोलणारी अमेरिका, कॅनडा, आस्ट्रेलिया ही राष्ट्रे स्वतंत्रपणें उभी आहेत. तसेच स्पॅनिश भाषा बोलणारी दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रे स्पेनपासून स्वतंत्र झाली आहेत असे दिसते. याच्या उलट भारतात चौदा पंधरा अलग भाषा असूनहि भारताचे एक राष्ट्र अखंडपणे घडले आहे. अर्थात भारतात संस्कृतभाषेमुळे सर्व भाषांना सांधण्यात आल्याचा कोणी दावा करील तर ते बरोबरच आहे; परंतु संस्कृतचा फारच कमी संस्कार असलेल्या तामीळ भाषेचा अपवाद भारतात आहेच. त्यामुळे भाषासाम्य किंवा भाषाभेद याचा राष्ट्राच्या घडणीत भाग असला तरी तो वंश या घटका प्रमाणेच मर्यादित स्वरुपाचा आहे.

धर्माचा राष्ट्राच्या स्वभाव घडणीवर परिणाम होतो असे आपण वर म्हटले आहे; परंतु एकाच धर्मामुळे सर्व राष्ट्रांचे स्वभाव सारखे घडतात असे मात्र होत नाही. युरोपातील बहुतेक ख्रिश्चन धर्मीय असली तरी

त्या प्रत्येकाचा स्वभाव भिन्न आहे. सर्व अरब राष्ट्रे एका वंशाची व एका धर्माची असूनहि त्यांचा स्वभाव भिन्न बनला आहे. आशियातील बौद्ध धर्मीय राष्ट्रेहि एकमेकापासून स्वभावाने भिन्न आहेत. असे होण्याला कारण काय याचा जर आपण विचार केला तर असे आढळून येते की, प्रत्येक राष्ट्राचा इतिहास वेगळा असल्याने असे घडते. इतिहासामुळे शत्रुमित्र भाव तयार होतात. इतिहासाच्या ओघात राष्ट्रावर जे जय-पराजयाचे प्रसंग येतात त्याबद्दल समान भावना असणारेच त्या राष्ट्राचे घटक होतात. भारत व नेपाळ हे शेजार शेजारचे दोन देश, हिंदु धर्म मताचें आहेत. पण मुसलमान व इंग्रज यांच्या आक्रमणामुळे भारताचा इतिहास भिन्न बनला. भारत व नेपाळ यांचा भौगोलिक, सांस्कृतिक धार्मिक, वांशिक, भाषिक स्वभाव सारखा असूनहि इतिहास भिन्न असल्याने दोन वेगळी राष्ट्रे झाली आहेत. युरोप व पश्चिम आशियात ग्रीक, रोमन, जर्मन, तुर्क, अरब, मोंगल, इराणी, इंग्रज, फ्रेंच यांची साम्राज्ये इतिहासात होऊन गेली. त्यामुळे त्या त्या साम्राज्यानुसार राष्ट्रांचे स्वभाव घडत गेले व वेगवेगळा इतिहास असलेली लहानलहान राष्ट्रे तयार झाली. पूर्व आणि दक्षिण आशियातहि साम्राज्ये होती. पण त्यांनी हिंदू, बौद्ध अशा सात्विक धर्मांचा प्रसार हेच ध्येय ठेवल्याने राष्ट्रांचे विघटन फारसे झाले नाही. भारत, चीन, कोरिया हे मोठमोठे प्रदेश एकसंध राष्ट्ररुपाने नांदण्याचें श्रेय हिंदु व बौद्ध धर्मांकडे जाते.

गेल्या चारशे वर्षात युरोपातील विविध राष्ट्रांनी आफ्रिका व अमेरिका खंडात वेगवेगळ्या वसाहती स्थापन केल्या. सर्वांचा एकच ख्रिश्चन धर्म असूनहि तेथे अनेक राष्ट्रे निर्माण झाली आहेत. कारण ख्रिश्चन धर्माचे स्वरुपच राजस असल्याने निव्वळ धर्मप्रसार हे ध्येय न ठेवता त्या त्या राष्ट्रांनी व्यापारी दृष्टिने वसाहतींकडे पाहिले व आपणास लुटीला सोयीचे प्रदेश तोडून घेतले. वसाहतवादी राष्ट्रांच्या इतिहासा-नुसार वसाहतींचा इतिहासहि वेगळा बनला व ते प्रदेश स्वतंत्र राष्ट्रे म्हणून नांदू लागले.

संस्कृतीच्या विकासातील भौगोलिक पट्ट्यांच्या प्रभावाचा विचार करतांना दक्षिण आफ्रिका, दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलिया या भूखंडाचा समावेश आपण केला नाही. याचे कारण, गेल्या चारशे वर्षांत युरोपियन वसाहतवाल्यांनी त्या भागातील मूळची संस्कृति उध्वस्त करून वसाहती स्थापन केल्या. रेडइंडियन, नीग्रो इ. वंशातील लोकांच्या प्रसंगी कत्तली करून, त्यांना गुलाम बनवून किंवा त्यांचे धर्मांतर करून युरोपियनांनी आपले वर्चस्व स्थापिल्याने त्या मूळच्या संस्कृतींचा जगाच्या स्वभाव घडणीवर काय परिणाम झाला होता हे समजण्यास साधन उरलेले नाही. नि:पक्षपाती संशोधकांनी केलेल्या इतिहास संशोधनानुसार अमेरिकेत युरोपियनांच्या वसाहती होण्यापूर्वी तेथील स्थानीय लोकांची ( रेड इंडियन्सची) सुव्यवस्थित अशी मोठी साम्राज्ये होती. परंतु युरोपियनांनी तेथील लोकांच्या साधे भोळेपणाचा फायदा घेऊन व सुधारलेल्या शस्त्रास्त्रांचा वापर करून ती राज्ये नष्ट केली. आफ्रिका, अमेरिका व ऑस्ट्रेलियातील सर्व देश आता युरोपियनांच्या सांस्कृतिक प्रभावाखाली आले आहेत.

राष्ट्राच्या निर्मितीला, घडणीला आणि विकासाला जे घटक कारणीभूत होतात त्यांचा संकलित विचार केल्यास आपणास असे आढळून येते की त्यासाठी १) एक विवक्षित भूखंड २) समान संस्कृति ३) समान इतिहास यांची प्रामुख्याने जरुरी असते. याशिवाय ४) भौगोलिक (नैसर्गिक) परिस्थिती) ५) धर्म ६) भाषा हे घटकही राष्ट्राच्या सांस्कृतिक अविष्कारावर प्रभाव पाडतात. ७) "वंश" या घटकाचाहि काही राष्ट्रांच्या निर्मितीत वाटा असतो.

आता या सर्व कसोटयांचा विचार करून आपल्या भारतराष्ट्राची व त्याच्या खऱ्या राष्ट्रीयत्वाची चर्चा पुढे करूया. भारतीय दृष्टिकोन ठोकळेबाज नाही. त्यामुळे भारताचे राष्ट्रियत्वालाही ठोकळेबाज सिद्धांत

पुरेशा प्रमाणात लावता येत नाहीत. एकादी कसोटी पूर्णपणे लागू पडली नाही म्हणून राष्ट्रियत्व सिद्ध होत नाही, असा गणिती हिशोब या ठिकाणी चालणार नाही. तरीहि सर्वसामान्य कसोटयांच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवाद उणा नाही हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यास हरकत नसल्याने, ती चर्चा पुढील प्रकरणापासून केली आहे.

● ● ● ● ●

प्रकरण ३ रे

# राष्ट्ररूप भारत

भारताचे राष्ट्रियत्व इतके स्वयंभू आहे कीं ते सिद्ध करण्यासाठी बाह्य पुराव्यांची काही आवश्यकताच पडू नये. परंतु ज्यांना भारताची प्रतिमा डागाळण्यातच आपले हित आहे असे वाटते किंवा भारताच्या स्वयंभू राष्ट्रियत्वासंबधी ज्यांना संभ्रम निर्माण झाला आहे; असे लोक भारताच्या राष्ट्रियत्वाविषयी मुद्दाम शंका उपस्थित करतात. या शंकेखोरांचे म्हणणे असे की, भारतात अनेक वंशाचे लोक आहेत. त्यांच्या भिन्न भिन्न भाषा आहेत. त्यांची धर्ममते वेगवेगळी आहेत. त्यांच्या पोषाखात, खाण्यापिण्याच्या सवयीतहि फार अंतर आहे. त्यामुळे येथे अनेक छोटी छोटी राष्ट्रे असून हा प्रचंड उपखंड म्हणजे अनेक राष्ट्रांचा एक समूह आहे.

आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ हे लोक असा प्रचार करतात की, या देशात राहणारे बहुसंख्य लोक बाहेरून वसाहतीसाठी येथे

आलेले आहेत. उदा. मूळच्या आदिवासींचा पराभव करून येथे द्रविडांनी वसाहत केली. द्रविडांचा पूर्व भागात पराभव करून मंगोल वंशीय स्थायिक झाले. वायव्येकडून आलेल्या आर्यांनी द्रविडांना दक्षिणेकडे ढकलून उत्तरेत वसाहत केली. अलिकडे मुसलमानांनी येथे येऊन गेल्या हजार वर्षात आपली वसाहत केली. याशिवाय पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांनीही काही भाग व्यापले. अशा प्रकारे एकाद्या धर्मशाळेप्रमाणे एका मागून एक हे परके लोक येथे येऊन उतरले असल्याने, हा देश कोणाहि एका वंशाच्या मालकीचा नाही. इतिहासाचा मागोवा घेतांनाहि असे दिसून येते की, येथे एकछत्री राजसत्ताहि कधी नव्हती. असंख्य लहान मोठी गणराज्ये होती. या राज्यांचे शासक आपापसात सतत युद्ध करीत असत त्यांच्यात कधीहि एकोपा नव्हता. शिवाय या राज्यांच्या अंतर्गत जी प्रजा होती; तीहि अनेक उच्चनीच भेदभावामुळे आपसात सतत कलह करणारी होती. त्यांच्यात अनेक पंथ, संप्रदाय, परस्पर विरोधी तत्त्वज्ञाने असल्याने एकाद्या प्रमुखाचे मानण्याची त्यांची वृत्ती नव्हती. अशा या विस्कळित प्रजेला एका राष्ट्राचे घटक मानणे योग्य नसून, हे राष्ट्र घडण्याच्या अवस्थेला आता कदाचित सुरुवात होण्याची शक्यता आहे. ( It is a nation in the making )

अशातऱ्हेने भारतीय राष्ट्र जीवनाचीविकृत प्रतिमा उभी करण्याचे काम प्रथम इंग्रज इतिहासकारांनी केले इंग्रजांना भारतावर राज्य करावयाचे होते. त्यासाठी येथील समाजाला जितका जास्त दुर्बल आणि विस्कळित ठेवता येईल तेवढा ठेवण्याचे त्यांचे धोरण होते. येथील समाजात भेदभाव निर्माण होईल असे विचार पसरविणे हे त्यांच्या हिताचे होते. शिवाय, इंग्रज लोक हे सर्वच दृष्टिने आपल्यापेक्षा श्रेष्ठ, अशी भावना भारतीय समाजात निर्माण करून, त्यांच्यात हीनगंड तयार करणे इंग्रजांना जरूर वाटत होते. त्यासाठी त्यांनी " फोडा व झोडा आणि राज्य करा " या नीतीचा अवलंब केला. इंग्रजांनी अवलंबिलेल्या या धोरणानुसार भारतात हिंदूंची गणना ' बिगर मुस्लिम "

( Non Muslims ) अशी होऊ लागली. हिंदू मध्येहि शिख, जैन, बौद्ध आदिवासी असे वेगवेगळे भाग पाडून, हे वेगवेगळे धर्म आहेत असे दर्शविण्यात येऊ लागले. त्याचप्रमाणे द्रविड विरुद्ध आर्य असा झगडा लावून देण्यात आला. ब्राह्मण विरुद्ध अब्राह्मण, स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य असे पोटविभाग पाडून त्यांच्यात कलह लावून दिला गेला. इंग्रजांचा धर्म ख्रिश्चन असल्याने, ख्रिश्चन मिशनऱ्यांना सर्व सवलती देऊन हिंदूंची संख्या कमी करण्याचा सपाटा सुरू केला. त्याचप्रमाणें मुसलमानांना खास संरक्षण देऊन हिंदूवर अत्याचार करण्यास त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

या सर्व धोरणांचा इंग्रजांना योग्य असा परिणाम तर झालाच पण त्याहीपेक्षा अधिक परिणाम असा की, शाळा, कॉलेजे इत्यादि शिक्षण संस्थातून चुकीचा व कलहाला प्रोत्साहन देणारा इतिहास शिकविण्यात येऊ लागला. हा विकृत इतिहासच खरा इतिहास आहे असे शिक्षित लोकांना वाटू लागले. देश स्वतंत्र होऊन पंचवीस वर्षें झाली तरी इंग्रजी राजवटीत जो चुकीचा शिक्षणक्रम होता तसाच अद्यापहि शिकविला जात आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं मोठमोठे इतिहासतज्ञ म्हणविणारेहि त्या खोटया इतिहासालाच खरा इतिहास मानून त्या आधारावर संशोधन करीत आहेत. एवढेच नव्हे तर त्या इतिहासाला कोणी चुकीचा इतिहास आहे असे म्हटलेलेहि त्यांना सहन होत नाही. मात्र इतिहासाचे राजवाडे, स्वा. सावरकर, बाळशास्त्री हरदास, श्री. पु. ना. ओक इत्यादींच्या लेखनामुळें भारताच्या इतिहासाकडे शुद्ध दृष्टीने बघणारांचा वर्ग हळूहळू तयार होऊ लागला आहे.

ज्यांचा स्वार्थ भारताशी कमी निगडित होता अशा फ्रेंच, जर्मन इटालियन, रशियन इतिहासतज्ञानी ते पाश्चात्य असूनही भारतीय इतिहासाकडे बऱ्याच निर्दोष बुद्धीने पाहिलेले आहे. पाश्चात्यांच्याच बुद्धीला प्रमाण मानणारांनी, इंग्रजाप्रमाणेच इतर देशातील इतिहास-तज्ञांच्या मतांकडे लक्ष दिल्यास त्यांचीहि दृष्टी निवळेल.

इंग्रजाचे राज्य गेल्यावरहि इतिहासाचे चित्र विकृत स्वरूपात मांडणे ज्यांनी चालूच ठेवले आहे त्यात त्यांचा राजकीय स्वार्थ असल्याचे दिसून येईल. उदा. कम्युनिस्ट पक्षाचा असा दावा आहे कीं "भारत हे बहुराष्ट्रिक राज्य आहे. या राज्यात वेगवेगळ्या संस्कृती, परपरा, भाषा व वंशाची अनेक राष्ट्रे असून राजकीय सोयीसाठी ती एकत्र आली आहेत." असे म्हणण्यामागे कम्युनिस्टांचा राजकीय स्वार्थ असा कीं वेगवेगळ्या प्रदेशांनी केंद्रांपासून फूटून निघण्याच्या चळवळी कराव्या व त्या चळवळींच्या लाटेवर आरूढ होऊन कम्युनिस्ट पक्षाचे राज्य ठिकठिकाणी निर्माण करणे सोपे जावे.

दक्षिणेकडील द्रविड मुन्नेत्र कलघम या पक्षाचे मतानुसार तामिळनाडू हे स्वतंत्र द्रविड राष्ट्र आहे. उत्तरेकडील आर्यांनी हजारो वर्षे द्रविडांना गुलामीत ठेवले असून त्यांच्या वर्चस्वातून द्रविड राष्ट्राची सुटका झाली पाहिजे असे द्र. मु. क. चे पुढारी म्हणत असतात. स्वतःचा राजकीय पक्ष सत्तेवर रहावा या साठीं तामिळनाडमधील लोकांच्या मनात फुटीरतेचे बीज पेरणे, एवढाच त्यांचा या प्रचारामागे हेतू आहे.

मुस्लीम लीग या पक्षाला मुसलमानांची संस्कृती व इतिहास वेगळे असल्याचे दाखविण्यापासून फायदा आहे. म्हणून तो पक्षहि विकृत इतिहासाचाच पुरस्कार करतो. केरळ, गोवा, नागालँड, मेघालय, बिहार या भागातील ख्रिश्चन लोकही राजकीय स्वार्थासाठी फुटीर इतिहासाचाच पुरस्कार करतात. दक्षिणेतील द्र. मु. क. पक्षा प्रमाणेच उत्तरेतील अकाली दलाचे पुढारीहि शिखांचे स्वतंत्र शीखिस्थान असल्याचा दावा करीत असतात. अशा तऱ्हेने इंग्रजांनी पेरलेले दुहीचे बीज, इंग्रज भारतातून गेल्यानंतरहि फोफावलेले दिसून येते.

प्रत्यक्ष दुहीचा पुरस्कार न करणारे परंतु भारताच्या मूलभूत राष्ट्रियत्वासंबंधी मनात संभ्रम असलेले लोक तर भारतात फारच मोठ्या संख्येने आहेत या मंडळींचे असे मत आहे की, भारत हे एक नवे राष्ट्र आहे. या राष्ट्राचा उदय गेल्या पन्नास वर्षांत झाला असून याचे रुप निधर्मी आहे. पूर्वी अस्तित्वात असलेला भारत हा एक राष्ट्र या

स्वरूपात नव्हताच. अनेक जातिसमूहांची ती एक वसाहत होती. एकछत्री शासनसंस्थाही गेल्या दोन हजार वर्षांत येथें नव्हती. शिवाय गेल्या हजार वर्षांत या देशात मुसलमानांची संख्या कित्येक कोटींची झाली आहे. अशा या कोट्यावधी लोकांचा धर्म, संस्कृती, भाषा यांचा प्रभाव येथील राष्ट्रजीवनावर पडला असून हिंदू व मुसलमान मिळून एक नवीच संस्कृती येथें तयार झाली आहे. अशा या नव्या संस्कृतीचा जुन्या इतिहासाशी, जुन्या संस्कृतीशी, जुन्या परंपरांशी संबंध तोडणेच नवराष्ट्राच्या निरोगी घडणीसाठी आवश्यक आहे.

ही विचारसरणी मनात दृढ झाल्यामुळें, इंग्रजी सत्ता येथून गेल्यावर स्वराज्याची जेव्हा जुळणी सुरु झाली, तेव्हां या राष्ट्राचे नाव काय असावे? या राष्ट्राचा झेंडा कोणता असावा? या राष्ट्राचे राष्ट्रगीत कोणते असावे? या राष्ट्राचे राष्ट्रपुरुष कोणाला संबोधावे? या सर्व प्रश्नांची उत्तरें शोधण्याला सुरुवात झाली व नव्या विचारसरणीला अनुसरूनच या प्रश्नांची उत्तरे तयार करण्यात आली. देशाचे नाव हिंदुस्थान होते. त्याचेच अपभ्रष्ट रूप "इंडिया" हे परदेशात रूढ झाले होते. पण हिंदुस्थान नाव चालू ठेवावे तर त्याचा अर्थ हा देश फक्त हिंदूंचा आहे असे समजले जाईल. मग मुसलमान व ख्रिश्चन यांचे येथें स्थान कोणते? त्यासाठीं हिंदुस्थान हे नाव बदलून जन्याशी सांधा ठेवणारे "भारत" हे नाव निवडण्यात आले. मात्र जगाशी संबंध ठेवताना त्याचे नाव 'इंडिया' हेच कायम ठेवण्यात आले. विशेषनामाचे भाषांतर करण्याचा हा जगावेगळा (व्याकरण शास्त्रालाही मोडून) प्रकार फक्त आपल्याच देशात आढळून येतो.

ध्वजाबाबतहि तोच प्रकार झाला. या देशात प्राचीन कालापासून ध्वजाचा रंग ठरलेला होता. राज्य वा धर्ममत वेगळे असेल तर ध्वजावर त्याचे निदर्शक चिन्ह असावयाचे. ध्वजाचा रंग भगवा किंवा केशरीच असावयाचा. देशात अनेक संस्थाने होती व अनेक पंथ होते. पण सर्वांच्या ध्वजाचा रंग भगवा असावा असा संकेत ठरून गेला होता. परंतु 'भारत' देशात भगवा रंग ठेवला तर तो मुसलमानांना रुचणार नाही, अशा

कल्पनेमुळें केशरी, हिरवा, पांढरा ( इतर धर्माचा ) असा तिरंगी झेंडा ठरविण्याव आला, व अहिंसेचे निदर्शक अशोकचक्र त्यावर रेखण्यात आले. " वंदे मातरम् " या रूढ राष्ट्रगीतात देवीचे ( मूर्तीचे ) स्तवन असल्याने त्याचे जागी " जन गण मन " हे कांहींही निश्चितार्थ निष्पन्न न होणारे राष्ट्रगीत योजण्यात आले. आणि अशा या नव्या, संमिश्र राष्ट्राचा जनक म्हणजे राष्ट्रपुरूष कोण? तर ते स्थान राष्ट्रपिता या नावाने महात्मा गांधींना देण्यात आले.

महात्मा गांधींना राष्ट्रपिता पद दिले खरे! पण गांधीजी विचाराने पूर्ण सनातनी हिंदू होते. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाला अध्यात्माची बैठक होती. नवराष्ट्रवाल्यांना हे गांधीजीचे हिंदूपण परवडण्यासारखे वाटले नाही. म्हणून अध्यात्माशी पूर्ण फारकत असलेला. भौतिकवादावर आधारलेला "समाजवाद" हा राष्ट्राच्या विकासाचा आधार ठरविण्यात आला. गांधीजींनी पुरस्कारलेली 'त्याग' व 'संयम' ही तत्वे मागे पडून 'भोग' व 'उथळपणा' यांना प्राधान्य आले. राष्ट्रवादाविषयी निर्माण केलेल्या संभ्रमाचा स्वाभाविक परिणाम म्हणून भाषावरून भांडणे, जाती वरून भांडणे, नद्यांच्या पाण्यावरून भांडणे, तेलंगण, विदर्भ, हरियाना, मेघालय अशो प्रादेशिक भांडणे यांचा देशात असा कांही डोंब उसळला, कीं या राष्ट्रांत कधीकाळीं एकात्मता होती वा पुढे निर्माण होईल या बद्दलच मोठमोठ्यांच्या मनात शंका निर्माण झाली.

सर्वात विपरीत परिणाम जर कांहीं झाला असेल, तर असा कीं आपला कोण, म्हणजे देशहिताला सहाय्यक कोण व परका म्हणजे देशविघातक कोण, याची पारख करण्याची बुद्धी नष्ट झाली. देशाला मातृभूमी समजून देशावर खरे प्रेम करणारे होते त्यांना प्रतिगामी व परके समजण्यात येऊ लागले व देशाला भोगभूमी समजून देशाचे तुकडे पाडायला सिद्ध झालेल्याना आप्त समजण्यात येऊ लागले. देशभक्तांची अवहेलना व देशभंजकांचा पाठपुरावा असा उलटा क्रम सुरू झाला. देशाच्या राजकारणाकडे पाहू गेल्यास काय दिसते? राष्ट्रवादाविषयी संभ्रम असलेले सर्व छटांचे समाजवादी, फुटीर वृत्तीचे अकाली, द्रविड

कझगम आणिदेशद्रोही मुस्लीमलीगवाले आणि नाग, मिझो इत्यादी सर्वजण एकेठिकाणी जमा झालेले दिसतील व खऱ्या राष्ट्रवादी विचाराचे लोकांना देशातून नष्ट करण्याचे डावपेच रचण्यात सर्वांचे एकमत असल्याचे दिसून येईल.

राष्ट्रवादाच्या संभ्रमित विचारसरणीतून असे विपरीत घडत असले तरी त्यामुळें हे राष्ट्र रसातळाला जाऊन तावडतोब नष्ट होईल असे समजण्याचे कारण नाही. फार काळ हीच संभ्रमावस्था राहिल्यास मात्र ते शक्य आहे. पण कांहीं नैसर्गिक व बद्धमूल असे राष्ट्रीय संस्कार येथाल समाजावर असल्याने ही संभ्रमावस्था संपून, खरा राष्ट्रीय विचार प्रवाह पुन्हा प्रबल झाल्याशिवाय राहाणार नाही. भारतराष्ट्रात स्वभावत:च असलेले व बद्धमूल झालेले हे संस्कार कोणते आहेत, याचे विवेचन आता आपण पुढील प्रकणात करू. म्हणजे खऱ्या व 'सभ्रमित किंवा खोटया' राष्ट्रवादाचा निवाडा, आपोआपच होईल.

• • • • •

प्रकरण ४ थे

# भारताचे राष्ट्रियत्व

कोणताहि समाज राष्ट्ररुपाने उभा राहण्यासाठी त्याला एखाद्या भूमीची आवश्यकता असते. इस्रायलचे उदाहरण आपण पाहिलेच आहे की, ज्यू ( यहुदी ) लोकांची राष्ट्रीय आत्मशक्ती जागृत असूनहि त्यांना त्यांची भूमि ( पॅलेस्टाइन ) पुन्हा परत मिळेपर्यंत ते राष्ट्ररूपाने उभे राहू शकत नव्हते. भूमी प्राप्त होताच इस्रायल राष्ट्र उभे राहिले. भूमीविषयी प्रेम असणें हा राष्ट्रियत्वामधील सर्वात प्रबल असा घटक आहे. भारत देशाची रचना पाहूजाता उत्तरेस हिमालय व इतर तीन दिशांना समुद्र अशा स्वाभाविक मर्यादामुळे भारतभूमी अखंड विशाल व सलगरूपात उभी असल्याचे दिसून येईल. " उत्तरम् यत् समुद्रस्य, हिमाद्रेश्चैव दक्षिणम् " असे भारत वर्षाचे अगदी सोपे वर्णन पूर्वजांनी करून ठेवले आहे. भारतभूमीला मातेचे स्वरूप देऊन तिचे मस्तक म्हणजे हिमालय, पूर्व व पश्चिमेकडील भूप्रदेश म्हणजे तिचे बाहू, नर्मदा ही कटिमेखला, विंध्यपर्वत हे वक्षस्थल, कन्याकुमारी म्हणजे चरणकमल

७८८८५
१९९३

असे देवतेचे वर्णन अनेक कवींनी करुन ठेवले आहे. कोणी येथील भौतिक समृद्धीचे, कोणी ज्ञान भांडाराचे, कोणी ऋतूंचे अशी असंख्य वर्णने करुन भारतमातेची स्तुतिस्तोत्र गाइली आहेत स्वामी विवेकानंदांनी समाधी अवस्थेत भारतमातेच्या चरणाजवळ सागरातील शिलेवर बसून मातृभूमीचे दर्शन घेण्यात जीवनाची धन्यता मानली. या भूमीच्या श्रेष्ठतेविषयी वर्णन करताना स्वामीजीं म्हणत. "प्रत्यक्ष परमेश्वरालाही मानवी देह धारण करुन याचभूमीत क्रीडा करावीशी वाटली आहे. इतकी ही भूमी पवित्र आहे"

भारतभूमीला माता मानून येथे राहणारा समाज. हाच या मातेचा पुत्ररुप समाज आहे. मातेच्या ठायी अनन्य राहणे हे ज्या समाजाने आपले कर्तव्य मानले आहे, तो सर्व समाज हा राष्ट्रीय समाज या नावाला पात्र आहे. भारत ही आपली मातृभूमी नसून भोगभूमी आहे, असे जर कोणी भारतवासी मानू लागला तर त्याला राष्ट्रीय म्हणवून घेण्याचा अधिकार राहाणार नाही. पण भारताविषयी मातृभूमीची भावना मनात असेल तर त्या व्यक्तीचा धर्म कोणता आहे, वंश कोणता आहे, त्याची भाषा कोणती आहे, त्याची राजकीय मते काय आहेत याचा विचार करण्याचे फारसे कारण नाही. मातृभावनेचा आणि राष्ट्रियत्वाचा संबंध अगदी एकरुप आहे.

राष्ट्रियत्वाचा दुसरा महत्वाचा निकष म्हणजे समान संस्कृती. भारतीय संस्कृतीचे ठळक वैशिष्ठ्ये म्हणून असे सांगता येईल की येथे सर्व प्रकारच्या विचारचे आणि आचारांचे स्वातंत्र्य मान्य केलेले आहे, प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव भिन्न आहे, परंतु इतरांशी सामंजस्याने वागण्यासाठी तो आपल्या स्वभावाला मुरड घालू शकतो. त्याप्रमाणे भिन्न विचाराचे लोकहि दुसऱ्याच्या विचारांचा आदर ठेवून एकत्र समाधानाने नांदू शकतात, असे भारतीय संस्कृतीचे मुख्य सूत्र आहे. त्यामुळेच भारतात, गेल्या हजारो वर्षापासून अनेक धर्म, पंथ, संप्रदाय, मते यांचा उदय व विकास

होत असल्याचे आढळून येते. ईश्वराची रुपे अनेक आहेत असे मानणारे व ईश्वर फक्त एकच आहे असे मानणारे, वेदांना प्रमाण मानणारे व वेदांना प्रमाण न मानणारे, मूर्तिपूजा मान्य असलेले व मान्य नसलेले, यज्ञयागावर विश्वास ठेवणारे व यज्ञयाग त्याज्य मानणारे असे अगदी परस्पर विरुद्ध विचाराचे लोकसमूह, या देशात एकमेकांच्या श्रद्धांचा आदर ठेवून राहताना आढळून येतात. व्यक्तींच्या भिन्नभिन्न अभिरुची प्रमाणे ईश्वरोपासनेचे अनंत मार्ग आहेत व कोणत्याही मार्गाने जाणारा मनुष्य अखेर एकाच उत्तमगतीला पोहोचतो या अत्यंत उदार मताचा पुरस्कार सर्व तत्वज्ञांनी लोकांनी केलेला आढळून येतो. याचा परिणाम असा झाला आहे की, व्यावहारिक अनुभवानुसार लोकांना आपले आचार कालसंगत ठेवणे शक्य झाले आहे. विचारात कालानुसार बदल करताना किंवा नवा विचार स्वीकारताना जुना विचार नष्ट करण्याची आवश्यकता भारतीय संस्कृतीला भासली नाही. त्यामुळे एकाच वृक्षाला अनेक पारंब्या फुटाव्यात परंतु सर्वांचे मूळ मात्र एकच असावे, तसा संस्कृतीचा स्वाभाविक विकास भारतात झाला आहे.

भारतीय संस्कृतीतील विचारसमन्वयाचा हा गाभा ज्यांना नीट समजलेला नाही, ते असे समजतात की, भारतातील विविध पंथ, संप्रदाय, मते हे सर्व भेदाचे निदर्शक आहेत. अशातऱ्हेच्या विविधतेला ते लोक फुटीरपणा, विस्कळितपणा किंवा भेदभाव असे अज्ञानाने संबोधतात. सांस्कृतिक स्वातंत्र्य असल्यामुळे बळाने दुसऱ्याचे मतांतर करणे हा प्रकार भारतीय संस्कृतीला मंजूर नाही. तसेच माझाच पंथ खरा कल्याणकारी असून दुसऱ्याचा पंथ दुर्गतीला नेणार आहे असा अभिनिवेश नसल्याने, धर्मांतर (बाटवाबाटवी) हा प्रकार भारतीय संस्कृतीत बसत नाही. अशाप्रकारे सांस्कृतिक स्वातंत्र्य म्हणजे भेदभाव किंवा फाटाफूट नसून ती परमतसहिष्णु अशी सात्विक समाजप्रवृत्ति आहे.

भारतीयसंस्कृती संबंधी येथवर जे वर्णन केले, तिच्या कक्षेत

जे बसतात, ते कोणत्याही धर्ममताचे असले तरी राष्ट्रीय आहेत. हिंदूमधील विविध पंथ उदा. आर्यसमाजी, शैव, वैष्णव, भागवत, शाक्त इ. हजारो पंथ वेदप्रामाण्य मानणारे आहेत. ते तर संस्कृतीच्या वरील व्याख्येत बसतातच. शिवाय बौद्ध जैन, शिख यांचाहि समावेश या व्याख्येंत होतो. कायद्याच्या संहितेतहि हिंदू, बौद्ध, जैन व शीख यांचा उल्लेख त्यामुळे हिंदूंच्या समवेतच नेहमी केलेला असतो, "हिंदू कोड" नांवाचा कायदा, या सर्वांना सारखाच लागू आहे, परंतु हिंदू धर्मांत ज्यांचा समावेश होत नाही, पण वर वर्णन केलेल्या भारतीय सस्कृतीच्या वैशिष्ठ्याचे आचरण स्वभावतः ज्यांचे, हातून होते, असे पारशी धर्ममताचे लोकसुद्धा भारतीय राष्ट्रियत्वाच्या व्याख्येत पूर्णपणे बसतात. युरोपियन लोक भारतात येण्यापूर्वी, ख्रिश्चन धर्मप्रसारक परदेशातून भारतात आले होते. त्यांच्या प्रभावाने, काही भारतीय हिंदू नागरिक ख्रिश्चन धर्मांत गेले पण त्यांनी आपली देशनिष्ठा विचलित होऊ दिली नाही. व भारतीय आचार विचाराशीही फारकत होऊ दिली नाही "सीरियन ख्रिश्चन" या नावाने दक्षिणेत हे लोक राहतात. या लोकांचाहि समावेश भारतीय सस्कृतीच्या कक्षेत होतो.

युरोपियनांनी समुद्रमार्गे जगाच्या विविध भागात जाऊन वसाहती स्थापन करण्याचा व राज्ये ताब्यात घेण्याचा उपक्रम सुरु केला. त्यापैकी पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज यांनी भारतात राज्य-स्थापनाकरण्यात यश मिळविले. या लोकांनी, कांहीना आर्थिक प्रलोभने दाखवून, तर कांहीना बळाने बाटवून, आपल्या ख्रिश्चन धर्मांत समाविष्ट करुन घेतले. याशिवाय युरोपातील इतरहि देशातून व अमेरिकेतून ख्रिश्चन धर्मप्रसारक येऊन त्यांनी भारतातील हिंदूना बाटविण्याचा सपाटा चालविला. अशाप्रकारे ख्रिश्चन धर्मांत गेलेल्या भारतीयांची सख्या एक कोटीहून जास्त झाली आहे. आपण वर म्हटलेच आहे की, केवळ धर्ममत बदलले तर तेवढ्याने संस्कृती बदलण्याचे काही कारण नाही. पण भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य

आपण असे सांगितले आहे कीं, इतरांच्या धर्ममताचा आदर करण्याचीही शिकवण या संस्कृतीत आहे. या वैशिष्टयाच्या कक्षेत भारतातील जे ख्रिश्चनधर्मीय येत असतील, ते पूर्णपणे राष्ट्रीय आहेत. मात्र युरोपियन व अमेरिकन धर्म प्रचारकांच्या शिकवणुकीमुळे, जे भारतीय ख्रिश्चन, येथील हिंदू, बौद्ध आदि अन्य धर्ममतांना हीन लेखून त्यांचा द्वेष करीत असतील, त्यांचा समावेश भारतीय संस्कृतीत होऊ शकणार नाही.

याच्याहि पलिकडे जाऊन म्हणजे केवळ इतर धर्मीयांचा द्वेष करुनच कांही ख्रिश्चन धर्मीय थांबत नाहीत. तर भारत हे आपले राष्ट्रच नसून, आपले एक स्वतंत्र असे राष्ट्र असावे अशी इच्छा व्यक्त करीत असतात. भारताच्या ईशान्य सरहद्दीवर नाग व मिझो जमातीतील जे लोक ख्रिश्चन धर्मांत गेले, त्यांच्या मनावर असाच फुटीरतेचा संस्कार करण्यात आलेला आहे. पोर्तुगीज राजवटीखाली वावरलेल्या ख्रिश्चनांनाहि भारतीय संस्कृतीपेक्षा पोर्तुगीज संस्कृती जवळची वाटत असते. अनेक रोमन कॅथॉलिक ख्रिश्चनांना युरोपियनांच्या भाषा, चालीरीती इत्यादींचे अनुकरण करण्यात अभिमान वाटतो. अशा तऱ्हेची द्विधा वृत्ती बाळगून राहण्याचे सोडून भारतीय संस्कृतीचे वैशिष्ठ्य स्वीकारल्याशिवाय या लोकांचा समावेश भारतीय राष्ट्रियत्वाच्या कक्षेत करता येणार नाही.

येथवर, ख्रिश्चन धर्ममताचे जे भारतात राहणारे नागरिक आहेत त्यांच्यासंबंधी विचार झाला. भारतीय ख्रिश्चन धर्मीयात, दिवसेंदिवस, युरोपियन व अमेरिकन प्रचारकांच्या प्रभावापासून मुक्त होण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आपण "धर्ममत बदलले, तरी आपणास भारतीय संस्कृतीचा त्याग करण्याचे कांहीच कारण नाही" अशा विचारांचा प्रभाव ख्रिश्चन धर्मीयात वाढीस लागला आहे ही भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. हा प्रभाव उत्तरोत्तर वाढत जाऊन भारतीय संस्कृतीच्या प्रवाहात भारतातील

ख्रिश्चनधर्मीय नागरीक पूर्णपणे एकरुप होऊन जातील, अशी अपेक्षा आपण करुया.

भारतीय संस्कृतीच्या प्रवाहापासून अलग राहिलेली फार मोठी लोकसंख्या म्हणजे भारतात राहणाऱ्या सुमारे ५ कोटी मुसलमानांची आहे. भारताच्या खऱ्या राष्ट्रियत्वाचा प्रश्न जेव्हां जेव्हां उपस्थित होतो, तेव्हां विचाराचे सर्व गाडे मुसलमानांच्या प्रश्नावर अडून बसते. भारताच्या राष्ट्रियत्वासंबंधी चर्चा करताना, प्रत्येक कसोटीशी, मुसलमानांचा प्रश्न कसाला लावणे अवघड जाते. यासाठी एक देश आणि एक संस्कृति या दोन मुद्यासंबंधीच नव्हे, तर मुसलमानांच्या समग्र प्रश्नासंबंधीचा विचार एका स्वतंत्र प्रकरणातच करु. त्यासाठी तो प्रश्न तूर्त बाजूला ठेवून भारतीय राष्ट्रियत्वाच्या अन्य कसोट्यांचा आता विचार करु.

राष्ट्रियत्वाची तिसरी महत्वाची कसोटी म्हणजे, समान इतिहास किंवा समान शत्रुमित्रभाव असणे. भारताचा इतिहास, अत्यंत प्राचीनकाळापासून जरी पाहिला, तरी असे आढळून येते की, या देशात अनेक लहान लहान राज्ये असूनहि, ती कोणातरी एका मध्यवर्ती सत्तेशी निगडित रहावीत असा प्रयत्न केलेला असे. त्यासाठी अश्वमेध यज्ञ, राजसूय यज्ञ इ. यज्ञ करण्याचे संकल्प केले जात. रामायण, महाभारत अशा जुन्या इतिहासग्रंथातूनच असे वर्णन आहे असे नव्हे. समुद्रगुप्त, विक्रमादित्य इत्यादी सम्राटांच्या संबंधी उपलब्ध झालेल्या माहितीवरुन संपूर्ण भारतवर्ष व त्यालगतचे देश हे एकेका सम्राटाच्या अधिपत्याखाली कसे नांदत होते ते आढळून येते. भारतीय संस्कृतीच्या सात्विक प्रवृत्तीला अनुसरुन, जिंकलेल्या प्रदेशातील प्रजेला अथवा तिच्या शासनकर्त्याला, गुलाम बनविण्याची प्रवृत्ती या देशात नव्हती. जरासंधासारखे जे कोणी सम्राट, इतरांना गुलाम बनवीत किंवा जित राजांच्या स्त्रियांची विटंबना

करीत, त्यांना राक्षस संबोधून त्यांचा सात्विक लोक संहार करीत असत.

साम्राज्य प्रसारामागे राजकीय प्रभुत्वाचा हेतू असतोच. परंतु तो हेतू गौण ठरविला जाऊन, जो सम्राट आपल्या प्रभावक्षेत्रात धर्म व सस्कृतीला उत्तेजन देईल, त्यालाच श्रेष्ठ मानण्याचा प्रघात होता. अशोक, विक्रमादित्य, शालिवान हे प्राचीन काळातील सम्राट अद्यापहि जनसामान्यांच्या स्मरणात आहेत. कारण त्यांनी आपला पराक्रम धर्मरक्षणाऱ्या कामी उपयोगात आणला होता. मुसलमानांच्या आक्रमणापूर्वी उत्तर भारतात, सम्राट हर्षवर्धनाचे व दक्षिणेत पुलकेशीचे, अशी मोठी बलाढ्य साम्राज्ये होती. त्यामुळे भारतावर परकीय आक्रमकांचा प्रभाव पडू शकला नव्हता. परंतु त्यानंतर एकछत्री अमल नष्ट होऊन, लहान लहान गणराज्ये अलगपणाने राज्ये करु लागल्याने, शत्रूला आक्रमण करण्यास योग्य संधी मिळाली.

इसवी सनाच्या सातव्या शतकात महंमद बिन कासीम ने सिंधप्रांतावर स्वारी केली. तेव्हां पासून मुसलमानी आक्रमकांची वक्रदृष्टी भारताकडे वळाली. त्यानंतर तीनशे वर्षे पर्यंत वायव्य सरहद्दीकडून भारतात घुमण्याचा आक्रमकांचा प्रयत्न, गांधार (अफगाणिस्थान) व पंजाबमधील शूर भारतीयांनी उधळून लावला. त्यानंतर मात्र राजपूतांच्या असंघटिपणामुळे आक्रमकांचे फावत गेले. गझनीच्या महंमदाने १७ स्वाऱ्या केल्या, तरी संघटित होण्याचे भान लहान गणराज्यांनी ठेवले नाही. अखेर इ. स. च्या आकराव्या शतकाच्या अखेरीस स्थानेश्वरच्या लढाईने मुसलमानांना निर्णायक विजय मिळवून दिला. तेथपासून, गेली ९ शे वर्षे हा देश आक्रमकांशी सतत झगडतच आहे.

मुस्लिमांच्या आक्रमणाला उत्तरेत राजपूतांनी, शिखांनीं आणि दक्षिणेत प्रथम विजयनगरच्या राजांनी व नंतर मराठ्यांनी सतत

विरोध केला. अखेर मुसलमानी सत्ता इतकी खिळखिळी झाली कीं तिच्या शेवटच्या मुगल बादशहांना मराठ्यांचे संरक्षण घ्यावे लागले. मुस्लिमांबरोबर चाललेला हा प्रदीर्घ लढा पूर्ण होण्याचे आतच, युरोपातून आलेल्या इंग्रज, फ्रेंच व पोर्तुगीजांशी झगण्याचा प्रसंग भारतातील हिंदूंवर आला. युरोपियन साम्राज्यवाद्यांच्या आपापसातील स्पर्धेत फ्रेंच मागे पडले व भारतावर इंग्रजांचा अंमल पूर्णपणें बसला. इ. स. १८४८ पर्यंत तग धरुन असलेले शिखांचे राज्यहि इंग्रजांच्या ताब्यात गेले व पुढील दहा वर्षांत झालेला स्वातंत्र्याचा उठाव दडपून इंग्रजी राज्य स्थिर झाले. इंग्लंडमधील व्यापारी कंपनीच्या हाती असलेली सूत्रें पूर्णपणे इंग्लंडच्या पार्लमेंटच्या ताब्यात गेली भारतात राज्य करण्यास आपणास खरा अडथळा मुसलमानांचा नसून हिंदूंचा आहे, हे १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात, इंग्रजांच्या तीव्रतेने लक्षात आले. मुसलमान व इंग्रज या दोघांचा समानशत्रू हिंदू ठरल्याने, हिंदूविरुद्ध मुसलमान व इंग्रज यांची एक आघाडी तयार झाली.

इंग्रजांच्या राजवटीविरुद्ध हिंदू पुढारी अनेक साधनांनी लढत होते. सशस्त्रक्रांती, सनदशीर क्रांती, सत्याग्रह इत्यादि मार्गांनी लढा चालू असताना. मुसलमान नेते या लढ्यापासून अलिप्त रहात असत. इंग्रजी राज्यकर्ते हिंदू व मुसलमान या दोघांचे समान शत्रू असल्याने, दोघांनी मिळून त्यांच्याशी संयुक्तपणे लढा द्यावा, अशी मुसलमानांची परोपरीने विनवणी हिंदू पुढाऱ्यांनी केली. परंतु मुसलमानांनी आपला स्वतंत्र राष्ट्राचा हेका अखेरपर्यंत कायम ठेवला. एवढेच नव्हे, तर इंग्रजांचे छत्र घेऊन, हिंदूंवर अत्याचार करणे सुरु ठेवले. इंग्रजाविरुद्ध कोणताही लढा न देता, हिंदूंच्या अडचणीचा फायदा घेऊन, मुसलमानांनी इंग्रजाकडून स्वतंत्र पाकिस्तान राष्ट्र तोडून घेतले. एक हजार वर्षे सतत हिंदूंशी वैर करुन मुसलमानांनी भारतात अलग तुकडा तोडून

घेण्यात यश मिळविले. उरलेला भारत हा स्वतःला निधर्मी म्हणवून घेत असला तरी जगातील सर्व राष्ट्रे भारत, हे हिंदूचे राष्ट्र आहे, हे लक्षात ठेवूनच त्याच्याशी व्यवहार करतात. इतिहासाचा हा धागा आपण तोडावयाचे म्हटले, तरी जगातील राष्ट्रे, मूलभूत सत्य विसरणार नाहीत. भारताचा इतिहास हा हिंदूंचा इतिहास आहे, हे ते सत्य आहे.

राष्ट्रियत्वाच्या तीन महत्वाच्या कसोटयांचा विचार येथवर आपण केला. एक मातृभूमि, एक संस्कृति व एक इतिहास या तीनहि कसोटयांवर भारतातील हिंदूसमाज ( त्यातच शीख, जैन, बौद्ध यांचा समावेश होतो ) पूर्णपणे उतरत असून. पारशी व खिश्चन यांनीहि राष्ट्रियत्वाच्या प्रवाहात एकरूप होऊन, राष्ट्र उभारणीत वाटा उचलला आहे, हे आपण अनुभवीत आहोत.

भारतात अनेक मानववंशांचे लोक प्राचीन काळापासून एकत्र नांदत आले आहेत. परंतु एका वंशाने दुसऱ्याची कत्तल करुन बळजबरीने आपली संस्कृती दुसऱ्यावर लादल्याचा [मुसलमानांचा अपवाद ] पुरावा उपलब्ध नाही. या उलट, एकमेकांच्या आचार विचाराची देवाण घेवाण करून एकात्मता साधण्याचा प्रयत्न सतत होत असल्याचे हजारो पुरावे उपलब्ध आहेत. अशी देवाण घेवाण करून एकरूपता साधण्यात धर्म आणि भाषा यांनी मोठी कामगिरी केली आहे. भारतातील कोणताही धर्मपंथ घ्या. त्याची तीर्थस्थाने सर्व देशभर विखुरलेली आढळून येतील. शीख पंथ फक्त पंजाबात सीमित आहे. पण त्या पंथाचे गुरू गोविंदसिंह यांचा देहांत दक्षिणेत गोदावरी नदीच्या काठी झाल्याने नांदेड हे त्यांचे तीर्थस्थान झाले आहे. शिखांचा शेवटचा सम्राट रणजितसिंह याने अफगणिस्तानच्या शहाशुजाकडून कोहिनूर हिरा

मागून घेण्याचे कारण, त्याला तो जगन्नाथपूरीच्या जगन्नाथाला अर्पण करण्याची इच्छा होती. उत्तरेत निर्माण झालेल्या जैन धर्माचा बाहुबली दक्षिणेतील कर्नाटकांत उभा आहे. गौतम बुद्धाला हिंदूच्या दशावतारात स्थान लाभल्याने, बौद्ध व हिंदूधर्म एकरूप झाले आहेत. दसरा, दिवाळी इत्यादी उत्सव, सर्व देशात सारख्याच उत्साहाने साजरे होत आहेत. गंगा, गोदावरी, कावेरी इत्यादी नद्या सर्व भारतीयांना सारख्याच पवित्र वाटतात. ॐकाराचा बीजमंत्र, ध्वजाचा केसरी रंग आणि गोमातेची भक्ती ही सर्व धर्मपंथांना समान सूत्राने गुंफीत आहेत. अगदी अलिकडे उभारले गेलेले कन्याकुमारीजवळील विवेकानंद शिला स्मारक यापुढेही भारताच्या एकात्मतेची साक्ष देत राहणार आहे.

हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेत दोष घुसल्याने ब्राह्मण - ब्राह्मणेतर, स्पृश्य - अस्पृश्य असे वाद निर्माण झाले आहेत. दक्षिणेत ब्राह्मण विरोधावर आधारलेले राजकीय पक्ष निर्माण झाले आहेत. तर अस्पृश्यांनी हिंदूधर्म सोडून बौद्ध धर्मांत प्रवेश केला आहे. हिंदू समाजात असलेला विविध जातींमधील उच्चनीचतेचा भाव, हिंदूना अत्यंत हानिकारक ठरला आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था पुन्हा निर्माण करणे ही अशक्य प्राय गोष्ट आहे. आणि ती व्यवस्था आता कालबाह्य झाली आहे. चातुर्वर्ण्यातील व्यावहारिक विषमतेची तीव्र प्रतिक्रिया होऊनच दक्षिणेत द्रविडवाद आणि संपूर्ण देशात धर्मांतराची प्रवृत्ती वळावली. ही गोष्ट लक्षात घेऊन, हिंदूसमाजाला यापुढे तरी विषमतेचा त्याग करणे भाग आहे. अजापर्यंत हिंदू समाजाने अशा प्रतिक्रिया पचविल्या आहेत व पुढेहि त्या पचविण्यातच हिंदूंचे हित आहे. हिंदू समाजव्यवस्थेत निर्माण झालेल्या अनेक दोषांची चर्चा पुढे एका स्वतंत्र प्रकरणात आपणास करावयाची असल्याने, हा विषय तूर्त येथेंच थांबवू.

हीच सर्व भारताची व्यवहारभाषा मानली गेली आहे. सुमारे सातशे वर्षे भारताच्या विस्तृत प्रदेशात मुसलमानांची राजवट होती. परकीय मुसलमानांकडून संस्कृत भाषेला प्रोत्साहन मिळणे शक्य नव्हते. परंतु राज्य कारभारासाठी सर्व प्रादेशिक भाषांना सांधणे त्यांनाहि जरुर पडल्याने, त्यांनी पर्शियन व हिंदी यांचे मिश्रणातून निर्माण झालेली उर्दू ही भाषा व्यवहारात आणली. उर्दूमार्फत हिंदीचा आपोआपच प्रसार, त्यामुळें भारतात झाला आहे. अशाप्रकारे, एकराष्ट्रियत्व सिद्ध करणारा 'भाषा' हा घटकहि समानत्वाने भारतात आस्तित्वात आहे.

राष्ट्रनिर्मितीच्या ज्या कसोटया म्हणजे १) सलग भूभाग किंवा मातृभूमी २) समान संस्कृती ३) समान इतिहास ४) समान धर्म ५) समान भाषा या पांचहि कसोटयांवर भारत हे राष्ट्र पूर्णपणे उतरते. भारत हा बहुराष्ट्रिक संघ आहे, असे म्हणणे हा सत्याचा विपर्यास आहे, हे यावरुन सिद्ध होते. या पांचहि कसोटया पूर्ण करणारा असा हिंदूसमाज आजही ४० कोटींच्या संख्येत भारतभूमीत विद्यमान असून, ऐतिहासिक कारणानी त्या समाजापासून अलग व्यक्तिमत्व घडलेले इतर अल्पसंख्य गटहि हिंदूंच्या सांस्कृतिक प्रवाहाजवळ सख्यत्वाने नांदत असल्याने, तेसुद्धा राष्ट्रीयच आहेत. मुसलमानांच्या अपवादाचा उल्लेख आपण पूर्वी केलाच आहे. त्यासंबंधीची चर्चा आपण पुढील प्रकरणात करु.

• • • • •

प्रकरण ५ वे

# भारतातील मुसलमान

आपण पूर्वीच्या प्रकरणात म्हटलेच आहे कीं भारताच्या खऱ्या राष्ट्रियत्वाचा विचार करताना संस्कृति, धर्म, इतिहास, वंश, भाषा, परंपरा या प्रत्येक मुद्याचे गाडे मुसलमान समाजाचा विचारकरताना अडते. भारताच्या एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण सुमारे १२% आहे. इंग्रजी राजवटीत भारत अखंड असताना हे प्रमाण २०% होते. पाकिस्तानच्या निर्मितीमुळें मुसलमान वस्तीच्या बहुसंख्येचा सलग प्रदेश भारताच्या पश्चिम व पूर्व दिशेस दोन तुकड्यात अलग झाल्याने, उरलेले १२% मुसलमान भारताच्या सर्व प्रांता विखुरले आहेत. इंग्रजांनी भारत सोडण्यापूर्वी मुसलमानांसाठी स्वतंत्र भाग तोडून द्यावा अशी मागणी पाकिस्तानात समाविष्ट झालेल्या आणि न झालेल्या अशा सर्वच मुसलमानांनी केली होती. त्यामुळें भारतात राहिलेले १२% मुसलमान, देहाने भारतात रहात असले तरी त्यांचे मन

पाकिस्तानच्या उभारणीत व हितात गुंतलेले असल्याचे दिसून येते.

जेव्हां पाकिस्तान निर्माण झालेले नव्हते, तेव्हां आणि त्याच्या आधीही, मुसलमान समाजाचे अंतःकरणात भारताविषयी प्रेम नव्हतेच. भारत हा हिंदूंचा देश आहे आणि त्याचेवर राज्यकरण्यासाठी मुसलमान बाहेरच्या देशातून आले आहेत, अशीच मनोभूमिका इंग्रज येण्यापूर्वी व नंतरहि मुसलमान समाजाची होती. आजहि भारतात राहणारे पाच सहा कोटी मुसलमान, आपण परदेशातून येथें आलो आहोत असेंच मानतात. अरब, तुर्क, मोगल, पठाण इराणी इत्यादी परक्या देशातील मुसलमानांचे आपण वंशज आहोत, असे ते मानतात. भारतातील हिंदूसमाजातील जे कोणी छळाने, बळाने, मोहाने मुसलमान धर्मात गेले, त्यांचे आपण वंशज आहोत, असे मुसलमान मानीत नाहीत.

तुर्क, पठाण, मोंगल इ. परकीय मुसलमानांनी स्वाऱ्या करुन भारतातील राजांचा पराभव केला. जेते म्हणून त्यांनी भारतावर राज्य केले. या परकीय राज्यकर्त्यांचे आपण वंशज आहोत, म्हणजे आपणहि जेते आहोत, असा मुसलमानांचा समज आहे. भारतात राहणारे मुसलमानेतर प्रजाजन काफिर असून त्यांना मुसलमान धर्मात आणल्याशिवाय ते मनुष्य म्हणून जगण्यास लायक राहू शकत नाहीत, अशी मुसलमानांची दृढ धारणा आहे. देशातील सर्व प्रजाजन मुसलमान झाले तर त्यांचे राज्यहि आपोआपच मुसलमानांचे होईल व मग सर्व देश इस्लाममय झाल्यावरच मुसलमान आनंदाने राहू शकतील, अशी मुसलमानांची पक्की भावना आहे. काफरांची बहुसंख्या असलेल्या या देशात आज आपणाला नाइलाजाने रहावे लागत असले, तरी या देशाशी सध्या आपले नाते परकेपणाचेच आहे. आज ही आपली भोगभूमि आहे, याच नात्याने वावरले पाहिजें, असे मुसलमानांना वाटते.

येथवर वर्णन केल्याप्रमाणे भारतातील मुसलमानांचा, भारतासंबंधीचा दृष्टिकोन असल्याने, त्या दृष्टिकोनाशी सुसंगत

असा व्यवहार ते सतत करीत असतात भारत इस्लाममय होण्याला सर्वात मोठा अडथळा हिंदूंचा असल्याने, हिंदूंचा ते जास्तीत जास्त द्वेष करतात. हिंदूंचे आचार, विचार, धर्म, मंदिरे, पूज्यस्थाने, पूज्यवस्तू, भाषा, पोषाख या सर्वांचा त्यांना द्वेष वाटतो. येथील हवामानाशी सुसंगत नसूनहि मुसलमान आपला पोषाख तुर्क पठाण वगैरेसारखा ठेवतात पर्शियन शद्बांचा भरगा असलेली उर्दू भाषा बोलतात. एखाद्या संज्ञेला उर्दूत योग्य प्रतिशद्ब नसल्यास, त्याजागी इंग्रजी शद्ब वापरतात. पण चुकूनहि संस्कृत शद्ब वापरीत नाहीत. कारण संस्कृत ही हिंदूंची भाषा आहे व इंग्रज हे हिंदूंचे शत्रू होते. त्यामुळे हिंदूंचा शत्रू त्यांना जवळचा वाटतो. इंग्रजी राजवटीला मुसलमानांचा सतत पाठिंबा मिळत असे. कारण इंग्रजांच्या आश्रयाने त्यांना हिंदूंवर अत्याचार करता येत असत.

इतिहासकालात ज्यांनी ज्यांनी हिंदूंवर अत्याचार केले, ते सर्व, विशेषतः महमद बिन कासीम, गझनीचा महमद, महमद घोरी, अल्लाउद्दिन खिलजी, औरंगजेब यांचेविषयी मुसलमानांना अभिमान वाटतो. हेच त्यांचे आदर्श पुरुष असल्याने, मुसलमानांना त्यांची परंपरा, आपली परंपरा वाटते. ही परंपरा कोणती तर हिंदूंची मंदिरे फोडणे, गाईंची कत्तल करणे, हिंदूंच्या स्त्रियांवर अत्याचार करणे, हिंदूंना ठार मारणे किंवा बाटविणे, हिंदूंची राज्ये नष्ट करणे, हिंदूंची कला, वाङमय, धर्म, संस्कृती नष्ट करणे ही आपली परंपरा त्यांना मनोमन श्रेष्ठ वाटते. पाकिस्तान निर्मितीपूर्वी व त्यानंतरही मुसलमानाचा व्यवहार या परंपरेला धरुन चालू आहे. भारतात उरलेले मुसलमानही कधी गाय कापून, कधी मंदीर फोडून, कधी हिंदू स्त्रियांवर अत्याचार करुन, कधी सवाद्य मिरवणुकीवर हल्ला करुन, तर कधी गुलाल किंवा रंगउडविण्यावरुन मारामारी करुन आपली हिंदुद्वेषाची परंपरा कायम असल्याचे दर्शवीत असतात.

मुसलमानांच्या मनाची ही जी आग्रही ठेवण आहे तिचे मूळ, त्यांच्या धार्मिक शिकवणुकीत आहे असे म्हणतात. त्या शिकवणुकीनुसार त्यांचा धर्म हाच फक्त धर्म असून त्या धर्माचा अंगिकार केल्याशिवाय अन्य मार्गाने मनुष्याचे कल्याण होऊच शकत नाही, असे त्या धर्माचे सांगणे आहे. त्या धर्ममतासंबंधी शंका उत्पन्न होण्यानेसुध्दा मनुष्याचे अध:पतन होते, असे मुसलमान मानीत असल्याने, त्यासंबंधी विचार, चर्चा, दुमत व्यक्त करण्याला त्यांची मान्यता नाही. परिणामत: मुसलमान समाज स्वत.मध्यें कोणतेही परिवर्तन करुन घेण्यापासून वंचित राहिला आहे. सुमारे एक हजार वर्षे अरब, तुर्क, मंगोल, मुघल, इराणी इ. मुसलमानांची राज्ये युरोप, आफ्रिका व आशिया खंडाच्या विस्तृत भूक्षेत्रावर पसरली होती. जवळ जवळ एक तृतियांश जग त्यांचे ताब्यात होते. परंतु त्यामुळे अरब, तुर्क इ. मुसलमानांच्या वैभवात भर पडून ते समृध्द झाले, असे घडले नाही. भारतासारख्या भौतिक दृष्टीने समृध्द असलेल्या देशावर सातशे वर्षे राज्य करुनही मुसलमानांच्या जीवनावर समृध्दीची कळा नाही. विद्या, कला, वाङमय, व्यापार, राहाणी, इ. जीवनाच्या सर्व अंगोपांगात मुसलमान समाज अतिशय मागासलेला राहिला आहे. कोणतेहि परिवर्तन.कितीही इष्ट असले, तरीं स्वीकारण्याची मुसलमानांचीं तयारी नाही. मुगल साम्राज्यात जे कांही थोडे वैभव होते, ते सुध्दा हिंदू विद्वानांच्या आधारावरच उभारलेले होते.

पहिल्या महायुध्दानंतर जर्मनीच्या प्रभावामुळे तुर्कस्तानात केमालपाशाने मुसलमानांना सक्तीने सुधारण्यासाठी कायदे केले. खलिफाचे अधिकार नष्ट करुन सुधारलेला कायदा रूढ केला. गोषापध्दती रद्द केली. शिक्षणात सुधारणा केल्या. अलिकडे इजिप्तमधील अरबांनीहि युरोपियनांचे अनुकरण सुरु केले आहे परंतु एकूण मुस्लिम समाज अद्यापहि मागासलेल्या विचारांचा, असहिष्णू व दरिद्रीच आहे. कोणत्याही मुस्लिम राष्ट्रात लोकशाही

अस्तित्वात नाही. सत्तेसाठी एकमेकांचे खून करणें, प्रतिस्पर्धी विचाराचे लोकांच्या कत्तली करणे. हे प्रकार सर्व मुस्लिम. राष्ट्रात रुढ आहेत. इंडोनेशियात व बांगलादेशात मुसलमानांनी मुसलमानांच्याच कत्तली केल्या. इजिप्त, सूदान, मोरोक्को. अलजेरिया, इराक. जॉर्डन, सौदीअरेबिया, लेबेनॉन, ईराण, पाकिस्तान, अफगाणिस्तान या सर्व मुस्लिम राष्ट्रांत सशस्त्र क्रांत्या वारंवार होतात.

जगातील मुसलमानांचे अनुकरण भारतातील मुसलमान करीत असल्याने, त्यांचेहि विचार मागासलेलेच आहेत भारतात लोकशाही असल्याने येथील पांच कोटी मुसलमानांना मतदानाचा व कोणत्याहि अधिकारपदावर निवडून येण्याचा किंवा नोकरीचा अधिकार आहे. राष्ट्रपती, मुख्यन्यायाधीश, शिक्षणमंत्री राज्यांचे मुख्यमंत्री, पोलिसप्रमुख, पराराष्ट्रांत वकीलपदे, राज्यपालपदें अशा अनेक प्रमुख स्थानांवर मुसलमान व्यक्ती पोहोचू शकल्या. पण तरीहि एकूण मुसलमान जमातीला मुळीच समाधान नाही. वरील पदांवर पोहोचलेल्या व्यक्तींचे विचार तपासून पाहिले तर एकादा अपवाद वगळता, बाकीचे बहुतेक, मनाने मागासलेल्या विचाराचेच असतात. विविध राजकीय पक्षात असलेले मुसलमान कार्यकर्तेंहि, मुसलमानांच्या विचार व आचारात परिवर्तन करण्याचा प्रश्न उपस्थित झाल्यास पक्षभेद, विसरुन एक होतात व परिवर्तनाला विरोध करतात.

मुसलमानांची जेथें अल्पसंख्या आहे अशा राष्ट्रात त्यांचा व्यवहार कसा असतो असे पाहिल्यास भारतातल्या मुसलमानांपेक्षा तो वेगळा नसतो असेच आढळून येते. स्पेन, बाल्कनराष्ट्रे, रशिया. चीन, इस्त्रायल याठिकाणच्या अल्पसंख्य मुसलमानांना तेथील राज्यकर्त्यांनी कठोर दंडुकेशाहींने नमविले आहे. स्पेन मध्ये तर मुसलमानांचे सक्तीने धर्मांतर करण्यात आले रशियात

लेनिन व स्टॉलिन यांनी मुसलमानांवर कठोर नियंत्रणे घालून त्यांना श्वेतरशियन लोकांची जीवनपद्धती सक्तीने स्वीकारायला लावली. चीनमध्ये सिकियांग प्रांतात मुसलमानांनी उठावणी करतांच, एक लाख मुसलमानांची कत्तल करुन, हान वंशीय चिन्यांचे वर्चस्व तेथें निर्माण करण्यात आले. इस्रालयमध्ये अरब मुसलमानांना ज्यूंनी तेथें राहाणे कठीण करुन सोडले. अशा-प्रकारे मुसलमानांना सक्तीची तडजोड घडविली तेव्हांच तेथील राज्यकर्त्यांना आपापल्या देशात शांततेने प्रगती घडविता आली. मुसलमानांनी आपणहोऊन प्रगती करुन घेण्यास सर्व ठिकाणी नकार दर्शविला. त्यामुळें त्यांची प्रगती, त्या त्या राष्ट्रातहि बेताचीच झाली आहे.

भारताची परंपरा सहिष्णुतेची असल्याने मुसलमानी धर्ममताशी मिळते जुळते घेण्याचा प्रयत्न सतत करण्यात आला. गुरुनानक, कबीर या संतांनी राम आणि रहीम ही एकाच परमेश्वराची रुपे आहेत असा प्रचार केला. पण त्याचा परिणाम मुसलमानावर कांहीच झाला नाही. हिंदू धर्मांत मात्र नानकांचा शीखपंथ व कबीराचा पंथ असे दोन नवे पंथ तयार झाले. अकबरापासून औरंगजेबापर्यंत राजपूत हिंदू राजांनी मोगलांशी समेट करुन त्यांना हिंदूंची राज्ये बुडविण्यालासुद्धा मदत केली. कांहींनी आपल्या मुलीसुद्धा दिल्या. पण त्याचा परिणाम मुसलमानांवर कांहीही झाला नाही.

अलिकडे महात्मा गांधींनी मुसलमानांशी सख्य करण्यासाठी हिंदूंना आपले स्वत्व विसरुन शांतनेने व्यवहार करण्यास आयुष्यभर भाग पाडले. मुसलमानांना मूर्तिपूजा आवडत नाही म्हणून वंदेमातरम् या राष्ट्रगीतातील दुर्गेच्या वर्णनाला फाटा दिला. भगवाझेंडा हा हिंदूंचा म्हणून मुसलमानांसाठी तो सोडला व तिरंगी झेंडा राष्ट्रीय झेंडा केला. एक ना अनेक उपाय करुन मुसलमानांची खुशामत करुन पाहिली. पण सर्व व्यर्थ

ठरले. देशाची फाळणी होऊन देश त्रिखंड झाला.

स्वतंत्र भारतात नेहरुजींनी हिंदूसाठी सुधारणाकायदा केला, पण मुसलमान रागावतील म्हणून त्यांना त्यांचा जुनाट कायदाच लागू ठेवला. गोवध बंद करा, असे हिंदू म्हणू लागले पण मुसलमानांना खूष ठेवण्यासाठी गोवधबंदीचा कायदा केला नाही. नेहरु हयात असेपर्यंत मुसलमानांचे जेवढे हट्ट पुरविता येतील तेवढे पुरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी हिंदूंचे संघटण करणाऱ्या रा. स्व. संघाला नेहरुजींनी नेहमी नांवे ठेविली. संघकार्याला सर्वप्रकारचे अडथळे आणले. नेहरुजींच्या पश्चातहि त्यांच्या पक्षाचे धोरण मुसलमानांसंबंधी झुकतेच राहिले आहे.

पण इतके सर्व करुनहि मुसलमान समाजाच्या एकंदर विचारात किंवा व्यवहारात कांही फरक झाल्याची चिन्हे दिसत नाहीत. कांहीतरी खुसपट काढून ते दंगे उत्पन्न करीतच असतात. आणि पुन्हा भारतात अल्पसंख्यांकावर अन्याय होत असल्याचा कांगावा करीतच असतात. कधी उर्दूभाषा ही राष्ट्रभाषा व्हावी, म्हणून तर कधी अलिगड विद्यापीठाच्या दुरुस्तीकायद्याला विरोध करावा म्हणून, सर्व मुसलमान एकत्र येतात. भारत सरकारची मुसलमानांना नष्ट करण्याची इच्छा आहे, असा ओरडा करतात. भारताबाहेर जरी एकादी घटना मुसलमान धर्मविरोधी घडली, तरी त्याचे निमित्त काढून, येथील मुसलमान इतरांना म्हणजे हिंदूंना धमक्या देतात. इस्राइल देशात "अल् अक्सा" नांवाच्या मशिदीला एका ऑस्ट्रेलियन ख्रिश्चनाने आग लावली. त्याचे निमित्त करुन भारतातल्या मुसलमानांनी मोठमोठ्या मिरवणूका काढल्या आणि हिंदूंकडे हातवारे करुन धमकीच्या घोषणा केल्या.

पाकिस्तानने बांगला देशातील स्वतःच्या नागरिकांवर पशुतुल्य अत्याचार केले. अत्याचाराला भिऊन तेथील एक कोटी नागरिक भारतात आले. त्याबद्दल पाकिस्तानचा निषेध करण्याचे सोडाच, उलट भारताने त्या निराधारांना आश्रय दिला म्हणून, येथील मुसलमानांनी भारत सरकारवरच टीका केली. पाकिस्तानातून बांगला देश फुटल्याने पाकिस्तान दुर्बल झाले, याचे भारतातील मुसलमानांना दुःख वाटले. भारत-पाकिस्तान संघर्षात अरबांनी पाकिस्तानला पाठिंबा दर्शविला. अरबांनी अगदी योग्यच केले, असे मत मुसलमानी वृत्तपत्रांनी व्यक्त केले.

जगातील इतर राष्ट्रात मुसलमानांना कसे वागविले गेले हे आपण वर पाहिलेच आहे. मात्र भारतातहि तसेच वागविले पाहिजे असे नाही. भारतातील हिंदूसमाजाचा स्वभाव चीन, रशिया किंवा स्पेन यांतील समाजाच्या स्वभावाशी जुळणारा नाही. हिंदूलोक दुसऱ्याच्या धर्ममताचा द्वेष कधीहि करीत नाहीत. उपासनेचे अनंत मार्ग आहेत व ते सर्व मार्ग चांगले आहेत, असे हिंदूंचे तत्वज्ञान सांगते. त्यामुळे मशिदीत जाऊन अल्लाची प्रार्थना करणे यात वाईट कांहीच नाही, असे हिंदू मानतात. मुसलमानाशी हिंदूंचे धार्मिक भांडण होण्याचे कांहीच कारण नाही. मुसलमानांनी आपला धर्म सोडावा, असाहि हिंदूंचा आग्रह नाही. मुसलमानांनी हा देश सोडून द्यावा, असेहि हिंदू म्हणत नाहीत. भारत व पाकिस्तानचे युद्ध अनेक वेळा झाले. पण त्याबद्दल भारतातील मुसलमानांना हिंदूंनी जबाबदार धरले नाही. हिंदूंनी त्यांना कधी त्रासहि दिला नाही. मुसलमानांवर आर्थिक किंवा सामाजिक बहिष्कारहि हिंदू टाकीत नाहीत. भारतातील विविध राजकीय पक्ष, मुसलमानांशी द्वेष करा असे कधींही शिकवीत नाहीत. कित्येक पक्ष तर प्रसंगी हिंदूंवर अन्याय करुनहि मुसलमानांची बाजू घेतात भारत सरकारने राबात येथे झालेल्या जागतिक

मुस्लिम परिषदेत सुद्धा भाग घेतला होता. जेणेकरुन मुसलमानांना येंथे दुरावा वाटणार नाही, असाच व्यवहार सरकार त्यांच्याशी करीत असते. सामान्य हिंदू प्रजाहि मुसलमानांशी आपण होऊन कधीहि भांडण करीत नाही. अगदी लहान खेडयातसुद्धा चार दोन मुसलमान कुटुंबे निर्धास्तपणे व सन्मानाने राहू शकतात. त्यांच्या सण-समारंभात व जत्रांत हिंदूंचे पूर्ण सहकार्य असते.

कलेच्या व क्रीडेच्या क्षेत्रातहि मुसलमानांचे त्यांच्या गुणानुरुप पूर्ण कौतुक व गौरव केला जातो. सिनेमाच्या क्षेत्रात तर मुसलमान कलाकार भारतात फार लोकप्रिय आहेत. हॉकी, क्रिकेट, कुस्ती इ. क्रीडाक्षेत्रातहि त्यांच्या योग्यतेनुसार येथें गौरव होतो. संगीत, वाद्ये या कलांत मुसलमान गुरु करण्यास हिंदूंना संकोच वाटत नाही.

इतिहासकाळात डोकावून पाहिले तरी असे दिसते कीं शीख, राजपूत, मराठे, विजयनगरचे राजे किंवा आसामचे अहोम राजे यांनी कित्येक वेळा मुसलमानांचा पराभव केला. परंतु त्यांनी सामान्य मस्लिम नागरिकाला कधीच त्रास दिला नाही मुस्लिमस्त्रियांना सन्मानाने वागवले त्यांच्या मशिदी व कुराणग्रंथ यांचा अपमान केला नाही. ऐवढे मुसलमानांनी अत्याचार केले, पण त्यांचा सूड घेणे शक्य असूनहि हिंदूराजांनी सूड घेतला नाही.

हजारो वर्षापासून सहिष्णुतेचे संस्कार हिंदूसमाजावर घडलेले असल्याने, त्यानुसारच त्यांचे वर्तन घडते. अलिकडे मात्र हिंदू समाजाची अशी भूमिका होऊ लागली, आहे कीं "आपण मुसलमानांशी सहिष्णुतेने वागतो, याचा मुसलमान असा अर्थ घेतात, कीं आपण दुर्बल व भ्याड आहोत. त्यामुळे ते आपणावर निष्कारण आघात करतात. त्यासाठी मुसलमानांना समजेल अशा भाषेतच त्यांचेवर प्रत्याघात केला

पाहिजे," त्यामुळे, गेल्या १०।१५ वर्षांपासून असा अनुभव येत आहे, की मुसलमानांनी हिंदूंची कुरापत काढतांच, हिंदूहि मुसलमानांवर तीव्र हल्ले चढवन, त्यांना जबरदस्त शासन करतात, रांची, मेरठ, भिवंडी, जबलपूर, इंदूर, अमदाबाद, जळगांव, पुणे इ. ठिकाणी झालेल्या दंगलीत हिंदूंनी तीव्र प्रतिचढाई केल्याचे दृष्टोत्पत्तीस आले.

हिंदूंच्या भूमिकेत झालेला आणखी एक बदल म्हणजे, एका गांवी मुसलमानांनी दंगा सुरु केला कीं त्याच्या आसपासच्या क्षेत्रातील शेकडो गावांतून हिंदू उठाव करतात. सर्व हिंदूंचें दुःख एकच आहे अशी सामुदायिक भावना हिंदूंमध्ये उत्तरोत्तर वाढत आहे. हिंदू समाजातील जे लोक पूर्वी मुसलमानांची बाजू घेऊन हिंदूसंघटणेला नांवे ठेवीत, त्यांच्याही भूमिकेत बदल झाल्याचे दिसत आहे. मुसलमानांनी आडमुठेपणा सोडावा, असे तेही आता म्हणू लागले आहेत, भारतीय जीवनप्रवाहाशी मुसलमानसमाज एकरुप होत नाही, याची खंत आता ते व्यक्त करु लागले आहेत. "हिंदूंची रास्त बाजू मांडणे म्हणजे जातीयता" असे मानणारे, आता हिंदूंची मन:स्थिती लक्षात घेऊन, मुसलमानांनाहि थोडा उपदेश करु लागले आहेत. गेली एक हजार वर्षे हिंदूंनी मुसलमानांचा मार खाल्ला, पण. "आतां हिंदू मार खाणार नाहीत" असे विचार हिंदूमध्यें लोकप्रिय होऊ लागले आहेत.

मुलमानांविषयीची हिंदूसमाजाची भूमिका प्रतिक्रियारूपच आहे. आपणहोऊन मुसलमानांना त्रास द्यावा अशी भावनामात्र हिंदूमध्ये मुळीच आढळून येत नाही. एकदरीत हिंदूची ही जी मन:स्थिती आहे, ती योग्यच आहे असे वाटते. टोल्याला प्रतिटोलाहि मिळतो, हे जसजसे मुसलमानांच्या लक्षात येऊ लागेल, तसतसे त्यांना आपला आडमुठेपणा व कुरापतखोरपणा

सोडला पाहिजे, हे लक्षात येऊ लागेल. मुसलमानी आक्रमणे भारतावर सुरु होण्यापूर्वीहि शक, हूण, ग्रीक, इराणी यांची आक्रमणे भारतावर झाली होती. ते आक्रमकहि कांहीं कमी क्रूर नव्हते. परंतु शालिवाहन, विक्रमादित्य, स्कंदगुप्त, चंद्रगुप्तमौर्य आदि शूर सम्राटांनी त्यांना त्यांच्याच कठोर भाषेत उत्तर दिल्याने ते सर्व आक्रमक पराभूत झाले. त्यापैकीं शक व हूण हे कालांतराने भारतीय जीवनात पूर्णपणे एकरूप झाले.

भारतातील कोटयावधी मुसलमानांना "भारतीय" बनविण्याचा प्रयत्न यापुढें, अनेक वर्षे सातत्याने करीत रहावा लागणार आहे, त्यासाठी अनेक दिशांनी विशेष प्रयत्न करण्याची जरुरी आहे. शक. हूणांना पचविणारी भारतीय संस्कृती आज दुर्बल झाली आहे, असे मानण्याचे कारण नाहीं. त्याच प्राचीन सस्कृतीचा वारसा सांगणारे. आपण पन्नास कोटी हिंदू अद्याप ह्यात आहोत. भारतावर यापुढें कोणत्याहि विचाराच्या पक्षाची राजवट आली तरी तिला मुसलमानांचे भारतीयकरण करण्याचे उपाय योजावेच लागतील. त्या प्रश्नाकडे आपले राज्यकर्ते जेवढे दुर्लक्ष करतील तेवढया प्रमाणात देश दुर्बल राहील. केवळ आर्थिक प्रश्नावरच मानवाच्या सर्व जीवनाची उभारणी झाली आहे, असें मानणाऱ्या रशिया व चीनमधील कम्युनिस्ट विचार-सरणीच्या राज्यकर्त्यांनाहि, त्यांच्या देशातील मुसलमानांचा विचार, राष्ट्रीय दृष्टिकोनातूनच करावा लागला. त्यामुळे भारतात समाजवादी, साम्यवादी, निधर्मी असे कोणतेही नांव धारण करणारी राजवट आली, तरी मुसलमानांचे मनात राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे काम, त्या राजवटीला करावेच लागेल. तसे प्रयत्न न करता केवळ तात्पुरत्या तडजोडी करुन राजकीय हेतू साध्य करण्याचे प्रयत्न होतराहिल्यास, मुसलमानांच्या मनोवृत्तीत

फरक पडण्याची सुतराम शक्यता नाही. मुसलमानांची एकगठ्ठा मते मिळवावींत म्हणून त्यांच्या फुटिरतेच्या, राष्ट्रविरोधी व प्रतिगामी मागण्यांचे समर्थन करुन त्यांची खुशामत करण्याची, विविध राजकीय पक्षांची जी प्रवृत्ती आहे, ती अंती राष्ट्रघात करणारी सिद्ध होईल. त्याऐवजी मुसलमानांची जी चूक होत असेल ती त्यांना स्पष्टपणे सांगून, त्यानां विचाराला प्रवृत्त करण्याचे प्रयत्न सतत झाले पाहिजेत. हे प्रयत्न कोणकोणत्या मार्गाने केले पाहिजेंत, त्यांची चर्चा पुढील प्रकरणात करु.

• • • • •

प्रकरण ६ वे

# मुसलमानांचे भारतीयकरण

मुसलमान समाजात आज असणारी अलगपणाची भावना काढून टाकून, भारताविषयी आत्मीयतेची भावना त्यांचेत निर्माण करणे आवश्यक आहे. भारत ही आपली मातृभूमी आहे. येथील समाज हा आपला समाज आहे. या भूमीवर व येथील समाजावर प्रेम करणे, हे आपले कर्तव्य आहे. अशी भावना मुसलमान समाजात उत्पन्न केली पाहिजे. आपण मुसलमानधर्म स्वीकारला असला, तरी आपण त्यामुळें परके झालेलो नाही. आपल्या पूर्वजांनी मुसलमानधर्म स्वीकारण्यापूर्वीही ते या भूमीत रहात असंत, त्यामुळें या भूमीतील रहिवाशांचे पूर्वज व आपले पूर्वज एकच आहेत, याची मुसलमान समाजात जाणीव निर्माण केली पाहिजे. अरब, तुर्क, मुगल, अफगाण हे परक्या देशातून राज्य-करण्यासाठी आले. येथे त्यांचे राज्य व्यवस्थित चालावे यासाठी त्यांनी धर्माचा आधार घेतला. धर्माचे नावावर त्यांनी

क्रूर कृत्ये केली व अशी कृत्यें करणें म्हणजेच धर्मनिष्ठा असा आभास निर्माण केला. वास्तविक त्या क्रूर कृत्यांचा धर्माशी कांहींही संबंध नसून त्यांच्या मुळाशी राज्यलोभ होता, हे मुसलमानांचे मनात बिंबविले पाहिजे. परक्या राज्यकर्त्यांनी राज्यलोभापायी जो क्रूरपणा केला तो आपला वारसा किंवा परंपरा आहे असे मानण्याचे कारण नाही, हे मुसलमानांना समजावून दिले पाहिजे.

मुसलमानांची आणखी एक दृढ समजूत अशी आहे कीं उर्दू ही आपली धर्मभाषा आहे. त्यामुळे प्रत्येक मुसलमान धर्मनिष्ठेने उर्दूला कवटाळून बसतो. ही त्यांची समजूत प्रयत्नपूर्वक दूर केली पाहिजे. मुसलमानधर्माचा उदय अरबस्तानात झाल्यामुळें त्या धर्माचा उपदेश अरबी भाषेत सुरुवातीस झाला, हे स्वाभाविक झाले. त्यामुळें तो उपदेश नीट आकलन होण्यासाठी मुसलमानांनी अरबीभाषेंचें ज्ञान करुन घेतले तर त्यात वावगे कांहींच नाही. हिंदूंचे धार्मिक ग्रंथहि संस्कृत भाषेत होते. परंतू हिंदूंच्या नित्य व्यवहाराच्या भाषा त्यांनी सोडल्या नाहीत. फक्त धार्मिक संस्काराचे वेळी ते संस्कृत भाषेतून मंत्र म्हणतात मुसलमानांनीही धार्मिक संस्कारासाठी अरबी भाषा वापरावी व अन्य व्यवहार ते ज्या प्रदेशात रहातात त्याच प्रदेशाच्या भाषेतून करावेत. उर्दूभाषा आणि मुसलमानधर्म यांचा कांहीहि संबंध नाही. परक्या राज्यकर्त्यांनी स्वतःच्या राज्यकारभाराला सोयिस्कर अशी तयार केलेली ती भाषा आहे. धार्मिक भाषा नाही. शेकडो वर्षांच्या संस्काराने, ती भाषा जवळची वाटणे स्वाभाविक आहे, तिचा उपयोग कौटुंबिक व्यवहारापुरता करावा. हिंदूसमाजातील विविध भाषिक लोक, व्यवसायानिमित्त दूरदूरच्या प्रदेशात जाऊन रहातात. आपापल्या कुटुंबात ते आपल्या भाषेत (मारवाडी, गुजराथी, तेलगू, पंजाबी, तामिळ, इ) आपसात बोलतात. परंतु इतर व्यवहार त्या त्या प्रदेशातील

७८८६५
५०३
५१ २.२.५-३

भाषेतूनच करतात. मुसलमानांनीही आपले कुटुंबाबाहेरील सर्व व्यवहार प्रादेशिक भाषातूनच करावेत, हे त्यांना पटवून दिले पाहिजे. देशोदेशीचे मुसलमान, त्यांच्या त्यांच्या देशातील भाषातूनच व्यवहार करतात, हे त्यांच्या लक्षात आणून दिले पाहिजे. बंगाली मुसलमानांनी स्वभाषेच्या प्रेमामुळे पाकिस्तानमधून फुटून "स्वतंत्र बांगला देश" स्थापन केला, हे उदाहरण मुसलमानां-समोर अगदी ताजे आहे.

भारतातील मुसलमानांचा दुसरा गैरसमज असा कीं, परकीय आक्रमकांची परंपरा हीच आपली परंपरा आहे. वस्तुतः ती परंपरा अत्यंत वाईट आहे. क्रौर्य, कपट, विश्वासघात, बलात्कार, विध्वंस याचा अभिमान धरणें, हे मुसलमानांना कसे काय योग्य वाटते याचे आश्चर्य वाटते. हा अभिमान वाटण्याचे एकच कारण दिसते कीं या मार्गांनी परकीय आक्रमक विजयी झाले व त्यांच्या विजयामुळें आपण मुसलमान झालो, याची मुसलमानांना जाणीव आहे. मुसलमान होणे म्हणजेच मनुष्यम्हणून जगण्याला लायक होणे, या धर्मकल्पनेपोटी हा अभिमान निर्माण झालाअसावा असे वाटते.

मुसलमानांची, स्वतःच्या परंपरेविषयीची ही कल्पना दूर करणे हे सर्वांत आवश्यक काम आहे. कारण उदात्त आणि श्रेष्ठ परंपरेविषयी जी भारतीय कल्पना आहे, तिच्या अगदी विरुद्ध कल्पना मुसलमानांची स्वतःच्या परंपरेविषयी आहे. सत्य, क्षमा, दया, स्त्रीदाक्षिण्य, परमताचा आदर, ज्ञानाची कदर, कलेचा गौरव, शास्त्राचा स्वीकार, औदार्य, सत्चारित्र्य, परोपकार इ. सद्गुणांचे आचरण ज्यांचेकडून झाले, त्यांना श्रेष्ठ मानण्याची भारतीय परंपरा आहे. गीतेच्या सोळाव्या अध्यायात अभयं, सत्वसंशुद्धि, ज्ञान इ. चोविस सात्विक गुण सांगितले आहेत. आणि त्यांच्याच पुढें दंभ, दर्प इ. तामस किंवा राक्षसी

गुण सांगितले आहेत. "चोवीस दैवी गुणांनी युक्त असा तू आहेस," असे अर्जुनाला कृष्णाने सांगितले असून, या गुणांची परंपरा चालविण्यासाठी "तू युद्धात जय मिळव," असे त्याला सांगितले आहे. राम, कृष्ण, गौतमबुद्ध, चंद्रगुप्त, अशोक, विक्रमादित्य शालिवाहन, हर्ष, खारवेल इ. मुसलमानपूर्व राजे व बाप्पारावळ, राणाप्रताप, शिवाजीमहाराज, कृष्णदेवराय, गोविंदसिंग इ. मुसलमानी आक्रमणानंतरचे राजे यांची परंपरा गीतेतील सात्विक गुणानुवर्ती असल्याने, तिचा अभिमान धरणे हे भारतीय परंपरेला अनुसरुन आहे. नुकत्याच झालेल्या बांगलादेश निर्मितीच्या युद्धात, या भारतीय परंपरेला अनुसरूनच भारत सरकारचे वर्तन घडले आहे. पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी स्वबांधवावर राक्षसी अत्याचार केले. त्यावेळी भारतीय सेना धावून गेली. लंका विजयानंतर बिभीषणाला राज्यपद देणाऱ्या रामाच्या परंपरेला अनुसरून. बांगलादेशाचे राज्य शेख मुजिबूर रहमान यांचे हवाली केले. अशा या उदात्त परंपरेचा अभिमान बाळगण्याला मुसलमानांना संकोच वाटण्याचे कांहींही कारण नाही.

जगातील सर्व मुसलमानांमध्यें भारतीय मुसलमान हा उदात्त विचाराचा, पवित्र आचरणाचा, दयाशील, ज्ञानी, तपस्वी, परहितार्थ त्यागकरणारा असा असतो, असे सिद्ध झाल्यास, त्यात वावगे काय होणार आहे ? अरब, तुर्क, पठाण, मुगल यांच्यापेक्षा भारतीय मुसलमान हा सद्‌गुणी आणि तेजस्वी म्हणून लौकिकाला पोहचावा अशी आकांक्षा मुसलमानांनी का बाळगू नये ? असे होण्याने मुसलमानधर्माला कांहीं उणेपणा येणार आहे कीं त्यांचेविषयी आदर वृद्धिगत होणार आहे ? भारतीय मुसलमानांनी अशा तेजस्वी आदर्शांची उपासना केल्यास त्यात त्यांचे, त्यांच्या देशाचे आणि एकूण मुस्लिमजगताचेहि हित साधणार आहे. आदर्शांविषयींची मुसलमान समाजाची कल्पना बदलून ती

अशी स्वयंभू, भारतीय कल्पना बनविणे आवश्यक आहे.

मुसलमान समाजात सामाजिक सुधारणा घडविण्याचा अट्टाहास धरण्यापूर्वी त्यांच्या आदर्शविषयक आकांक्षेत बदल करण्याचे काम हाती घ्यावयास हवे. विचारांची दिशा बदलताना कोणत्याहि समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभेकेल्यासारखे वाटल्यास तो समाज चांगले परिवर्तनहि स्वीकारावयास तयार होत नाही. कारण त्यामुळे त्याच्या आत्मगौरवाच्या भावनेला धक्का बसतो. यासाठी आत्मगौरवाच्या भावनेला उदात्तीकरणाच्या दिशेकडे वळविल्यास इतर परिवर्तने स्वाभाविकतया घडून येतात. मुसलमानसमाजात आढळून येणारा एकोपा, धर्मप्रेम या गुणांचा गौरव करुन त्यांचा आत्मगौरव कायम टिकविला पाहिजे. त्याचबरोबर धर्माच्या आणि संघटित सामर्थ्याच्या उदात्त अंगाकडे त्यांचा मोहोरा फिरविला पाहिजे.

हिंदू . समाजसुधारकांनी हिंदूंच्या धार्मिक समजुतीवर, रुढीवर कठोर टीका केली. परंतु अशा आत्मटीकेची सवय हिंदूंना परंपरेने झालेली होती. हिंदूंच्या तत्वज्ञानात, अनेक विचारांना वाव देऊन, दुसऱ्याच्या मताचा आदर करण्याची शिकवण आहे. त्यामुळे समाजसुधारकांचे विचार स्वीकारण्यात हिंदूंना संकोच कमी वाटला. अशी उदार परंपरा असूनहि सुधारकांना कांहींवेळा विरोध झाला याचे कारणहि हेच आहे, की सुधारकांच्या टीकेमुळे त्या त्या वेळी हिंदूंच्या आत्मगौरवाच्या भावनेला धक्का बसत होता. महात्मा ज्योतिबा फुले व विष्णुशास्त्री चिपळूणकर, ब्राह्मोसमाज व स्वामी विवेकानंद, यांच्या वैचारिक चर्चेचा अभ्यास केल्यास असे आढळून येते, कीं त्यांच्यातील मतभेद, आत्मगौरवाला किती प्रमाणात धक्का द्यावा याबद्दलच होते. सुधारणांविषयी दुमत नव्हते. मुसलमान समाजात आत्मटीकेची परंपरा नाही. आत्मगौरवाची भावना

इतकी प्रबळ आहे की त्यामुळें कोणताहि किरकोळ बदल करण्यालाहि ते नाकारतात. मुसलमानांचा हा सामाजिक स्वभाव लक्षात घेऊन, भारतातील हिंदूपुढारी व राज्यकर्ते त्यांच्या परिवर्तनांचा विचार शक्यतो दूर ढकलतात. म्हणून परिवर्तनांचे हे काम कौशल्यानेच करावयास हवे. मात्र ते टाळता उपयोगाचे नाही.

हा प्रयत्न करताना, तीन दिशांनी प्रयत्न होणे जरुर आहे. १) हिंदूसमाजाचे सामर्थ्यवान संघटण २) मुसलमान समाजातील उदार विचारवंतांना प्रोत्साहन ३) राज्यकर्त्यांचा कणखरपणा. या तीन मार्गाच्या विचारात हिंदूसमाजाच्या टणकपणाला पहिले स्थान देण्याचे कारण असे कीं मुसलमान समाजाची भारतात आज जी संख्या आहे, तिचा उगमच हिंदूंच्या दुर्बळतेत, म्हणजेच हिंदूंच्या असंघटित अवस्थेत आहे. हिंदूंच्या असंघटितपणाचा लाभ घेऊनच पठाण, तुर्क मोंगल इ. परकीय आक्रमकांनी भारतात जम बसविला. हिंदू राजे वेळीच सावध होऊन संघटित झाले असते, तर परकीयांचा या देशात प्रवेश होणेच शक्य नव्हते. एकदा परकीयांचा जम बसल्यावर त्यांनी छळाने, बळाने, मोहाने हिंदूचे धर्मांतर सुरु केले. आकराव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत सुमारे आठशे वर्षे धर्मांतराचा प्रयोग चालू राहिल्याने आज मुसलमानसमाज कोटयावधीच्या संख्येचा झाला आहे. हिंदूसमाज असंघटित असल्याने त्याच्या मानबिंदूंची विटंबना करणे, स्त्रियांना भ्रष्ट करणे, दुर्बल घटकांचे धर्मांतर करणे यासारखे प्रकार मुसलमानांना सहज करता येऊ लागले. आपली संख्या वाढविण्याचा सर्वात सुलभ असा हाच बलप्रयोगाचा मार्ग आहे, अशी त्यामुळे मुसलमानांची दृढ समजूत झाली.

मुसलमानांचे राज्य जाऊन इंग्रजांचे राज्य आल्यावर, इंग्रजांनी मुसलमानांच्या दंडेलीला आश्रय दिला. त्यामळें हिंदूंवरील आक्रमण हा मसलमानांचा एक खेळच होऊन बसला. कांहींहि क्षुल्लक कारण काढावे व हिंदूंना झोडपून काढावे असा प्रकार हिंदूंच्या दुर्बलतेमुळेच घडू लागला. मुसलमान व इंग्रज यांची युती फोडण्यासाठीं हिंदूंच्या पुढाऱ्यांनी जे उपाय योजले त्यामुळें मुसलमानांचे अधिकच फावले. लोकमान्य टिळकांनी लखनौ करार करुन मुसलमानांना झुकते माप दिले. पुढे गांधीजींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा देऊन मुसलमानांचे नमते महत्व वाढवले. हिंदूमुस्लीम ऐक्य झाल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही. असा सतत प्रचार होऊ लागल्याने, इंग्रजांनी मुसलमानांना हिंदूविरुद्ध आणखी चेतवून, हिंदू मुसलमानांत जास्त फूट पाडली. खिलाफतीच्या चळवळीनंतर लगेच सावध होऊन हिंदूपुढाऱ्यांनी स्वत:च्या समाजाचे संघटणेकडे अधिक लक्ष दिल असते, तर इंग्रज व मुसलमान या दोघांशीहि टक्कर देण्याचे सामर्थ्य हिंदूसमाजात निर्माण झाले असते. पण दुर्दैवाने तसे घडले नाही. लाला लजपतराय, भाई परमानंद, पं. मदनमोहन मालवीय, डॉ. हेडगेवार, स्वा. सावरकर, डॉ. मुंजे, डॉ. शामाप्रसाद मुकर्जी, स्वामी श्रद्धानंद इ. हिंदू पुढाऱ्यांनी हिंदूसमाजाला सावध करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या उपदेशाकडे हिंदूसमाजाने दुर्लक्ष केले. देशाच्या फाळणीच्या रूपाने व त्यावेळी लक्षावधी हिंदूंची जी कत्तल झाली त्यारुपाने हिंदूंना आपल्या दुर्बलतेची कटू फळे चाखावयास मिळाली.

स्वातंत्र्यपूर्व काळातील पं. जवाहरलाल नेहरु आदि मुसलमान-धार्जिण्या पुढाऱ्यांच्या हातात स्वातंत्र्यानंतर राज्यकारभार आल्याने पूर्वीचेच चुकीचे धोरण स्वातंत्र्यानंतरहि चालूराहिले. कॉंग्रेसपक्षाचे नेतृत्व जोपर्यंत ते धोरण सोडून शुद्ध राष्ट्रहितबुद्धीने मुसलमानांच्या प्रश्नाकडे पाहणार नाही, तोपर्यंत मुसलमान

समाजाचे भारतीयकरण होणे अवघड आहे. सरदार वल्लभ भाईपटेल यांचे नेतृत्व त्यादृष्टीने पुष्कळच कणखर होते. तसे नेतृत्व कांग्रेस पक्षातील हिंदूंनी निर्माण केले पाहिजे. गेली आठशे वर्षे हिंदूसमाजाने जी चूक केली, ती यापुढे होऊ नये यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशात जे कार्य चालविले आहे, त्याला सर्व राजकीय पक्षातील हिंदू पुढाऱ्यांनी हातभार लावणे जरुरीचे आहे.' हिंदू समाजाला असंघटित अवस्थेत ठेवून कोणताच पक्ष देशाचे खरे हित साधू शकणार नाही.

आसेतुहिमाचल पसरलेला सुमारे पन्नास कोटी हिंदू समाज संघटितस्वरुपात राहू लागल्यास त्याच्या केवळ संख्याबळानेहि अनेक प्रश्न सुटतील. हिंदूसमाज आज केवळ संख्येने मोठा आहे. पण तो संघटित स्वरुपात मात्र उभा नाही. समाजातील एका घटकाचे जे दु:ख, ते सर्व समाजाचे दु:ख आहे असे वाटणे, याला समाजाची एकात्मभावना म्हणतात. हिंदू समाजातील एकाहि व्यक्तीचे, बळाने धर्मांतर झाले किंवा एकाहि स्त्रीवर परक्यांकडून अत्याचार झाला, तर त्याची व्यथा सर्व समाजाला जाणवणें व ती व्यथा दूर करण्यासाठी तो कृतिशील होणे, यात समाजाचे सामर्थ्य साठविलेले आहे. असे एकात्म भावनेतून निर्माण झालेले कृतिशील सामर्थ्य, अनेक प्रश्न सहजगत्या सोडवू शकते.

यहुदीसमाजाचे उदाहरण यादृष्टीने मोठे उद्बोधक आहे. त्यांचेजवळ संख्याबळ अल्प असूनसुद्धा, कृतिशील सामर्थ्याच्या जोरावर, त्यांनी शून्यातून ब्रम्हाण्ड निर्माण करुन दाखविले. केवळ सव्वीस लक्ष ज्यूलोक, कृतिशील सामर्थ्याच्या जोरावर, सात कोटी अरबांना पुरुन उरले आहेत. हिंदूंची संख्या पन्नास कोटी आहे पण हिंदूसमाज सर्व दिशांनी आकुंचित होत राहिल्याने आजवर मुसलमानांना त्यांच्या समाजाचा

विस्तार करणे सोपे गेले. हिंदूमधील भेदाभेद, धर्मभ्रष्टतेच्या जुनाट कल्पना. राजकीय आघाडीवरील पराभव, वैयक्तिक स्वार्थापोटी समाजाचा घातकरण्याची भावना, दीन, दलित, वनवासी इत्यादींची उपेक्षा यामुळे हिंदूसमाजाचे सामर्थ्य अगदी क्षीण होत गेले, त्यामुळे हिंदूसमाजाला गळती लागून, छिद्रे पडलेल्या मोटेसारखी समाजाची अवस्था झाली. ही सर्व छिद्रे बुजवून, समाज पुन्हा बलशालीअवस्थेत उभाराहिला, तर त्याच्या विराट सामर्थ्याच्या नुसत्या दर्शनानेहि मुसलमान समाज शहाणा होईल.

गेली अनेकवर्षे हिंदूसमाजाला मुसलमानसमाजाविषयी जो कटू अनुभव आला त्यामुळे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १९२५ साला पासून हिंदूंना जागरूक आणि संघटित करण्यासाठी केलेल्या सतत प्रयत्नांमुळे, हिंदु समाजामध्ये एकात्मभाव निर्माण होऊ लागला आहे, ही एक आशादायक बाब आहे; राजकीय स्वार्थापायी हिंदूसमाजात जन्मलेले कांही नेते, हिंदूंच्या एकात्म सामर्थ्यनिर्मितीला अद्यापहि विरोध करीत असतात. त्यांच्या त्या प्रयत्नांमुळें, हिंदूसमाजाला अद्यापहि विस्कळितपणामुळे होणारे तोटे सोसावे लागत असतात. परंतु पूर्वीच्या मानाने हिंदूसमाजात पुष्कळच जागृती निर्माण झाली आहे. हिंदूंची एकात्मतेची प्रक्रिया वेगवान होत राहील तसतसा मुसलमानांचा आक्रमक विस्तारवाद क्षीण होत जाऊन ते अंतर्मुख होऊ लागतील. हिंदूंच्या सामर्थ्याची जाणीव होऊन, अंतर्मुख होत असलेले कांहीं विचारवंत नेते मुसलमानसमाजात आता हळू हळू निर्माण होऊ लागले आहेत. या विचारवंतांना प्रोत्साहन मिळत राहील असा, प्रयत्नहि राष्ट्रीयवृत्तीच्या सर्वांकडून होणे आवश्यक आहे. गेल्या काहीं वर्षांत, हिंदू—मुसलमानांच्या दंग्यात, मुसलमानांना हिंदूंकडून जो तीव्र प्रतिटोला मिळाला, त्यामुळें हिंदूंच्या जागृत होऊलागलेल्या सामर्थ्याची कल्पना, सूज्ञ मुसलमाननेत्यांना आली आहे. ज्यांची

विचारशक्ती विशेष तीव्र आहे, त्यांनी मुसलमानसमाजाच्या भविष्यकालाचा वेध घेतला असून ते मुसलमानांच्या कल्याणाचे मार्ग दाखवू लागले आहेत. महाराष्ट्रांत श्री. हमीद दलवाई यांच्या प्रयत्नामुळें, मुसलमानसमाजात सत्यशोधनाची, समाजसुधारणेची जाणीव निर्माणकरणारे कार्यकर्ते हळू हळू पुढे येऊ लागले आहेत.

मुसलमानांनी जुनाट रुढींचा त्याग करावा, स्त्रियांच्या उन्नतीकडे लक्ष द्यावे, धर्मांचे नांवावर भडकाविणाऱ्या स्वार्थी मुल्ला-मौलवींचे नेतृत्व झुगारुन द्यावे, मुसलमानांनी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारावा, भारताच्या राष्ट्रीय जीवनप्रवाहाशी एकरुप व्हावे; असे विचार अत्यंत निर्भीडपणे मांडण्याचे काम, हे समाजसुधारक करीत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांमुळें मुसलमानसमाजात वैचारिक खळबळ होण्यास मोठीच मदत होणार आहे. न्या. छगला, न्या. हिदायतुल्ला, डॉ. एस् जिलानी, अन्वर देहलवी, बॅ. अंतुले असे अनेक मुसलमान विचारवंत, मुसलमानांमध्ये वैचारिक जागृती निर्माणकरण्याचा प्रयत्न करुलागले आहेत. अर्थात बहुतांश मुसलमानसमाज, अशिक्षित आणि धर्मांध असल्याने समाजसुधारकांना त्यांचा तीव्र विरोध होत आहे. कोणताहि समाज सहजासहजी आपल्या परंपरागत रुढी व कल्पना सोडावयास तयार होत नाही. समाजाला नवीदृष्टी देण्याचे काम वर्षानुवर्षे जनतेचा रोष सोसून करीत रहावे लागते. युरोपात धार्मिकसत्तेविरुद्ध पुनर्जागरणाची चळवळ ज्यांनी उभारली त्यांनाहि भयंकर छळ सोसावा लागला होता. हिंदूसमाजात सामाजिकसुधारणेचा प्रयत्न करणारांनाहि विरोध झाला होताच. मुसलमानसमाजात परिवर्तन घडविण्याचे कामतर त्यासर्वाहून कठीण आहे. कदाचित त्यासाठीं शंभर दीडशे वर्षेहि लागण्याचा संभव आहे. त्यासाठी हिंदूंनी स्वत:सामर्थ्यवान राहून, मुसलमानांची आक्रमक प्रवृत्ती बोथट करीत राहिले पाहिजे व मुसलमान समाजातील सुधारकांना प्रोत्साहन देऊन

निर्भयतेचे वातावरण राखण्याचा प्रयत्न सातत्याने करीत राहिले पाहिजे.

'बांगला देशच्या' निर्मितीमुळे मुसलमानांच्या एकत्वाच्या कल्पनेला चांगलाच धक्का बसला असण्याची शक्यता आहे. "जगातील सर्व मुसलमान एक असून ते केवळ अल्लाचीं सत्ता मानतात. तसेच सर्व मुसलमानांत समानता व बंधूभाव असतो," असा प्रचार आजवर करण्यात येत होता. परंतु पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी आपल्या पठाण, बलुची, पंजाबी मुसलमान सैनिकांकरवी, आपल्याच बंगाली मुसलमान बांधवावर जे पशुतुल्य अत्याचार केले, तसे अत्याचार जगातील अन्य कोणत्याच धर्मांचे लोकांनी स्वधर्मीयावर केलेनसतील. पाकिस्तान निर्मितीचे वेळी इस्लामच्या एकत्वाची आरोळी ठोकण्यात बंगाली मुसलमान आघाडीवर होते. परंतु कैवळ पंचवीस वर्षांचे काळांत त्यांना मुसलमानी राजवटीच्या राक्षसी आवताराचा अनुभव येऊन, पश्चाताप करण्याची पाळी आली. भारतातील मुसलमानांच्या डोळ्यावर अद्यापहि मुसलमानीएकतेची झापड आहे. त्यामुळे बंगाली मुसलमानांबद्दल ते अद्याप मुग्ध आहेत. मात्र त्यांचेतील विचारवंत नागरिकांच्या डोक्यात, बंगालच्या अनुभवावरुन, किंचित प्रकाश पडला असण्याची शक्यता वाटते. काळाच्या ओघात भारतीय मुसलमानांचा दृष्टिकोन स्पष्ट होईलच.

एक गोष्ट मात्र निश्चित, कीं मुसलमानसमाजात सामाजिक सुधारणा करण्याचे काम हाती घेतलेल्यां श्री. हमीद दलवाई आदि पुढाऱ्यांना. "बांगला देश" प्रकरणामुळे, कार्यवाढीला अनुकूल परस्थिती निर्माण करुन दिली आहे. त्या परिस्थितीचा ते पुरेपूर उपयोग करुन घेऊन भारतातील मुसलमानांना राष्ट्रीय दृष्टिकोन देण्यात यशस्वी व्हावेत, अशी अपेक्षा आपण करू या.

मुसलमान समाजाला राष्ट्रीय दृष्टी देण्याची व सामाजिक सुधारणांना गती आणण्याची सर्वांत जास्त जबाबदारी भारतातील राज्यकर्त्यांनी उचलली पाहिजे. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसपक्षाच्या हातात भारताची केंद्रीय सत्ता आली. परंतु त्या शासनाने, ही जबाबदारी उचलण्याचे पद्धतशीरपणें टाळले.

भारताच्या राज्यघटनेनुसार सर्व नागरिकांची सामाजिक पातळी समान असल्याचे तत्व मान्य करण्यात येऊनसुद्धा, समाज सुधारणेचे कायदे करताना, मुसलमान समाजाला वळण्यात आले. हिंदूकोडानुसार, हिंदूसमाजातील जुनाट रुढींना कायद्याने प्रतिबंध करण्यात आला. परंतु हिंदूपेक्षा कितीतरी पटीने जुनाट आणि प्रतिगामी असलेल्या मुसलमानी कायद्यात, कोणताहि बदल, मुसलमानांच्या धर्मार्थांना भिऊन करण्यात आला नाही.

राज्यकर्ते आपल्याला भितात असे लक्षात आल्यामुळे, मुसलमान मुल्ला-मौलवींनी सतत अरेरावी करुन, आपल्या समाजाला कावूत ठेवले आहे. इंग्रजांनी स्वतःच्या राज्यशासनाला अडथळा येऊ नये म्हणून भारतीय जनतेच्या धर्मांत ढवळा-ढवळ न करण्याचे धोरण जाहीर केले. परंतु त्यांचे ते धोरण व्यवहारात पक्षपातीपणे अमलात आणले जात असे. हिंदूंची कुरापत काढण्याला मुसलमानांना मुद्दाम चिथावणी दिली जाई, व कुरापतीला विरोध करण्यास 'हिंदू सिद्ध झाले, कीं त्यांचेवरच गोळीबार, सामुदायिकदंड व कायद्याचे निर्बंध लादले जात. इंग्रजांनी दिलेल्या पक्षपाती वागणुकीमुळें, हिंदुसमाज भित्रा बनला व मुसलमान शेफारले. हिंदूंवर अन्याय करणे हा आपला हक्क आहे, असे त्यांना वाटू लागले. अशा तऱ्हने अन्यायाने प्रस्थापित केलेले हक्क म्हणजे धर्म नव्हे. पण स्वातंत्र्यानंतरहि "मुसलमानांचे अन्याय हक्क हाच त्याचा धर्म आहे" अशी चुकीची भूमिका काँग्रेसपक्षीय राज्यकर्त्यांनी स्विकारली. त्यामुळें इंग्रजी राजवटीत मुसलमानांची जी अन्यायी वृत्ती होती तीच

कायम राहिली. मुसलमानांच्या मशिदीसमोर हिंदूंनी वाद्ये वाजवू नयेत, रहदारीला अडथळा आणणारे पीरसुद्धा काढू नयेत. मुसलमानाला गुलाल किंवा रंग लावू नये. असले " अन्यायकारक हक्क म्हणजे मुसलमानांचा धर्म " असे समजले जाऊन इंग्रजां-प्रमाणेच कॉंग्रेसी राज्यकर्तेहि हिंदूंना शिक्षा करु लागले. परिणाम असा झाला कीं प्रत्येक मशीद आणि प्रत्येक पीर, एवढेच नव्हे तर प्रत्येक मुसलमान हा कोणीतरी विशेष हक्कदार आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली.

मुसलमानांचा विवाहविषयक कायदा, त्यांच्या स्त्रियांनाहि अन्याय करणारा आहे. पण त्या कायद्यात दुरुस्ती करण्याची हिंमत कॉंग्रेसी राज्यकर्त्यांनी दाखविली नाही. त्यामुळें कुटुंब-नियोजन, लोकसंख्या नियंत्रण ही बाब फक्त हिंदूपुरती सीमित राहिली. एकावेळी चार बायका करण्याची सवलत मुसलमानांच्या धर्मग्रंथात असल्याचे सांगतात. पण ते धर्मग्रंथ ज्या देशात, ज्या कालात, ज्या सामाजिक परिस्थितीत निर्माण झाले, त्यांचा विचार करुनच त्यातील आज्ञा प्रमाण मानल्या पाहिजेत हा बुद्धिवादी दृष्टिकोन मुसलमानांना स्वीकारायला शिकविले पाहिजे. धर्माची ढाल पुढे करुन जर ते जुनाट रुढींना कवटाळून बसणार असतील, तर त्यांना कायद्याने सुधारणा करायला भाग पाडले पाहिजे. अशा तऱ्हेचा सुधारणा-कायदा करण्यास मुसलमानसमाज संघटित विरोध करु लागल्यास हिंदूंचा संघटित पाठिंबा, सरकारने स्वतःच्या पाठीशी उभा करुन मुसलमानांची संघटित गुंडगिरी हाणून पाडली पाहिजे.

सरकारने आणखी एक कर्तव्य कठोरपणाने पाळले पाहिजे. मुसलमानांच्या मशिदींचा उपयोग त्यांचे पुढारी राजकीय प्रचारासाठी करतात. तसेच मुल्ला-मौलवीलोक मशिदीत शस्त्रसाठा करुन दंगल करण्यास मुसलमानांना चिथावणी देतात.

या दोन्ही कारणांनी, प्रत्येक मशीद म्हणजे एक अशांततेचा अड्डाच होऊन बसतो. यासाठीं ज्या मशिदीत राजकीय प्रचार केला जाईल व ज्या मशिदीजवळ दंगल होईल, तिला धार्मिकस्थान म्हणून असलेली मान्यता सरकारने काढून घेतली पाहिजे. थोडक्यात "गुंडगिरी म्हणजे धर्म" अशी जी मुसलमानांची विकृत समजूत बनली आहे, ती दूर होईपर्यंत सरकारने कठोर धोरणाचा अवलंब केला पाहिजे.

हिंदूंचे दृढ संघटण, सरकारचे निःपक्षपाती धोरण आणि राष्ट्रीय वृत्तीच्या मुस्लिम समाजसुधारकांचे प्रयत्नांना प्रोत्साहन या तीनहि मार्गांनी मुसलमानांची विचारशक्ती जागृत करणे, म्हणजेच मुसलमानांच्या भारतीयकरणासाठी प्रयत्न करणे होय. हे काम ज्या गतीने होईल त्या प्रमाणात भारतदेश बलसंपन्न व समृद्ध होत जाईल. लोकशाहीमध्यें प्रत्येक व्यक्तीच्या मताला किंमत असते. त्यानुसार मुसलमानांच्या मतालाही किंमत आहे. परंतु आजतरी आपल्या हक्काचा उपयोग मुसलमान-समाज योग्यप्रकारे करीतअसताना दिसत नाही. कारण 'विचार स्वातंत्र्य' हा जो लोकशाहीचा मूळ आधार आहे, त्याचेच अस्तित्वच मुसलमानसमाजात नाही. मुसलमानांची विचारशक्ती जागृत झाल्याशिवाय त्या समाजात विचारस्वातंत्र्याचें वारे खेळणार नाही. म्हणून लोकशाही राज्यव्यवस्थेच्या निकोप वाढीसाठीहि, 'मुसलमानांचे भारतीयकरण, ही आवश्यक बाब आहे.

• • • •

प्रकरण ७ वे

# राष्ट्रवाद आणि कम्युनिस्ट

इ. स. १९१७ मध्यें रशियात झालेल्या राज्यक्रांतीपासून कम्युनिझम् नावाची विचारसरणी जगात प्रबळ होऊ लागली. या विचारसरणीचा दावा असा कीं जगाच्या पाठीवर असलेल्या सर्व मनुष्यजातींचे विभाजन फक्त दोन वर्गांत झालेले आहे. त्यापैकी एक वर्ग आर्थिक पिळवणूक करणारांचा म्हणजे भांडवलदारांचा (बूर्ज्वा) वर्ग असून दुसरा वर्ग पिळलेजाणाऱ्यांचा म्हणजे कामगारांचा (प्रोलेटरिएट) असतो. याखेरीज माणसामाणसात भेद दाखविणारे सर्वविचार म्हणजे राष्ट्र, धर्म, जात, पंथ, रंग, रुप, वंश, हे सर्व कल्पित आणि त्याज्य आहेत. तसेच स्त्री-पुरुषांचे, राजा व प्रजायांचे संबंध हेसुद्धा कृत्रिम-कल्पनांतून निर्माण करण्यात आले आहेत. जगातील वेगवेगळ्या राज्यपद्धती उदा. लोकशाही, राजेशाही, हुकुमशाही, लष्करशाही यासर्व भांडवलदारवर्गाने स्वतःच्या आर्थिक हितसंबंधाचे रक्षण

करण्यासाठी उभारलेल्या फसव्या चौकटी असल्याने त्या सर्व त्याज्य आहेत. जगातील सर्व कामगारवर्ग एक असून त्याचे व जगातील भांडवलदारवर्गाचे एक जागतिक युद्ध, समाजरचनेच्या प्रारंभापासून चालू आहे. सर्व कामगार एक होऊन त्यांनी आपल्या संघटित बळावर सर्व भांडवलदार व त्यांनी निर्माण केलेल्या कृत्रिम, काल्पनिक चौकटी यांचा नाश केला पाहिजे. जगात असलेल्या दोन वर्गांपैकी भांडवलदारांचा वर्ग नष्ट होऊन फक्त कामगारांच्या हातात उत्पादनाची सर्व साधने व व्यवस्था आणणे हाच जगातील सर्व दुःखे, विषमता आणि अशांतता यावर एकमेव ( रामबाण ) उपाय आहे. याच मार्गाने मानवजातीचा पूर्ण विकास होऊन, शाश्वत भौतिकसुख तो प्राप्त करु शकेल. " प्रत्येकाच्या कुवतीनुसार ( उपभोग ) पासून प्रत्येकाच्या गरजेनुसार ( मनसोक्त उपभोग ) या तत्वाकडे " असे कम्युनिझमच्या सारतत्त्वाचे थोडक्यात सूत्रीकरण ,करण्यात आले आहे.

जगाच्या घडामोडीकडे पहाण्याची कम्युनिस्ट तत्वज्ञानाची दृष्टी ही पारंपरिक दृष्टिकोनाहून सर्वथा भिन्न असल्याने जीवन-साफल्यविषयक ज्या ज्या कल्पना आजपर्यंतच्या इतिहासात पुढे आल्या त्या सर्व कम्युनिझमने त्याज्य ठरविल्या आहेत. राज्यव्यवस्था, न्यायपद्धती, समाजरचना, संस्कृती, वाङमय, धर्म, तत्वज्ञान यासंबंधी आजपर्यंत करण्यात आलेली मांडणी कम्युनिस्टांच्या आर्थिक व भौतिक निकषानुसार पूर्णपणें त्याज्य ठरविण्यात आली आहेत. परंपरेशी नाते तोडलेले असे एक नवे, स्वयंभू विश्व साकार करण्याचे उद्दिष्ट कम्युनिस्टांनी स्वीकारले आहे.

हे सर्व विवेचन " आदर्श कम्युनिस्ट समाजरचनेचे " आहे. परंतु अशा आदर्श अवस्थेला पोहोचण्यापूर्वी व्यवहारांत टप्प्या टप्प्यानेच पुढें जावे लागणार; असे कम्युनिस्ट विचाराचे लोक मानीत

असल्याने, त्या टप्प्यांपैकी एक टप्पा म्हणून ते रशियातील राज्यक्रांतीला पहिला मान देतात. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाच्या निकट असलेल्या चीन देशातहि कम्युनिझम्‌चा स्वीकार केलेली राज्यव्यवस्था सुरु झाली. त्यानंतर युगोस्लाविया, पोलंड, हंगेरी, रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया, अल्बानिया, पूर्वजर्मनी या पूर्वयुरोपातील देशांत रशियाच्या प्रभावाने व उत्तर कोरिया, उत्तर व्हिएटनाम या देशांत चीनच्या प्रभावाने कम्युनिस्टांची राज्यव्यवस्था स्थापन झाली. याशिवाय ब्रह्मदेश, लंका, क्युबा इ. देशातहि कम्युनिस्ट विचारसरणी मानणाऱ्या राजवटी आल्या. अशातऱ्हेने पन्नास वर्षाच्या कालावधीत जवळ जवळ एकतृतीयांश जग कम्युनिस्टविचाराच्या अंकित झाले,

कम्युनिस्ट विचारसरणीचा इतक्या विस्तृत क्षेत्रावर प्रभाव निर्माण झाल्याने त्या विचारसरणीचा इतर देशातहि परिणाम होऊ लागला. भारतदेश हा तर पूर्वीपासूनच नव्या नव्या विचारांना वाव देणारा असल्याने कम्युनिझमचा विचार स्वीकारणारा एक गट भारतातहि निर्माण झाला. गेल्या पन्नास वर्षात त्या विचाराने भारतात बराच जम बसविला आहे. भारतातील दोन राज्यात (केरळ व पश्चिमबंगाल) कम्युनिस्ट पक्षाला राज्य करण्याची संधीहि मिळू शकली. शिवाय इतरहि राज्यात संयुक्त आघाड्यांमार्फत त्या पक्षाचे कार्यकर्ते राज्यावर येऊ शकले. सन १९६९ मध्यें कॉंग्रेसपक्षात जी दुफळी झाली, तिच्यानंतर सत्तारुढ गटावर कम्युनिस्ट विचाराचे चांगलेच प्रभुत्व स्थापन झाले. एकंदरीत कम्युनिझमच्या विचारसरणीने भारतात चांगलाच जम बसविण्यात यश मिळविले.

सन १९६३ पासून कम्युनिस्ट पक्षाच्या जागतिक एकोप्याला दुहीचे खिंडार पडू लागले. रशिया व चीन या दोन प्रचंड देशातील कम्युनिस्ट राज्यकर्ते एकमेकाशी भांडू लागले.

त्यामुळे सर्व जगात एकाच एका पक्षाचे राज्य आणण्याच्या कम्युनिस्टांच्या मूळ उद्दिष्टाला मोठाच धक्का बसला. तत्पूर्वीही पूर्व-युरोपातील युगोस्लाव्हिया जागतिक कम्युनिस्ट धोरणापेक्षा वेगळीअशी स्वतंत्र धोरणे आखू लागला होता. पूर्वयुरोपातील पोलंड, हंगेरी, पूर्वजर्मनी, झेकोस्लोव्हाकिया या राष्ट्रांनीहि हळू हळू स्वतंत्र धोरणे आखण्यास सुरवात केली होती. अर्थात ही राष्ट्रे रशियाच्या तुलनेने सामर्थ्यात कमी असल्याने त्यांच्या स्वतंत्र वाटचालीचा फारसा परिणाम जगातील इतर देशातील कम्युनिस्टांच्या धोरणावर झाला नव्हता. सन १९६३ मध्ये चीनदेशाने जेव्हा रशियाचे नेतृत्व झुगारुन देऊन स्वतंत्र वाटचाल सुरु केली, तेव्हा कम्युनिस्टांची राजवट ज्या देशांत नाही अशा देशांतील कम्युनिस्टपक्षहि दुभंगले. कम्युनिस्टांच्या विचारसरणीला आधार देणारी दोन शक्तिकेंद्रे एकमेकाच्या विरुद्धदिशेने वाटचाल करु लागली.

सर्व जगावर एकाच वर्गाची सत्ता प्रस्थापित करण्याची कम्युनिझमची घोषणा व्यवहाराच्या कसोटीवर घासण्याचा प्रसंग येताच तिच्यातील अव्यवहार्यतेचे पैलू जगापुढे भराभर येऊ लागले. कम्युनिस्ट सत्तेखालील राष्ट्रे आपापल्या स्वतंत्र राष्ट्रीय दृष्टिकोनातून कम्युनिझम्च्या उपयुक्ततेकडे पाहू लागली. राष्ट्रहिताला प्राधान्यदेणारे हे दृष्टिकोन परस्परविरुद्ध टोकाचे ठरु लागले. चीन आणि रशिया हे एकमेकांना प्रतिगामी ठरविण्यात स्पर्धा करु लागले (प्रतिगामी, फेरविचारवादी, साम्राज्यवादी, भांडवलदारधार्जिणे, प्रतिक्रांतिवादी, मध्यमवर्गीय सुधारणावादी, हे शब्द कम्युनिस्टलोक आपल्या विरोधकांना शिव्या म्हणून वापरतात.) दोघांनीहि देशोदेशी आपले हस्तक शोधून त्यांच्यामार्फत आपणच खरेमार्क्सवादी (म्हणजे कम्युनिस्ट) आहोत असा प्रचार करण्याचा व दुसऱ्यावर तोंडसुख घेण्याचा धडाका चालू केला. रशिया आणि चीन हे दोघेहि सार्वभौम, अणुशस्त्रानीयुक्त असे शेजारीदेश

त्यामुळे त्या दोघांत प्रत्यक्ष लढाईची तयारी सुरु झाली. दोघांची सरहद्द दोन हजार मैल एकमेकांना लागून असल्याने सरहद्दीवरील खुणा ठरविण्यावरुन सन १९६७-६८ मध्ये प्रत्यक्ष लढाई झाली. राष्ट्रीय अहंकारापुढें कम्युनिझमची सर्व तत्वे फिकी पडतात असे जगाच्या दृष्टोत्पत्तीस आले.

कम्युनिझम्च्या सर्व तत्वज्ञानाची चर्चा येथें थोडक्यात करता येणार नाही. त्यासाठी एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. त्या तत्वज्ञानाचे समर्थन करणारे व खंडण करणारे असे दोन्ही प्रकारचे वाङमय गेल्या साठ सत्तर वर्षात विपुल प्रमाणात प्रसिद्ध झाले आहे. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपखंडात संपत्तीच्या केंद्रीकरणामुळे सामाजिक परिस्थितीत बदल झाला. यांत्रिक साधनांनी प्रचंड उत्पादन होऊ लागल्याने, पूर्वीचे मानवीशक्तीवर चालणारे व्यवसाय बंदपडले. उद्योग धंद्यांचे केंद्रीकरण शहरात होऊ लागल्याने खेडी ओस पडून लक्षावधी बेकार लोकांचे लोंढे शहराकडे येऊ लागले. उत्पादनवाढीच्या स्पर्धेमुळे कामगारांची पिळवणूक होऊ लागली. गलिच्छ वस्त्यांमध्ये लाखोलोक राहूलागल्याने अनारोग्य, अनीती इ. दुर्गुणांचा फैलाव होऊ लागला. प्रचंड संपत्तीवाल्या भांडवलदारांचा एक वर्ग निर्माण होऊन तो आपणास पाहिजेतशी शासनयंत्रणा राबवू लागला. कामगारवर्ग मात्र सर्व प्रकारच्या सवलतीपासून वंचित राहू लागला. राजेशाही, सरंजामशाही, भांडवलदार, जमीनदार, आणि धर्मगुरु यांनी संगनमत करुन शेतमजूर, कामगार, बुद्धिजीवी आणि लहान व्यावसायिकांची पिळवणूक सुरु केली. यातूनच फ्रेंच राज्यक्रांतीचा भडका उडाला. परंतु त्या क्रांतीनंतर माजलेल्या अराजकातून नेपोलियन उदयाला येऊन पुन्हा साम्राज्यवाद बळावला. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, येथे राज्यक्रांत्या होऊन लोकशाही उदयास आली. परंतु औद्योगिक क्रांतीने विस्कटलेली आर्थिक व सामाजिक घडी त्वरित नीट बसविण्यास

लोकशाहीचा दीर्घसूत्री कारभार योग्य ठरेना. अशा कालखंडात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मार्क्सचे तत्वज्ञान उदयास आले.

मार्क्सच्या विचारसरणीचा सर्वात मोठा लाभ जर कोणास झाला असेल तर औद्योगिक कामगारांनी आपले संघ स्थापन करुन संपत्तीच्या वितरणातील आपला हिस्सा संघटणेच्या बळावर प्राप्त करण्यास सुरुवात केली. "संपत्तीच्या विषम वाटणीवर कामगारांच्या संघटित श्रमशक्तीचा उतारा लागू पडतो" हे लक्षात येतांच सर्व क्षेत्रातील कष्टकरी संघटित होऊ लागले; व त्यांनी शासनयंत्रणेवर आपल्या शक्तीचा दबाव निर्माण केला. इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी इ. देशांत मजुरांनी आपले राजकीय पक्ष निर्माण केले. त्या पक्षांमार्फत राज्ययंत्रणेंत कामगारांच्या सोयीचे अनेक कायदे करुन घेतले.

मार्क्सने कम्युनिस्ट क्रांतीविषयी असा आडाखा व्यक्त केला होता की, "औद्योगिक दृष्टया प्रगत असलेल्या राष्ट्रात कामगारांच्या संघटणा प्रबळ करणे सोपे असल्याने, त्या देशांत कामगारवर्गाची एकवर्गीय राज्यव्यवस्था व समान उपभोगावर आधारलेली समाजव्यवस्था प्रथम निर्माण होईल." परंतु त्याचा हा आडाखा चुकीचा ठरला व युरोपात औद्योगिक दृष्टया सर्वात मागे असलेल्या कृषिप्रधान रशियात कम्युनिस्ट क्रांती सर्वातआधी सफल झाली, त्या उलट इंग्लंड, अमेरिका, जर्मनी ही औद्योगिक प्रगतीत अग्रेसर असलेली राष्ट्रे कम्युनिझम्-पासून दूर राहिली.

कम्युनिझमचा हा इतिहास थोडक्यात येथे देण्याचे कारण असे की, "आर्थिकविकासाचे पूर्ण तत्वज्ञान आपणास सापडले असून समाजरचनेची भावी उभारणी त्याच आधारावर होणार

आहे," असा जो मार्क्सने दावा मांडला तो एकांगी होता; हे आपल्या लक्षात यावे. अर्थातच् चुकीची गृहीतकृत्ये आधारभूत धरुन रचलेल्या सिद्धांताचे निष्कर्षही चुकीचेच असणार. त्यामुळे मानवाच्या समग्रजीवनाच्या विकासाचे म्हणजे शरीर, मन, बुद्धी, आणि आत्मा यांच्या विकासाचे तत्वचिंतन ज्या भारतीय तत्वज्ञानात ग्रथित आहे त्याच्या अभ्यासकांना मार्क्सचे निष्कर्ष चुकीचे ठरले याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पण दुर्दैवाने भारतीय तत्वचिंतनाचा अभ्यास करण्याचे परिश्रम खुद्द भारतातील विचारवंतच करीनासे झाले. त्यामुळे मार्क्सची एकांगी गृहीतके खरी मानणारा एक वर्ग भारतातहि तयार झाला. युरोपात औद्योगिक क्रांती होऊन समाजरचनेचे नवे नवे सिद्धांत पुढे येत होते. अशा काळात भारतदेश इंग्रजांच्या राजवटीखाली गेलेला असल्याने व भारतीय दर्शनशास्त्राचा फारसा परिचय पाश्चात्य पंडितांना त्याकाळी झालेला नसल्याने त्यांची तत्वज्ञानाची मांडणी सामान्यतः एकांगीच झालेली आहे.

युरोपात ख्रिश्चन धर्माचा प्रसार झाल्यानंतर ग्रीकांनी सुरु केलेली तत्वचिंतनाची परंपरा जवळ जवळ खंडित झाली. ख्रिश्चनधर्मात अनेक पंथ उपपंथ पुढे निर्माण झाले, तरी त्या पंथांनी बायबलमधील उपदेशाचा परीघ ओलांडण्याचा प्रयत्न केला नाही. कारण त्या उपदेशाबाहेर कोणी जाऊ लागल्यास इन्क्विझिशन ( धार्मिक कोर्ट ) कोर्टामार्फत त्यांचा भयंकर छळ करण्यात येऊन मृत्युदंड दिला जात असे. भारतात तत्वचिंतकांचा छळ कधीच होत नव्हता. त्यामुळे ईश्वरनिर्मित ( अपौरुषेय ) मानल्या जाणाऱ्या वेदाज्ञांना झुगारुन देणारी बौद्ध, जैन आदि दर्शने ( तत्वज्ञानेसुद्धा ) भारतात सुलभतेने प्रचारात व व्यवहारात येऊ शकली.

मार्क्सने जगाचा संपूर्ण विकास भौतिक प्रक्रियेतून म्हणजे " क्रिया-प्रतिक्रिया किंवा विरोधविकास पद्धतीने झाला असल्याची "

मांडणी करुन आत्मा, चैतन्य किंवा भावविश्व याचे अस्तित्वच नाकारले. त्यामुळें त्याच्या तत्वज्ञानावर आधारुन उभी केलेली समाजव्यवस्था व तिच्यावर नियंत्रण ठेवणारी राज्यसंस्था किंवा कम्युनिस्ट पक्ष मानवाला जडपदार्थ समजून त्याच्या कल्याणाच्या योजना आखू लागले. पण कम्युनिस्टांच्या मानण्या न मानण्यावर जगातील मानवी क्रिया थोड्याच अवलंबून राहणार? मनुष्याचे भावविश्व चैतन्याच्या अनुरोधाने कार्यरत झाले. त्यातील राष्ट्रीय अहंकार, वंशश्रेष्ठता इत्यादी विकार जागृत झाले. त्यामुळें एकाच कम्युनिस्ट विचारसरणीचे विविध राष्ट्रागणिक वेगवेगळे अविष्कार आता दृष्टोत्पत्तीस येऊ लागले आहेत. रशियन कम्युनिझम् लेनिनच्या मार्गाने, चिनी कम्युनिझम् माओत्सेंतुंगच्या मार्गाने, युगोस्लाव्हियाचा कम्युनिझम् टिटोच्या मार्गाने, व्हिएटनामचा होचिमिन्हच्या मार्गाने, तर क्युबाचा फिडाल कॅस्ट्रोच्या मार्गाने वाटचाल करु लागल्याचे दृश्य दिसू लागले आहे.

वास्तविक या सर्व घडामोडी अगदी निसर्गक्रमानुसार होत आहेत. मार्क्सने प्रतिपादिलेल्या विश्वकुटुंबवादाशी त्यांचा कांहींहि संबंध राहिलेला नाही. पण कांहीं धर्मपंथ जसे आपलाच प्रेषित आणि आपलाच ग्रंथ तेव्हढा श्रेष्ठ अशी अंधश्रद्धा शिकवितात, तसेच मार्क्सच्या पंथाचे झाले आहे. सूर्यापेक्षा त्याच्या उन्हाने तापलेली वाळूच अधिक तापदायक ठरते असा अनुभव येतो. त्याप्रमाणे कम्युनिस्ट राज्यपद्धती स्वीकारलेल्या राष्ट्रातील कम्युनिस्टांपेक्षा, त्याराष्ट्राच्या प्रभावाखाली असलेले इतर राष्ट्रातील कम्युनिस्टपक्ष हे अधिक तापदायक ठरतात. भारतात असलेल्या कम्युनिस्ट पक्षाचे तीन तुकडे झालेले आहेत. एक रशियाच्या प्रभावाखाली, दुसरा चीनच्या प्रभावाखाली व तिसरा अनिश्चित भूमिकेत आहेत. या तिघांचे एकमेकाशी वैर आहेच पण एका बाबतीत त्यांचे एकमत आहे. आणि ती बाब म्हणजे भारताच्या राष्ट्रीय स्वाभिमानाचे तिघेहि शत्रू आहेत.

जागतिक राजकारणाच्या संदर्भात भारताचे जोपर्यंत रशियाशी जुळते हितसंबंध असतात तोपर्यंत रशियावादी कम्युनिस्ट भारतसरकारला पाठिंबा देतात. दुसऱ्यामहायद्धात रशिया व इंग्लंड यांची मैत्री होताच भारतातील कम्युनिस्टांनी भारतातील परक्या इंग्रजराजवटीला सुद्धा पाठिंबा दिला होता. वास्तविक इंग्रजी राजवट म्हणजे पक्का साम्राज्यवादी, भांडवलशाहीवादी व भारताची पिळवणूक करणारी होती. तिला विरोध करणे हे प्रत्येक भारतीयाचेच नव्हे तर कम्युनिस्टांचे सुद्धा कर्तव्य असावयास पाहिजे होते. पण "कम्युनिझम् म्हणजे रशिया" असे विचित्र समीकरण मनात ठेवल्याने रशियाचे हितासाठी भारतीय कम्युनिस्टांनी स्वदेशाशी बेइमानी केली.

चीनवादी कम्युनिस्टांचा प्रकारहि असाच आहे. चीनने भारतीय सरहद्दीवर आक्रमण करुन हजारो चौरस मैलाचा प्रदेश बळकावला. चीनचे हे कृत्य निखालस अन्यायाचे व दांडगाईचे होते. भारताने चीनची कोणतीही आगळिक कधी केलेली नव्हती. उलटपक्षी चीनला राष्ट्रसंघात प्रवेश मिळावा म्हणून भारताने सतत प्रयत्न चालू ठेवले होते. असे असूनहि चीनच्या अन्याय्य कृतीला भारताने विरोध करताच भारतातले चीनवादी कम्युनिस्ट भारताच्या स्वाभिमानाला विसरुन भारताचीच निंदा करु लागले.

बांगला देशात पाकिस्तानच्या धर्मांध राज्यकर्त्यांनी स्वत:च्या बांधवावर पशुतुल्य अत्याचार केले. पण चीनवादी कम्युनिस्टांनी बांगला देशातील पीडित जनतेची बाजू घेण्याऐवजी पाकिस्तानी हुकुमशाहीला पाठिंबा दिला. कारण काय, तर पाकिस्तान आणि चीन यांचे सख्य आहे म्हणून. म्हणजे न्याय, नीती, देशहित इत्यादी तत्वे विचारात न घेता केवळ अंधपणाने चीनचे अनुकरण करुन भारतातील कम्युनिस्टांनी स्वत:च्या देशाशी बेइमानी केली.

" नक्षलवादी " नावाचा एक जहाल पंथ कम्युनिस्टपक्षात निर्माण झाला आहे. हा पंथ पूर्णपणे चीनवादी आहे. या पंथातील कार्यकर्ते आपल्या विरोधकांना एकटे दुकटे गाठून त्यांचे खून करतात. जमीनदार, सावकार, व्यापारी, सरकारी-अधिकारी यांच्या तर ते कत्तली करतातच शिवाय कम्युनिस्ट पक्षातील जहालवाद न मानणारे असे जे सौम्य वृत्तीचे कार्यकर्ते आढळतील त्यांनाही ते ठार मारतात. त्यांच्या या आततायी कृत्यांपायी खुद्द कम्युनिस्टविचाराचे शेकडो अनुयायी निष्कारण प्राणास मुकले आहेत. मनोविकृतीचा इतका आत्मघातकी आविष्कार दुसऱ्या कोणत्याही विचारपंथाने आचरलेला नाही. थोड्याशा मतभेदाकरिता मृत्युदंडाची शिक्षा देणे हा विचित्र न्याय आहे !

या सर्व विकृतींच्या मुळाशी एखाद्या विचारावरील किंवा ध्येयवादावरील प्रेम असते तरी आपण त्याचा सहानुभूतीने विचार करु शकलो असतो. परंतु विचारावर प्रेम आणि परक्या राष्ट्रावरील प्रेम यात फारच फरक आहे त्यातहि ते परराष्ट्रप्रेम आंधळे असले म्हणजे त्यातून अनर्थच ओढवतो. उदा. रशियन सरकार जोपर्यंत जनकल्याणाचे कार्यक्रम पार पाडीत असेल अथवा जगातील पीडित आणि गुलामगिरीत पडलेल्या राष्ट्रांची बाजू घेत असेल तोपर्यंत त्याचा गौरव करण्यात किंवा त्यांच्या त्या कृतीवर प्रेम करण्यात वावगे काही नाही. परंतु ते सरकार स्वतःच्या देशात कत्तली करीत आहे, इतर देशातील उदा. हंगेरी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया इ. देशातील स्वातंत्र्यावादी जनतेची चळवळ रणगाडे घालून चिरडून टाकीत आहे, अशा वेळीहि रशियन सरकारच्या कृतीचे समर्थन करणे याला आंधळे प्रेम म्हणावे लागेल. चीनने तिबेटी जनतेवर अत्याचार केले तरी त्याची भलावण करणे हे सुद्धा अंधभक्तीचेच उदाहरण आहे. अशा प्रकारचे अंधप्रेम भारतातील कम्युनिस्ट पक्ष करतात असे अनेकवेळा अनुभवास आले आहे.

असे हे अंध परकीयभक्त हा आपल्या राष्ट्राला मोठा धोका आहे. कारण ते परप्रेमापोटी स्वबांधवांचा बुद्धिभेद करतात. अन्यायाची भलावण करण्याकडे जनतेची बुद्धी वळवितात व वर उल्लेखिलेल्या कांही प्रसंगाप्रमाणे स्वत:च्या राष्ट्राचा घात करण्यासहि त्यापायी उद्युक्त होतात. अशातऱ्हेच्या राष्ट्रघातकी परकीय हस्तकांचे चाळे प्रामुख्याने द्रव्याच्या लोभाने चालू असतात. चीनवादी कम्युनिस्टांना चीनकडून, रशियावादी कम्युनिस्टांना रशियाकडून भरपूर आर्थिक मदत मिळते. त्यांना रोकड पगार तर मिळतोच शिवाय त्या त्या राष्ट्राच्या व्यापारी कंपन्यांतून कमिशन मिळते. फुकट यंत्रसामुग्री मिळते. वृत्तपत्रांना भारी किंमतीच्या जाहिराती देऊन त्या रकमा हस्तकांना दिल्या जातात. निरनिराळ्या नामधारी संस्था काढून त्यांना सहाय्य दिले जाते. शिवाय परदेशचे मोफत दौरे, निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय परिषदांवर प्रतिनिधित्व देणे अशा विविध मार्गांनी त्या त्या देशांच्या वकिलातीमार्फत भारतातील आपल्या हस्तकांना पैसे दिले जातात.

द्रव्याच्या लालसेने परकीयदेशाचे हस्तक होणाऱ्या या लोकांत अनेक लेखक, कवी, साहित्यिक, डॉक्टर. वकील, प्रकाशक, संपादक असे समाजात प्रतिष्ठा पावलेले स्त्रीपुरुष असतात. स्वत:चा संसार सुखाने चालावा यासाठी आपली प्रतिष्ठा ते परक्यांच्या चरणी कामाला लावतात. समजून उमजून राष्ट्रद्रोह करणारा एक असा मोठा वर्ग आज भारतात आहे. या वर्गाचे भारतीयकरण करणे ही बाब मुसलमानांचे भारतीयकरण करण्याइतकीच महत्त्वाची आहे. देशातील जनतेत राष्ट्रप्रेमाची प्रखर भावना सतत जागृत ठेवणे व परकीय हस्तकांचे चाळे सतत उजेडात आणून त्यांना निष्प्रभ करणे हाच त्यावर उपाय आहे.

देशहिताची खरी काळजी घेऊ इच्छिणाऱ्या राज्यकर्त्यांनीही अशा परधार्जिण्यावर नजर ठेवून त्यांच्या कृतीला सर्व मार्गांनी

पायबंद घालीत राहिले पाहिजे. देशांतर्गत सत्तास्पर्धेच्या राजकारणात कधी कधी या परधार्जिण्यांचे सहाय्य मोठे फायद्याचे ठरते. त्यामुळे त्यांना जवळ करण्याचा मोह राष्ट्रवादी पक्षांनाही होतो. अशा संधीचा लाभ घेऊन परधार्जिणे कम्युनिस्ट, सत्तेवरील मोक्याच्या जागा पटकवितात. विशेषतः प्रचारयंत्रणेवर ते ताबा मिळवितात व त्या साधनांनी संपूर्ण राज्ययंत्रणा आपणास पाहिजे असलेल्या (म्हणजे लाच देणाऱ्या) परराष्ट्राच्या तालावर नाचविण्याच हेतू साध्य करतात. परधार्जिण्यांची ही धूर्त चाल लक्षात घेऊनच त्यांच्याशी अत्यंत सावधगिरीने संबंध ठेवणे व त्यांचे वर्चस्व राष्ट्रात वाढू न देणे हाच त्यावर उपाय आहे.

●●●·●

प्रकरण ८ वे.

# लोकशाही (भारतीय स्वरूप)

भारताने लोकशाही पद्धतीचा स्वीकार राज्यवस्थेसाठी केला आहे. इंग्लंडमध्ये प्रचलित असलेल्या बहुमताच्या लोकशाहीचेच अनुकरण येथे करण्यात आले आहे. लोकशाहीचे विविध प्रकार जगात प्रचलित आहेत. इंग्लंडमधील लोकशाही राजाच्या नावाने कारभार करते. रशियात कम्युनिस्ट पक्षामार्फत लोकशाहीचा कारभार चालतो अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही चालू आहे. ब्रह्मदेशात व इंडोनेशियात लष्कराचे नियंत्रणाखाली लोकशाही आहे. नेपाळमध्ये पंचायत पद्धतीची, राजाने नियंत्रित केलेली लोकशाही आहे. असे विविध प्रकार जगाच्या इतरहि देशात आहेत. चीनमध्यें माओत्सेतुंगच्या हुकुमशाहीनुसार राजवट चालते पण तिलाहि तेथील राज्यकर्ते लोकशाही राजवट म्हणतात. लोकांच्या नावाने राज्य करण्याची फॅशन

जगात रूढ झाली आहे. त्यामुळे सर्वच देशातील राज्यकर्ते आपापली राजवट लोकशाहीची असल्याने सांगत असतात.

वास्तविक लोकशाही याचा अर्थ "लोकांचे राज्य". सर्व लोकांनी एकत्र जमून, विचार विनिमय करुन, सर्वांच्या पसंतीने, स्वत:साठी नियम करावयाचे व ते स्वत:होऊन पाळावयाचे ही खरी लोकशाही. पण व्यवहारात सर्व लोकांना एकत्र जमणे शक्य नसते. सर्व व्यवहारांचे ज्ञानहि सर्वांना नसते. शिवाय प्रत्येकाचा स्वभावगुण भिन्न असल्याने सर्वांचे एकमत होणेहि शक्य नसते. एकादा नियम एकमताने समत झाला तरी तोच सर्वजण मनापासून पालन करतीलच असाही संभव नेसतो. त्यामुळें लोकशाहीला व्यवहारात मर्यादा निर्माण झाल्या. ग्रीक व रोमन लोकांनी सार्वजनिक लोकशाहीचा प्रयत्न करुन पाहिला होता पण त्यांनाहि त्या प्रयोगात सर्वांना ,सामावून घेणे जमले नाही. लोकशाहीचा प्रयोग इंग्लंडमध्यें सुरु झाला तो राजा व उमराव (सरदार–मानकरी) यांच्या झगड्यातून. फ्रान्समध्ये शेतमजूर व छोटे व्यावसायिक यांनी राजा, जमीनदार, धर्मगुरु व सरकारीनोकर या चौकडीविरुद्ध केलेल्या क्रांतीतून लोकशाहीचा उदय झाला. इग्लंड व फ्रान्स या देशातील लोकशाहीचीच नक्कल जगातील बहुतेक राष्ट्रांनी नंतर केली.

लोकशाहीचे मुख्य लक्षण म्हणजे एकापेक्षा अधिक राजकीय पक्ष असणें व निवडणुकीच्या मार्गाने त्यांनी सत्तामिळविण्यासाठी स्पर्धा करणे. ज्या देशात एकापेक्षा अधिक पक्ष नाहीत तेथें लोकशाहीच्या नावाखाली निवडणुका होत असल्या तरी त्यांना एकपक्षीय हुकुमशाही म्हणणेच योग्य. रशिया, चीन व इतर कम्युनिस्ट देशातून लोकशाहीच्या नावाखाली एकपक्षीय हुकुमशाहीची राजवट असते. लष्करी अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली, राजाच्या नियंत्रणाखाली किंवा

हुकुमशहाच्या नियंत्रणाखाली चालणारा राज्यकारभार हासुद्धा लोकशाही कारभार नव्हे.

भारताने लोकशाही पद्धतीची निवड करताना प्रामुख्याने इग्लडचे अनुकरण केले आहे. इंग्लिश लोकांचे राज्य भारतावर सुमारे दीडशेवर्षे होते; त्यामुळें इंग्लडच्या राज्यव्यवस्थेचा भारतीय नागरिकांना परिचय होता. इंग्लिश राज्यकर्त्यांनीही त्यांच्या देशातील राजकीय संस्था येथे कायद्याने रुढ केल्या होत्या. स्थानिक स्वराज्य संस्था, प्रांतिक व. केंद्रीय विधिमंडळे यांचे कारभारात स्थानिक लोकांना निवडणुकीच्या मार्गाने भाग घेण्याची संधी ब्रिटिशांनी दिली होती. इंग्लंडप्रमाणेच राजकीय पक्षांचीहि घडण भारतात करण्यात आली होती. भारतातील अनेक कर्तबगार लोकांना इंग्लंडमध्यें जाऊन तेथील राज्यव्यवस्था जवळून अभ्यासण्याची संधी मिळाली होती. तेथील अनुभवावरून " राज्यवस्थेची लोकशाही पद्धती जनतेला सुखकर होते " असेच मत बहुतेकांचे झाले होते. दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले, लो. टिळक, महात्मा गांधी, स्वा. सावरकर, सुभाषचंद्र बोस, पं. जवाहरलाल नेहरु, डॉ आंबेडकर, डॉ. लोहिया, डॉ. मुकर्जी इ. विविध विचारांच्या नेत्यांनी इग्लडची लोकशाहीव्यवस्था आपणालाहि स्वीकारण्यायोग्य असल्याचा अभिप्राय दिला होता.

इग्लडमधील लोकशाही पद्धती भारतीय पुढाऱ्यांना रुचली याचे मुख्य कारण असे, कीं भारतीय नागरिकांचा स्वभाव लोकशाही जीवनपद्धती रुजण्याला योग्य असा आहे. लोकशाही कल्पनेच्या मुळाशी वैचारिक सहिष्णुतेचे जे बीज असते त्याचे रोपण भारतीय जनतेत फार प्राचीनकाळापासून झालेले आहे. दुसऱ्याच्या मताला मान देणे, दुसऱ्याच्या श्रद्धांचा आदर करणे, दुसऱ्याच्या विचारांतसुद्धा प्रामाणिकपणा आहे याची जाणीव ठेवणे हे गुण लोकशाहीला मूलभूत आधार असतात. हे सर्व

गुण भारतीय संस्कृतीत मुळापासूनच आहेत. म्हणूनच भारतात विविध पंथ, संप्रदाय, वंश, जाती, भाषा, आचार यांची वाढ मोकळेपणाने होऊ शकली आहे.

सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी म्हणजे गौतमबुद्ध व आर्य चाणक्य यांचे काळात भारतात नांदत असलेल्या विविध प्रकारच्या राज्यपद्धतींची वर्णने उपलब्ध आहेत. स्वाराज्य, वैराज्य, द्विराज्य अशा विविध पद्धतींची राज्यें त्याकाळात भारतात होती. गणराज्य हा प्रकार जास्त रूढ होता. गण म्हणजे लोक, गणराज्य म्हणजे लोकांचे राज्य. सामान्यत: क्षत्रीय वर्णातील प्रमुख व्यक्तीकडे गणराज्याचे मुख्य अधिकार सोपविलेले असत. गणराज्ये लहान असत. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना विचार-विनिमयात भाग घेता येत असे. त्यापेक्षाहि लहान घटक 'जनपद' या नावाचा असे. नगरांसाठी वेगळी व्यवस्था (हल्लीच्या महापालिकेसारखी) असे. सिकंदरने भारतावर स्वारी केली तेव्हा गांधार, पांचाल, सिंध इ. प्रदेशात भारतीय गणराज्ये त्याला आडवी आली. मॅगॅस्थिनीसने त्याकाळातील गणराज्यांची माहिती लिहून ठेविली आहे. ही गणराज्ये अंतर्गत कारभाराचे दृष्टीने सुव्यवस्थित असली तरी आकाराने लहान असल्याने बलाढ्य शत्रूपुढे त्यांचा टिकाव लागत नसे. शिवाय गणराज्यांचे (राजे) प्रमुख आपसात नेहमी भांडत असत. शिकंदराच्या स्वारीपुढे लहान गणराज्यांचा टिकाव लागेना, म्हणून चाणक्याने चंद्रगुप्ता-करवी सर्वांना एकत्रकरून गुप्तांचे बलाढ्य साम्राज्य तयार केले. त्यामुळे शिकंदराला परत जावे लागले. पुढे शकांशी आणि हूणांशी लढतांनाही, विक्रमादित्य, शालिवाहन, स्कंदगुप्त यांना गणराज्यांना एकत्र करुन लढावे लागले होते.

प्राचीनकाळी आजच्यासारखी दळणवळणाची साधने नव्हती. त्यामुळे दूरच्या प्रदेशावर राज्य करणे सम्राटांना

अवघड वाटे. त्यासाठीं ठिकठिकाणची गणराज्यें आपल्या अंकित ठेवण्यासाठी अश्वमेध यज्ञ करण्याची प्रथा होती. या यज्ञाचे निमित्ताने ज्ञान, विज्ञान, कला, राज्यव्यवहार, न्यायव्यवस्था यांची परस्परांना माहिती होई. विचारांची सतत देवाणघेवाण करणे, दुसऱ्याच्या ज्ञानाचा वा कलेचा सम्मान करणे या लोकशाहीच्या प्रथा त्या काळापासून रुढ आहेत. विचार विनिमयाच्या या मुक्त पद्वतीमुळेच बौद्ध, जैन, वैदिक, भागवत, शैव, शाक्त इ. संप्रदाय सर्व भारतभर अनिरुद्धपणे प्रसार पावु शकले.

भारतीय परंपरेतील आणखी एक वैशिष्ठ्य येथे नमूद केले पाहिजे. ते वैशिष्ठ्य जाणून घतल्याखेरीज भारताच्या एकदर समाजव्यवस्थेचे योग्य ज्ञान करुन घेता येणार नाही. ते वैशिष्ठ्य असे कीं, भारतात राजा किंवा राज्यशासन ही सर्वश्रेष्ठ संस्था मानली जात नव्हती. राजापेक्षा श्रेष्ठ संस्था म्हणुन धर्मशास्त्र किंवा नीतिशास्त्र यांना मान असे. धर्मशास्त्राचे नियम बनविण्याचा अधिकार राजाकडे नसे. वसिष्ठ, वामदेव, मनू, याज्ञवल्क्य, पाराशर, भृगु, गौतम असे सर्वज्ञ, प्रतिभावंत आणि विरक्त ऋषीमुनी समाजहिताची चिंता वहात असत. कोणत्याही भौतिक वैभवाची किंवा मानसन्मानाची त्यांना अभिलाषा नसे. सर्व भूतांचे हित साधण्यासाठी समाजव्यवस्था कशी असावी यासाठी विचारमंथन करून जे निष्कर्ष निघत असत त्यांना नियमबद्ध करुन ते नीतिशास्त्राची रचना करीत. त्यांनी केलेल्या रचनेनुसार राजाने नियमांची अंमलबजावणी करावयाची. म्हणजे त्या नियमानुसार चाललेले राज्य "धर्मराज्य" समजले जात असे.

प्लेटो, ॲरिस्टॉटल हे ग्रीक तत्ववेत्तेहि भारतीय ऋषीमुनींच्याच जीवनक्रमासारखा जीवनक्रम चालवीत असत. प्लेटोने रिपब्लिक या ग्रंथात आदर्शराज्याचे चित्र रेखाटले आहे. आश्चर्याची

गोष्ट म्हणजे भारतीय ऋषींप्रमाणेच ग्रीक तत्ववेत्यांनी चातुवर्ण्याचा पुरस्कार केला होता. त्या पैकी तीनच वर्णांना राजकीय अधिकार असावे व चौथा वर्ग गुलामांचा असावा असे ग्रीक तत्ववेत्त्यांचे मत होते.

ग्रीकांची समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था काळाच्या उदरात नष्ट झाली. भारतात मात्र मुसलमानांच्या आगमनापर्यंत गणराज्यव्यवस्था शिल्लक होती. गणराज्यांचा एक दोष मागे सांगितलाच आहे कीं ती आकाराने लहान असत व एकमेकांचा द्वेष करीत. त्यामुळे मुसलमानांनी त्यांना एकेकटे पाडून त्यांचा नाश केला.

राज्यसंस्थेपेक्षा धर्मसंस्था श्रेष्ठ मानण्याच्या प्रघातापासून एक लाभ असा झाला कीं राज्यसंस्था नष्टझाली तरी, धर्मसंस्था तिच्यावर अवलंबून नसल्याने, ती मात्र नष्ट झाली नाही त्याचप्रमाणे जुन्या रचनेनुसार जातिसंस्था, जातिपचायती व धार्मिक आचारविचार कायम राहिले. राज्यव्यवस्थेच्या अंगापैकी ग्रामपंचायत हे अंग धर्मव्यवस्थेशी निगडित असल्याने तेहि शिल्लक राहिले धर्मसंस्था व राज्यसंस्था यांचा हा संबंध लक्षात घेतला म्हणजे आपणास असे आढळून येते की राजाला मनमानेल तसा कारभार करण्याची भारतात मोकळीक नव्हती. राजालाहि धर्मबंधने लागू होती. त्यामुळे जनतेवर तो जुलूम जबरदस्ती करु शकत नसे. राजा विरुद्ध प्रजा असा संघर्ष भारतीय इतिहासात आढळून येत नाही. प्राचीनकाळापासून राज्यसंस्थेला घालून दिलेले आदर्श अगदी अलिकडील काळातहि, म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजापर्यंतच्या काळातहि सांभाळले जात होते गांधीजींनी जनतेसमोर आदर्श राज्य म्हणून "रामराज्य" ही कल्पना ठेविली होती. कारण रामराज्य हे लोककल्याणकारक राज्य होते. एखादा राजा जुलमी निघाला, धर्मबंधने झुगारून उन्मत्तपणे

वागू लागला, तर जनतेला पीडा होई. अशावेळी ऋषीमुनी पुढे होऊन क्षत्रियांचे नेतृत्व करुन अशा राजाचा पाडाव करुशकणाऱ्या दुसऱ्या नेत्याची नियुक्ती करीत. कंसाविरुद्ध श्रीकृष्ण, जरासंधा विरुद्ध पांडव, नंदाविरुद्ध चंद्रगुप्त, रावणाविरुद्ध राम यांचे संघर्ष हे अधर्म विरुद्ध धर्म असे संघर्ष आहेत.

प्राचीन काळी चालत असलेल्या लोकशाहीचे स्वरुप पहावयाचे असल्यास जातिपंचायती व ग्रामपंचायती यांच्या रचनेत ते आढळून येते. प्रत्येक जातीतील प्रतिष्ठित अशा पांच व्यक्तींना जातीतील सर्व व्यक्तींनी निवडलेले असे. या पांच व्यक्तींनी पारंपरिक रुढी व नीतिमत्ता यांच्या निकषावर आधारुन एकमताने घेतलेले निर्णय हे त्या जातोचे धार्मिक नियम म्हणून पाळले जात असंत. राजसत्तेलासुद्धा या नियमात ढवळाढवळ करता येत नसे. मात्र पंचायतींनी केलेले नियम काहीव्यक्ती दंडेलीने पाळीत नसल्यास, त्यांना राजसंस्थेकडन शासन होत असे. ग्रामपंचायतीमार्फत जातीजातीतील ग्रामपातळीवरील व्यवहार नियंत्रित केले जात असत गावातील चार वर्णाचे चार प्रतिनिधि व वर्णबाह्य अशा अंत्यजांचा एक मिळून पांच प्रतिनिधींच्या निर्णयानुसार ग्रामपंचायतींचा कारभार चालत असे. या पद्धतीत बहुमताने निर्णय करण्याची पद्धती नव्हती. ज काही निर्णय व्हावयाचे ते एकमताने झाले पाहिजेत असा दंडक असे. त्यामुळे सर्वांचे समाधान होईल असाच निर्णय द्यावा लागे. हा निर्णय मात्र "पांचामुखी परमेश्वराने" केलेला निर्णय मानण्यात येई

न्यायालयात न्याय देतानाहि जातिपंचायतींचे सहाय्य घेत असत. एकाद्या व्यक्तीने गुन्हा केल्यास त्याला होणारा आर्थिक दंड सर्व जातीनेमिळून भरुन द्यावा लागे. त्यामुळें प्रत्येक व्यक्तीच्या चारित्र्याची जबाबदारी जातीतील सर्व

व्यक्तीवर येत असे. त्याचप्रमाणे अनाथ बालके, विधवा, अपंग अशा व्यक्तींची जबाबदारीहि सर्व जातीवर म्हणजे जातिपंचायतीवर येत असे.

अर्थात कोणतीहि व्यवस्था ही परिपूर्ण कधीच नसते. मनुष्य हा त्रिगुणात्मक प्रकृतीचा असल्याने त्याच्यातील दोष कालांतराने त्या त्या व्यवस्थेतहि शिरतात. तसे दोष जातिपंचायतींच्या व्यवस्थेत व ग्रामव्यवस्थेतहि निर्माण झालेच. स्वार्थी, सत्तालोलुप व्यक्तींनी या पंचायतींचा ताबा घेतला व त्याचा परिणाम म्हणून आज आपल्या समाजात जातिभेद, उच्चनीचता इ. दुर्गुण बोकाळले. मात्र एक गोष्ट खरी की अशा प्रकारची पंचायत व्यवस्था राष्ट्रात असल्यानेच आपला समाज अनेक परकीय आक्रमणे पचवून जिवंत राहू शकला. पंचायत व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले होते. त्यामुळे केंद्रसत्ता नष्ट झाली तरी पंचायतींच्या रुपाने ठिकठिकाणची सत्ताकेंद्रे शाबूत राहिली व संधी येताच पुन्हा त्या सत्ताकेंद्रांनी परकीय राज्ये उलथून टाकली. तसेच केंद्रसत्तेच्या हातात मर्यादित सत्ता असल्याने हुकुमशाहीचा धोका निर्माण होऊ शकत नसे. समाजातील विविध संस्था निर्भयपणे आपला विकास करू शकत.

धर्मसत्तेला राजसत्तेपेक्षा आपल्या देशात अधिक महत्त्व होते. त्यामुळे राजसत्ता नष्ट झाल्यावर, विविध जातीजमातीत धार्मिक नेते 'साधु-संतांच्या रुपाने' पुढे आले व त्यांनी आपापल्या क्षेत्रात धार्मिक जागृती कायम टिकविली. मुसलमानी राजवटीत गुरुनानक, तुलसीदास, मीराबाई, सूरदास, रोहिदास, एकनाथ, ज्ञानेश्वर, सावतामाळी, नामदेव, चोखामहार, गोराकुंभार, तुकाराम, रामदास, जनाबाई, चैतन्य, नरसीमेहता, नारायणगुरु (केरळ), विद्यारण्यस्वामी इ.

संतमहात्म्यांनी समाजात धर्मप्रेम टिकवून धरले म्हणूनच समाज टिकून राहू शकला. सामाजिक व्यवहारात जातिभेद पाळला जात असे परंतु धार्मिक क्षेत्रात अमका संत हलका, तमका श्रेष्ठ असे मानले जात नसे. आजहि सर्वजातींच्या साधुसंतांना समाजात समान श्रेष्ठतेने मान दिला जातो.

भारतीय लोकशाहीची व सामाजिक व्यवहाची वैशिष्ठये लक्षात यावी यासाठी येथवर विवेचन केले. अद्यापहि भारतीय समाजात जातिसंस्थांचे व धर्माचे प्राबल्य टिकून आहे. आज आपण बहुमताची लोकशाही स्वीकारली आहे. पूर्वीच्या एकमताच्या लोकशाहीपेक्षा आजच्या बहुमताच्या लोकशाहीचे स्वरुप बरेच भिन्न आहे. त्यामुळे जुनी समाजव्यवस्था आपणास अडचणीची वाटू लागली आहे. नव्या लोकशाहीच्या संदर्भात विचारकरणारे लोक, जुन्या समाजव्यवस्थेवर हिरीरीने तुटून पडतांना दिसतात. सर्व जातीजमाती नष्ट केल्या पाहिजेत, धर्माचे महात्म्य सार्वजनिक जीवनातून नष्ट केले पाहिजे इ. विचार आपण नेहमी ऐकतो. प्रत्यक्षात अनुभव मात्र असा येत आहे. की जाती जातीतील भेदभाव कमी होण्याऐवजी जातीयवाद वाढत चालला आहे. धर्माविषयीचे आकर्षणहि फारसे कमी झालेले दिसत नाही. उलट जादूटोणा करणाऱ्या, चमत्कार करुनदाखविणाऱ्या "बाबांची" चलती आहे.

पंचवीस वर्षांचा हा अनुभव लक्षात घेऊन जाती आणि धर्म यांना शिव्या देतबसण्यापेक्षा आपण स्वीकारलेल्या बहुमताच्या लोकशाहीपद्धतीत बदल करणे जरूर आहे. जातिनिष्ठ रचना हा भारतीय समाजाचा अविच्छिन्न भाग झाला आहे. त्याचप्रमाणे धर्माने मन व बुद्धीला वळण

लाविलेले आहे. एकप्रकारे समाजपुरुषाचे जाति व धर्म हे स्वभावसिद्ध अंग झालेले आहेत. मनुष्याला जसा शरीराचा त्याग करता येत नाही तसा भारतीय समाजाला जाति व धर्म यांचा त्याग करता येणार नाही. शरीराला साजेसे कपडे आपण शिवून घेतो. त्याचप्रमाणे आपल्या समाजशरीराला साजेल असे लोकशाहीचे स्वरुप आपण बनविले पाहिजे.

आज असलेल्या बहुमाताच्या लोकशाहीत शंभर नागरिकांपैकी एक्कावन्न नागरिकांच्या मताप्रमाणे संस्थेचा कारभार चालतो. उरलेल्या एकूणपन्नास मतांना काहीच महत्त्व नसते. म्हणजे ५१=१०० आणि ४९=० असा चमत्कारिक हिशोब तयार होतो. विशेषत: राज्य विधिमंडळे व लोकसभा यांच्या कारभारात या विचित्र समीकरणाचा परिणाम फारच जाणवतो. राज्य व केंद्र यांच्या हातात सर्व अधिकारांचे केंद्रीकरण झालेले आहे. विधिमंडळे, नोकरशाही व न्यायमंडळे ही राज्यकारभाराची तीन अंगे असतात. पण या तिन्हींवर खरा अधिकार विधिमंडळाचाच असतो. विधिमंडळात बहुमताने निवडून आलेले मंत्रीमंडळच नोकरशाही व न्यायाधीश यांच्या नेमणुका करीत असल्याने सर्व अधिकार मंत्रीमंडळाकडे केंद्रीभूत होतो. बरे, बहुमत तरी नेहमीच एक्कावन्न टक्के असतेच असे नाही. जेथे दोनापेक्षा अधिक उमेदवार उभे असतात तेथे पन्नासापेक्षा कमी मतांचा प्रतिनिधीही निवडून येऊ शकतो. उदा. तीन उमेदवार असल्यास एकाला ४० दुसऱ्याला ३५ व तिसऱ्याला २५ मते मिळाली तरी ४० मते मिळवणाराची किमत १०० होते व उरलेल्या ६० मतांची किंमत शून्य होते. मुळात मतदानहि शंभर टक्के झालेले नसते. फारतर ७० ते ७५ टक्के मतदान होते. म्हणजे ७० टक्क्यात

६० टक्के विरोधक असल्यास ३० मतांची किमतसुद्धा १०० होऊ शकते.

आता आपल्या जातिनिष्ठ समाजरचनेमुळे परिस्थिती अशी होते, कीं ज्या राज्यात एकाद्या जातीचे ४० टक्के मतदार असतील त्या जातीचे हातात १०० टक्के राज्यकारभार केंद्रित होतो. शिवाय विरोधी पक्षातर्फे निवडून येणारे सभासदहि त्या ४० टक्के जातीपैकीच येत असल्याने राज्यकारभार एकांगी पद्धतीनेच होतो. प्राचीनकाळी राज्यकारभाराची सूत्रे जशी एकाच क्षत्रीय वर्णाकडे असंत त्याचीच आवृत्ती नव्या पद्धतीने होते. त्याकाळी विधिसंस्था व राज्यकारभार यांचे विकेंद्रीकरण तरी होते. नव्या पद्धतीत सर्वंच अधिकार एकेठिकाणी केंद्रित होतात. हा दोष काढून टाकण्यासाठी राज्यात विधानपरिषदा व केंद्रात राज्यसभा यांची रचना केली आहे खरी, पण त्या सभागृहात निवडून येणारेहि बहुमतवाल्यांमार्फत नियुक्त केलेले असल्याने तेथेंहि विशिष्ट गटाच्याच हातात सर्व कारभार जातो.

भारतातील विविध राज्यांच्या कारभाराकडे पाहिले तर असें दिसेल की. महाराष्ट्रात मराठा, कर्नाटकात वक्कलिग व लिंगायत, केरळात इळवा व नायर, आंध्रात खम्मा व रेड्डी, गुजराथेत पटेल व देसाई, बिहारात यादव व भूमिहार, उत्तरप्रदेशात जाट व राजपूत, पंजाबात शिख, कश्मिरात मुसलमान, अशा एक किंवा दोन जातींच्याच हातात सर्व कारभार केंद्रित झाला आहे. बाकीच्या अठरापगड जातींमध्ये कितीतरी कर्तबगार माणसे आहेत, पण बहुमताच्या लोकशाहीला जे जातीय स्वरूप आले आहे त्यामुळे राज्यकारभाराचे कामात त्यांना सहभागी होणे अशक्य झाले आहे. अपवाद म्हणून काही व्यक्तींना वाव मिळालेला

दिसतो. पण त्यांनाहि एका विशिष्ट जातीचे आश्रित म्हणून रहावे लागते. हरिजन व गिरिजन यांचेसाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत तेथेंहि असे दिसून येते की ४० टक्के संख्या असलेल्यांनाच सर्वजागांवर प्रतिनिधित्व मिळते. मेघालय, नागालॅंड, मिझोरम. झारखंड या क्षेत्रात ख्रिश्चन झालेल्या ३० – ४० टक्के गिरिजनांनी शंभरटक्के कारभार बळकावून विकासाचे सर्व फायदे उपटले आहेत. हरिजनां–मध्येंहि महार (आता बौद्ध) व चांभार या दोन जातीतील उमेदवार सर्व राखीव जागा पटकावतात.

ही परिस्थिती फार काळ चालू ठेवणे देशहिताचेहि नाही व लोकशाहीला पोषकहि नाही. कारण राज्यसत्तेपासून दूर रहाण्याचा प्रसंग ओढवलेल्या ६० टक्के नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कापासून दूर ठेवल्यासारखे होईल. देशातील सैन्यात सर्व जातींचे लोक सारख्याच देशप्रेमाने लढण्याचे काम करतात. तेथें कांहीं विशिष्ठ जातीच असतात असे नाही. मग राज्यकारभारात मात्र कांहीं जातींचीच मक्तेदारी कां असावी ? तशी मक्तेदारी बहुमताच्या आजच्या लोकशाही पद्धतीने निर्माण होत असल्याने, ही पद्धती बदलली गेली पाहिजे.

त्यासाठी एक वेगळी पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. त्यापद्धतीचे सर्वसामान्य स्वरूप असे — कीं सध्याच्या पद्धतीनुसार मतदारसंघांची विभागणी न करता राज्यविधानसभेसाठी संपूर्ण जिल्हा व लोकसभेसाठी संपूर्ण राज्य हा एक मतदार संघ असावा. व्यक्तिशः उमेदवार उभे राहण्याची पद्धती बंद करून पक्षाचे जाहिरनाम्यावर मतदान घ्यावे. सार्वमत घेताना जी पद्धती अवलंबितात तीच अवलंबावी. त्यामुळे अपक्ष व बेशिस्त प्रतिनिधींचा प्रश्न शिल्लक रहाणार

नाही. विशिष्ट टक्केवारीपेक्षा कमी मते मिळणाऱ्या पक्षाला प्रतिनिधित्व देऊ नये. मात्र इतर मोठ्या पक्षांना त्यांना मिळालेल्या मतदानाचे टक्केवारीनुसार प्रतिनिधित्व मिळावे. उदा. १०० मतापैकी ३५% काँग्रेस, २०% जनसंघ, १०% समाजवादी, १०% कम्युनिस्ट, १०% शे. का. पक्ष, ५ टक्के रिपब्लिकन व इतर पक्ष म्हणजे फॉ. ब्लॉक ३ टक्के, डावे कम्युनिस्ट ३ टक्के, शिवसेना २ टक्के, विदर्भसमिती २ टक्के असे मतदान झाल्यास मतांचे प्रमाणात त्या त्या पक्षाने आपले प्रतिनिधी पाठवावेत.

या पद्धतीमुळे कोणाहि व्यक्तीचे मत वाया जाणार नाही. पक्षातील कर्तबगार व्यक्ती विधिमंडळात पाठविता येतील. जातीय पद्धतीने मतदान न होता वैचारिक आधारावर मतदान होईल. सर्व जातीजमातीतील कर्तबगार व्यक्ती कांहीं प्रमाणात विधिमंडळात पोहोचतील. पैसा वाटून निवडणूक लढविण्याचा प्रकार बंद होईल. पक्षातर्फे कोणाला प्रतिनिधित्व द्यावयाचे हे पक्षांतर्गत निवडणुकीतून ठरविता येऊ शकेल. तीन वेळा ( टर्म ) पेक्षा जास्त वेळा एकाव्यक्तीला प्रतिनिधित्व देण्यात येऊ नये. म्हणजे सत्तेची मक्तेदारी तयार होणार नाही व नव्या नव्या कार्यकर्त्यांना वाव मिळू शकेल.

आजच्या पद्धतीत निवडून येण्याचा हमखास उपाय म्हणून जो तो सत्ताधारी पक्षाकडे धाव घेतो. तशी परिस्थिती रहाणार नाही. निवडणुकीपूर्वी सरकार बरखास्त करुन सर्वांना समान भूमिकेवर आणण्यात यावे. हल्ली तसे होत नाही. सत्ताधारी व्यक्ती आपल्या सत्तास्थानांचा लाभ घेत असतात व विरोधी पक्षांना मात्र कोणताच लाभ नसतो. सशस्त्र मनुष्याबरोबर नि:शस्त्राला लढावयाला सांगणे असा प्रकार हल्ली चालतो. त्यामुळे विरोधी पक्ष

अपुऱ्या साधनांमुळें दुर्बल ठरतो. आकाशवाणीचा उपयोग कोणत्याच पक्षाला करू देऊ नये. हल्लीच्या पद्धतीमुळें फक्त अधिकारारूढ पक्षाचाच प्रचार जास्त केला जातो.

गेल्या पांच सहा सार्वत्रिक निवडणुकीतील अनुभवावरुन निवडणूक पद्धती पूर्णपणे बदलण्याची आवश्यकता तीव्रतेने निर्माण झाली आहे. भारतात लोकशाहीपद्धती टिकवावयाची असेल तर भारतीय समाजव्यवस्थेला अनुरुप असे स्वरूप लोकशाहीला दिलेजाणे क्रमप्राप्त आहे. लोकशाहीचे आजचे स्वरूप अत्यंत ओंगळवाणे आहे. ते स्वरूप प्राप्त होण्यास आज अवलंबिली जाणारी निवडणूक पद्धती प्रामुख्याने कारणीभूत आहे. ती निवडणूक पद्धती बदललीच पाहिजे.

• • • • •

प्रकरण ९ वे.

# हिंदू जीवन ( पतन आणि उत्थान विचार )

येथवर आपण भारतीय राष्ट्रजीवनाच्या विविध अंगांचा विचार केला. आता त्या सर्व अंगांचा मूलाधार असलेल्या भारतीय हिंदूजीवनाचा विचार करु. म्हणजे पर्यायाने संपूर्ण राष्ट्रजीवनाचा विचार सामग्ऱ्याने केल्यासारखे होईल. ' हिंदू ' हे समाजकुटुंब आहे. त्यात सर्व प्रकारच्या उपासनापद्धतींचा अवलंब करणारे असंख्य घटक आहेत. मूर्तिपूजक, सनातनी, निरीश्वरवादी, जैन, बौद्ध, शिख, वेदांती अशा नाना प्रकारच्या विचारधारणा असणाऱ्या पंथोपपंथांचे ते एक विशाल कुटुंब आहे. पिंड आणि ब्रह्मांड यांत व्यापून राहिलेल्या सत् तत्त्वाचा अंश सर्व चराचरात आहे, अशी या हिंदू विचारसरणीची मूलतः अत्यंत व्यापक अशी भूमिका आहे.

परंतु प्रत्यक्ष व्यवहाराकडे नजर टाकल्यास या हिंदू कुटुंबाचे जे चित्र आढळून येते ते अत्यंत ओंगळ, छिन्नविच्छिन्न आणि दुर्गुणांनी

परिपूर्ण भरलेले असे दिसते. हिंदूमधील सर्वात मोठा दुर्गुण म्हणजे त्यांचेत सामाजिक एकात्म भावना नाही. क्वचित एकादे संकट आले म्हणजे त्याचे प्रतिकारार्थं काही काळ सर्व हिंदू एकत्र येतात. तसेच निरनिराळ्या उत्सव प्रसंगी, यात्रेचे ठिकाणी सर्व हिंदू एकत्र गोळा होतात. परंतु त्यांच्या त्या कृतीत एकात्मतेचा जिव्हाळा किंवा तेज नसते. एकाद्या नदीला महापूर आला की त्यामुळे माणसे, गूरे, झाडे वाहू लागतात व जीव वाचविण्यासाठी एकत्र येतात. झाडे जनावरे आणि माणसे यांच्या त्या कृतीत जशी एकात्मता नसते तसे हिंदूंचे सामाजिक जीवन संकटप्रसंगी एकत्वाचे भासले तरी त्यात खरी एकात्मता नसते. जत्रा आणि उत्सव प्रसंगीहि त्यांचे जीवन बाजारी स्वरूपाचे असते. त्यात ईश्वरभक्तीच्या उत्कटतेपेक्षा गतानुगतिकत्वाचाच भाग अधिक असतो.

हिंदूंचा दुसरा दुर्गुण म्हणजे त्यांचे सार्वजनिक जीवन अत्यंत बेशिस्तीचे असते. प्रवास करतांना, रस्त्याने जातांना, नाटक सिनेमा पाहताना, सभेच्या ठिकाणी, कीर्तनप्रसंगी अगर अंत्ययात्रेच्या प्रसंगीहि हिंदू समाजातील लोक अत्यंत बेशिस्तीने वागतात. मोकाट सुटलेली जनावरे आवरण्यासाठी हातात काठी घेतलेला गुराखी जसा आटापिटा करतो तसा आटापिटा हिंदू समाजाला आवरण्यासाठी सरकारला पोलिसामार्फत करावा लागतो. प्रयाग येथे कुंभमेळ्याला जमलेल्या यात्रेकरूंसाठी बांबूंची कुपणे घालून भोवती लाठीधारी घोडेस्वार ठेवावे लागतात. तसे न केल्यास शेकडो यात्रेकरू गर्दीत पायाखाली तुडविले जाऊन ठार होण्याचा धोका असतो. असे धोकादायक प्रसंग घडलेही आहेत. द्रविड पक्षाचे आवडते नेते आण्णा दुराई यांचे निधन झाले, तेव्हा अंत्ययात्रेला जाणारे लोक आगगाडीच्या टपावर बसले आणि एका बोगद्यात भिंतीवर आपटून शेकडो लोक ठार झाले. पुण्यासारख्या सुशिक्षित व्यक्तींच्या शहरात इंदिरा गांधींची सभा सुटल्यावर काही लोक चेंगरून ठार झाले व कित्येक जखमी झाले.

कीर्तनाच्या ठिकाणी लोक बसल्याजागी थुंकतात. सिनेमागृहात पान खाऊन पिचकाऱ्या मारतात. सार्वजनिक रस्त्यावर घरातला केर टाकणे, देवळे, घाट, बागा येथे घाण करणे यात काही चूक आहे असें कोणाला वाटतच नाही. आगगाडीचे डबे, रेल्वे स्टेशने इतकेच नव्हे तर आरोग्यासाठी बांधलेली इस्पितळे म्हणजे घाणीचे अड्डेच असतात. खेडेगावात आणि शहरातहि गावाच्या सभोवती प्रातर्विधी करून सर्वत्र घाण केलेली आढळून येते. कोणीही कोणतेहि काम शिस्तीने करावयाचेच नाही व स्वच्छता पाळाव-याचीच नाही हा हिंदूंच्या सार्वजनिक जीवनाचा एक स्थायी भावच झाला आहे.

धार्मिक क्षेत्रातहि हिंदूंचे जीवन असेच ढोंगबाजीने भरलेले आहे. काशी, प्रयाग, रामेश्वर, मथुरा पंढरपूर इ. कोठल्याही तीर्थाचे स्थानी जा. तेथील पंडे आणि पुजारी, लोकांच्या भावनांचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडीत असतात. देवाच्या दर्शनासाठी कित्येक ठिकाणी लाच द्यावी लागते. भक्ताकडे पहावे तर त्याचेहि जीवन स्वार्थाने भरलेले असते. कीर्तन प्रसंगी अध्यात्म सांगणारे बुवालोक वैयक्तिक जीवनात अत्यंत लोभी आणि स्वार्थी आढळून येतात. भजन, कीर्तन आणि तीर्थयात्रा करणारे लोक प्रापंचिक जीवनासाठी क्रूर सावकारी करताना आढळतात. गाईची पूजा करणारे व्यापारी तुपात गुरांची चरबी मिसळून त्याची विक्री करतांना दिसतात. अहिंसेची जपमाळ ओढणारे व्यापारी धंद्यात लोकांचे खुशाल गळे कापतात. संन्यासाची दीक्षा घेतलेले महात्मे पाद्यपूजा करून घेण्यात धन्यता मानतात. निरनिराळ्या संप्रदायांचे आचार्य मिरवणुकीतील मानपानासाठी एकमेकांशी मारामारी करायला सिद्ध होतात. आपण धर्म मानीत नाही असे सांगणारेहि एकाद्या बुवाच्या नादी लागलेले आढळून येतात.

कथा, कीर्तने, पुराणे, स्तोत्रे, प्रवचने, पोथ्या या सर्वांमधून

अनासक्त जीवनाची महती गाइलेली आढळून येते. आणि प्रत्यक्ष व्यवहारात पहावे तर हिंदूंचे जीवन सर्व प्रकारच्या आसक्तींनी भरलेले आढळून येते. सेवाभावाचा आणि धर्माचा काही संबंध आहे याची जाणीव हिंदू व्यक्तींच्या जीवनात सहसा आढळून येत नाही. कोणत्याहि मंदिरात आणि यात्रेत जावे तो तेथे महारोगी आणि भिकारी यांची गर्दी झालेली आढळून येते. या पीडित लोकांचे जीवनाची जबाबदारी सर्व समाजावर आहे अशी जाणीव मंदिरात आणि यात्रेत जाणाऱ्यांच्या मनात जागृत झालेली दिसत नाही.

मुंबई, कलकत्ता, दिल्ली अशा मोठमोठ्या शहरात " झोपडपट्टी " नावाच्या वस्त्या आहेत. या वस्त्यांमध्ये लक्षावधी माणसे घाणीत उघड्यावर अत्यंत दारिद्र्यात रहात आहेत. डुकरे आणि गाढवे हे प्राणी घाणीत रहाणारे म्हणून आजपर्यंत मानले जात असत. पण त्या प्राण्यापेक्षाहि हीन अवस्थेत झोपडपट्टीतील नरकात राहण्याचा प्रसंग लक्षावधी मानवी प्राण्यांवर आला आहे. या मोठ्या शहरात मोठमोठे कोट्याधीश हिंदू व्यापारी राहतात. लक्षावधी रुपये खर्च करून, ते व्यापारी निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांचे ठिकाणी रामाची, कृष्णाची, महावीराची आणि इतर देवतांची प्रचंड मंदिरे उभारतात. परंतु नरकप्राय वस्तीत राहणाऱ्या आपल्या हिंदू बांधवांसाठी मोफत घरे बांधून देण्याने देवाची सेवा अधिक चांगली होईल असे त्यांना वाटत नाही.

सर्व चराचराच्या ठायी एकच परमेश्वर अंशमात्राने रहात असतो हे हिंदूंचे सारभूत तत्त्वज्ञान आहे. " शुनिचैव श्वपाकेच पंडिता: समदर्शिन: ।" ( कुत्रा, चांडाल, यांचे ठायीसुद्धा आत्मभाव पाहणाराच खरा ज्ञानी असतो ) अशी भगवद्गीतेची स्पष्ट आज्ञा आहे. पण व्यवहारात उच्चनीचता, सोवळे ओवळे आणि अस्पृश्यता यांचे इतके थोतांड हिंदूंच्या जीवनांत आहे की, ते गाय आणि

कुत्र्याला जेवढी किंमत देतात तेवढीही अस्पृश्यांना व्यवहारात देत नाहीत. गेली एक हजार वर्षे हिंदूंच्या वाईट वर्तणुकीचे बळी होऊन कोटयावधी लोक हिंदूधर्मातून परधर्मात गेले. परधर्मात गेलेल्या या लोकांनी हिंदूंचा नाना प्रकारे सूड घेतला तरी हिंदूंचे डोळे उघडू शकले नाहीत. बंगालमध्ये काळापहाड नावाच्या हिंदूने मुसलमान धर्म स्वीकारून स्वबांधवावर सूड घेतला. लाखोंना भ्रष्ट केले. केरळात मोपला मुसलमान झालेले हिंदू तेथील लोकांवर अत्याचार करू लागले. गोव्यात, नागालँडमध्ये लाखो हिंदू ख्रिश्चन धर्मात गेले व हिंदूंचा द्वेष करू लागले. पण हिंदू समाजात थोडीहि जागृती निर्माण झाली नाही. पंजाबात मुसलमानांनी दंगली घडवून शीख, शीखेतर हिंदूंवर अत्याचार केले. पण शीख व शीखेतर हिंदूंनी सावध होऊन आपसात भांडण करणे सोडले नाहीं. महाराष्ट्रात हिंदूमधील जातीय उच्चनीचतेची चीड येऊन महात्मा फुले यांनी हिंदूंना सावध करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. पण त्यांच्या अनुयायांनी ब्राह्मणांचा द्वेष करणे एवढेच कार्य त्यांतून उचलले. बिचाऱ्या हरिजनांचा छळ चालूच राहिला, त्यामुळे डॉ. आंबेडकरांना बौद्ध व्हावे लागले. तरीहि हिंदूंनी स्वबांधवांचा छळ करणे सोडलेले नाहीं.

हिंदूंच्या तत्त्वज्ञानात " कर्मविपाक प्रक्रियेनुसार माणसाला जन्म प्राप्त होतो " असे सांगितले आहे. म्हणजे पूर्वीच्या जन्मामध्ये बरे किंवा वाईट, जसे कर्म घडले असेल त्याचा संस्कार आत्मा घेतो व त्याची फळे भोगण्यास पात्र असा जन्म येतो, असा त्याचा अर्थ आहे. कर्माचे तीन भाग मानले आहेत. सात्विक, राजस व तामस अशा त्या तीन भागांना त्रिगुण म्हणतात. सात्त्विक गुणांचा संस्कार घेऊन आलेल्या आत्म्याला दैवी गुणांनी युक्त जन्म येतो. म्हणजे ब्राह्मण किंवा क्षत्रिय राजवंशात जन्म येतो. इतर गुणांनाही त्यांच्या प्रमाणानुसार बुद्धी, ऐश्वर्य व आरोग्य यांची प्राप्ती करून देणारे जन्म त्या त्या वर्णात येतात. अशी ही जन्म प्रक्रिया

सांगितली आहे. जन्मत: मनुष्यात कमी किंवा जास्त सद्‌गुण का असतात ? आपत्ती का येतात ? वैभव का लाभते ? सुरूपता कुरूपता का असते ? कष्ट वा सुखासीनता का भोगावी लागते ? याची तार्किक संगती ‘ कर्मविपाक प्रक्रियेने ’ लावून दाखविली आहे. वेदान्ती, सांख्य, जैन, बौद्ध वगैरे सर्व प्रकारच्या हिंदू दार्शनिकांनी थोड्या फार फरकाने ही प्रक्रिया मान्य केली आहे. जन्मजात विषमता अशाप्रकारे मान्य केली असल्याने त्याचीच परिणती उच्चनीचतेच्या भावनेत झाली आहे.

तत्त्वज्ञानाचा हा एक भाग हिंदूलोक बरोबर पाळतात. पण दुसरा उदात्त भाग म्हणजे “ पूर्व जन्मीच्या वाईट कर्मांची वजावट या जन्मात करून स्त्री, वैश्य, शूद्र, क्षत्रिय, ब्राह्मण, चांडाल वगैरे कोणालाहि मोक्ष किंवा निर्वाणपद प्राप्त करता येते. भक्तीने, ज्ञानाने अनासक्त भावनेने जो कोणी आपले जन्मत: प्राप्त झालेले कर्म करीत राहतो तो त्रिगुणात्मक दोषातून मुक्त होऊन जातो ” असा तत्त्वज्ञानाचा दुसरा भाग मात्र हिंदूलोक विसरून गेले आहेत. तत्त्वज्ञानाच्या या दुसऱ्या भागात कोठेहि उच्चनीचतेचा उल्लेख नाही. सर्वत्र समता सांगितली आहे. पण नेमकी तेवढीच बाब हिंदू लोक विसरून गेले आहेत.

वास्तविक हिंदू तत्त्वज्ञानाइतके तर्कसंगत, व्यावहारिक आणि उदात्त असे दुसरे तत्त्वज्ञान नाही हे वर सांगितलेले तत्त्वज्ञानाचे दोन भाग एकत्र करून वाचले असता लक्षात यईल. पण हिंदूंचा व्यवहार मात्र त्या तत्त्वज्ञानाला सुसंगत नसल्याने ‘ ते तत्त्वज्ञानच वाईट आहे ’ असा गैरसमज पसरवणे सोपे झाले आहे. हिंदू समाजात इतके संत, महंत, ज्ञानी, त्यागी पुरुष परंपरेने निर्माण झाले याचे कारण त्यांना तत्त्वज्ञानाचीं दोन्ही अंगे पूर्णपणे समजली होती व त्यानुसार ते आपले आचरण ठेवीत होते. पण ज्यांना त्यातला फक्त पूर्वार्धच समजला ते अर्धवट लोकहि धर्मात्मे म्हणून मिरवू लागल्याने हिंदू समाजाचा अध:पात झाला.

आणखीं महत्त्वाचा दुर्गुण असा निर्माण झाला की, विविध वर्णाचे लोक आपापले नैतिक कर्तव्य विसरून गेले. उदा. ब्राह्मणांनी धनाचा संचय न करता अध्ययन, अध्यापन, यजन, याजन ही कर्मे निःस्वार्थपणे करावीत हे ब्राह्मणांचे कर्तव्य विसरून ते लोभी याचक, स्वार्थी व अहंकारी बनले. क्षत्रियांनी धर्मरक्षण करावे. त्याऐवजी परक्यांचे गुलाम बनणे, स्वार्थासाठी फितुरी करणे, परक्यांसाठी स्वजनांवर स्वाऱ्या करणे अशी कर्मे क्षत्रीय करू लागले. इतरहि सर्व वर्ण – जातीतील लोक असेच कर्तव्यच्युत होऊ लागले. त्यामुळे जो अधिक त्यागी व निःस्वार्थी असेल त्याला अधिक प्रतिष्ठा, असा योजलेला क्रम उलटा होऊन, अधिक स्वार्थी व अहंकारी असेल त्याला प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली. आचाराचे बाह्य अवडंबर शिल्लक राहिले व त्यामागील सद्‌गुणांचा गाभा नष्ट झाला. हिंदूंच्या सामाजिक अधःपाताचे वर्णन यापेक्षा कितीतरी लांबविता येईल. येथे फक्त त्याचे त्रोटक वर्णन केले आहे.

वैयक्तिक जीवनातहि हिंदूलोक असेच स्वार्थी असल्याचा अनुभव येतो. व्यापारात खोटेपणा, डॉक्टरी व वकिली इत्यादि प्रतिष्ठित पेशात लुबाडूपणा, शिक्षण क्षेत्रात खोटेपणा असा सर्व खोटेपणाचा बाजार म्हणजे हिंदू व्यक्तींचे जीवन असते. अनेक लोक याचा दोष राजकीय नेतृत्वाकडे देतात. त्यात थोडा सत्याचा अंशहि आहे. पण एकंदर समाजातील व्यक्तींची दानतच खाली गेली आहे, हे सुद्धा तितकेच खरे आहे. हिंदू व्यक्तींच्या वैयक्तिक स्वार्थी वृत्तीचा लाभ घेऊन इंग्रजांनी दीडशे वर्षे सात हजार मैल दूर अंतरावरून भारतावर निर्धोकपणे राज्य केले. इंग्रजांचा नव्वद टक्के नोकरवर्ग हिंदूंचा असे. पण सर्वजण आप्पलपोटे आणि भित्रे असल्याने परक्यांच्या राजवटीला ते सहाय्यभूत होत. वैयक्तिक स्वार्थावर नियंत्रण बसावे म्हणून "सहकारी" संस्था निर्माण करण्यात आल्या. पण तेथले व्यवहार अखेर स्वार्थी लोकांच्याच हातात जाऊन त्यांनीहि स्वार्थ साधला. अनेक स्वार्थी माणसे

एकत्र आणली की त्यातून एक नि:स्वार्थी संस्था उदयाला येते हे समीकरणच मुळात चुकीचे आहे. कदाचित दारिद्र्यामुळे माणसे लबाडीकडे वळली असावीत म्हणून त्यांना कर्जे, तगाया, अनुदाने देण्यात येऊ लागली. पण त्यामुळेहि त्यांच्यात प्रामाणिकपणा संचरल्याचे आढळून येत नाही. कर्जे बुडविणे, तगाईची रक्कम चैनबाजीत उडविणे, अनुदानाच्या खर्चाचे खोटे हिशेब करणें असा प्रकार सुरू झाला. कोणत्याहि संस्थेत पहावे तर प्रामाणिक व्यवहार म्हणून आढळायचा नाही, असे हिंदूंच्या सर्व संस्थांबाबतीत दिसते.

अशाप्रकारे हिंदूजीवनाची सर्व अंगे खोटेपणा, दंभ, बेशिस्त, आळस, स्वार्थ, लुबाडणूक, भेदाभेद यांनी अगदी बरबटून गेली आहेत. त्यामूळे ५० कोटी संख्या असूनहि हिंदूंच्या जीवनाचे तेज कोठेहि झळकतांना दिसत नाही. पाकिस्तान बरोबर झालेल्या युद्धात हिंदूंनी जय मिळवला खरा. पण त्याचे खरे कारण असे की, पाकिस्तानचे राज्यकर्ते मूर्ख निघाले आणि पाकिस्तानात रहाणाऱ्या मुसलमान लोकांचे जीवन हिंदूंच्या जीवनापेक्षा अधिक नासलेले आहे. शिवाय लोकसंख्या, क्षेत्रफळ आणि नैसर्गिक संपदा या बाबतीतहि पाकिस्तान भारतापेक्षा तुलनेने दुर्बल आहे. त्यामुळे हिंदूंनी शेफारून जावे असे त्यात काहीच घडलेले नाही. म्हणून हिंदूंनी आपले जीवन इतरांच्या जीवनाच्या तुलनेने न पाहता, 'हिंदूंनी जीवन विषयक जे आदर्श कल्पिले आहेत' त्यांच्याशी तोलून पहाणे हेच योग्य होईल.

हिंदूसमाजाच्या सुदैवाने अशा तऱ्हेचे आदर्शजीवन व्यतीत करणारे महापुरुष अगदी अलिकडल्या काळात होऊन गेले आहेत व आजही विद्यमान आहेत. गेल्या शंभर वर्षात स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी. योगी अरविंद, डॉ. आंबेडकर पं. मदनमोहन मालवीय, भाई परमानंद, रमण महर्षी इ. महापुरुषांनीं आदर्श हिंदूजीवनाचे पाठ आपल्यासमोर ठेविले आहेत. आजहि आचार्य विनोबा भावे, पूजनीय गोळवलकर गुरुजी यांचे त्यागी

तपस्वी, पवित्र जीवनाचे आदर्श हिंदूंच्या समोर आहेत. इतरहि अनेक संत, साधू, संन्यासी आणि व्रती आपापल्या क्षेत्रात हिंदू जीवनादर्शानुसार जीवन व्यतीत करीत आहेत.

परंतु अशा कांही थोर व्यक्ती अपवाद म्हणून हिंदूसमाजात आढळून आल्या तरी तेवढयाने संपूर्ण समाजाच्या अंगी खिळलेले दुर्गुण आपोआप नाहिसे होत नाहीत हे दिसून येत आहे. संपूर्ण हिंदूसमाज पुरुषार्थप्रवण होण्यासाठी फार मोठ्या व्यापक प्रयत्नांची जरुरी आहे. पन्नास कोटी समाजाला वळण लावावयाचे झाल्यास कमितकमी किती व्यक्तींवर त्यागाचे, शिस्तीचे, देशभक्तीचे, निःस्वार्थतेचे संस्कार व्हावयास हवेत याचा अगदी सोपा हिशोब डॉ. हेडगेवार यांनी मांडून दाखविला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य म्हणजे वर उल्लेखिलेले आदर्श हिंदूजीवन निर्मितीचे कार्य आहे. त्या कार्यासाठी संपूर्ण देशात शहरी लोकसंख्येच्या शेकडा तीन व ग्रामीण लोकसंख्येच्या शेकडा एक या प्रमाणात संस्कारित हिंदू व्यक्ती तयार होणे जरूर आहे असे डॉ. हेडगेवार यांचे मत होते.

आता या हिशोबाने भारतीय हिंदूंचा विचार करू. पन्नास कोटी हिंदूंपैकी वीस टक्के हिंदू शहरात राहतात. म्हणजे त्यांची संख्या दहा कोटी होते. त्यापैकी शेकडा तीन व्यक्ती म्हणजे तीस लाख संख्या होते. उरलेले ऐंशी टक्के हिंदू खेड्यात राहतात. त्यांची संख्या चाळीस कोटी होते. त्यापैकी शेकडा एक व्यक्ती म्हणजे ती संख्या ४० लाख होते. याप्रमाणे तीस लाख शहरात राहणारे व ४० लाख खेड्यात राहणारे मिळून सत्तर लाख हिंदू व्यक्ती स्वतःचे जीवन त्यागमय, शिस्तबद्ध, देशप्रेमाने युक्त व निःस्वार्थी असे व्यतीत करू लागल्यास त्यांच्या प्रभावामुळे संपूर्ण हिंदूसमाज आदर्श जीवनाच्या दिशेकडे वळू शकेल असा हिशोब तयार होतो.

अर्थात् नुसत्या हिशोबाने होण्याइतके हे काम सोपे नाही.

१९२५ सालात रा. स्व. संघाची स्थापना झाली. त्यापूर्वी कित्येक वर्षापासून खऱ्या देशभक्तांच्या मनात हिंदूसमाजाच्या सुधारणेचा विचार घोळत होताच. स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, डॉ. मुंजे आदि पुरुषांनी हिंदू समाजातील सुजाण व्यक्तींनी संघटित व्हावे असे विचार मांडून तशा संस्था व कार्यक्रम निर्माण केले होते. परंतु केवळ हिंदू संघटणा हेच एकमेव कार्य करण्याचा संकल्प करून डॉ. हेडगेवारांनी सुरू केलेला उपक्रम अखंडपणे चालत राहिला व तो प्रगती करीत गेला. संघाने ४०–४२ वर्षे सतत कार्य केल्यामुळे भारताच्या सर्व विभागात हिंदूंच्या चारित्र्यनिर्मितीचे कार्य पसरू शकले. मात्र त्या कार्याचा प्रभाव अगदीच मर्यादित स्वरूपात दिसून येत आहे. कारण संघाच्या संस्थापकांनी शेकडा तीन व शेकडा एक या प्रमाणातील संस्कारित व्यक्तींची जी किमान अपेक्षा व्यक्त केली होती, ती हिंदू समाजातून पूर्ण होऊ शकलेली नाही. चाळीस वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतर सर्व देशांत साधारणत: १५ लाख हिंदू व्यक्तीपर्यंत संघाने अपेक्षिलेले संस्कार पोहोचविता आले. त्याचा अर्थ अद्यापी पांचपटीने हे कार्य वाढविणे आवश्यक आहे. पंधरा लाख व्यक्तीपर्यंत संस्काराचे लोण पोहोचविण्यासाठी रा. स्व. संघाला निःस्वार्थी प्रचारकांची प्रचंड यंत्रणा उभारावी लागली. सुमारे पांचहजार तरुणांनी आपल्या आयुष्यातील कांही वर्षे व पांचशे कार्यकर्त्यांनी संपूर्ण आयुष्य या कार्याला वाहिले, तेव्हा कोठे पंधरा लाख संस्कारित व्यक्तींना समाजाभिमुख बनविता आले.

कार्याची वाढ त्रैराशिक पद्धतीने कधीच होत नसते. सुरुवातीस १०–१२ वर्षे संघकार्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेर फारसा झाला नाही. १९३६ नंतर देशाच्या विविध प्रांतात कार्यकर्ते पाठविण्यांत आले व पुढील दहा वर्षांत सर्व देशभर कार्याचा विस्तार थोड्या फार प्रमाणात झाला. म्हणजे पहिल्या २० वर्षांत संस्कारित स्वयंसेवकांची संख्या लाख दीड लाखाच्या पुढे जाऊ शकली नाही.

१९४८ मध्ये कांहीकाळ संघकार्यावर बंदी घालण्यात आली. संघाच्या कार्याविषयी गैरसमज पसरविले गेल्याने सुमारे दहा वर्षे कार्यवाढीला मोठाच अडथळा आला. महत्प्रयासाने एकादे सुंदर मंदीर उभे करावे आणि अचानक भूकंपाचा धक्का बसून त्याचे बांधकाम विस्कळित व्हावे तसे संघाच्या उभारलेल्या कामाचे झाले. त्यामुळे १९४८ ते १९६० हा सुमारे बारा वर्षांचा काळ विस्कळित झालेले काम पुन्हा ठीक करण्यात घालवावा लागला. तरीही संघसंस्काराचे लोण सुमारे पांच लाख व्यक्तींपर्यंत पोहोचू शकले.

मध्यंतरीच्या काळात संस्कारित व्यक्तींच्या कुटुंबातील नवी पिढी उदयास येत होतीच. त्यामुळे जुनी पिढी व नवोदित पिढीतील तरूण स्वयसेवक यांच्या संयुक्त प्रयत्नाने कामाची गती वाढून चाळीस वर्षात १५ लाखाचे आसपास हिंदूव्यक्ती समाजाभिमुख बनू शकल्या. केवळ रा. स्व संघातच अशा समाजाभिमुख व्यक्ती आहेत असे नाही. संघाशिवाय इतर संस्थांतून, तसेच काही स्वतंत्रपणे काम करणाऱ्या व्यक्तींकडूनहि हिंदूंचे जीवन सुधारण्याचे काम चालू असतेच. उदा. आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, भारत सेवाश्रम संघ, मसुराश्रम, नायर सर्व्हिस सोसायटी, आदिमजाति सेवा संघ, हरिजन सेवक संघ, सर्वोदय मंडळ अशा कितीतरी संस्था हे काम आपापल्या परीने करीतच आहेत. तसेच अनाथाश्रम, विधवा व परित्यक्ता यांचेसाठी संस्था, कुष्टरोग निवारण संस्था, अपंग सेवा संस्था अशा संस्थाहि कार्यरत आहेतच. परंतु या सर्व संस्थांच्या तुलनेने संघाचे काम पुष्कळच मोठे, विस्तृत क्षेत्रात पसरलेले असल्याने व संपूर्ण हिंदूजीवनव्यापी असल्याने त्याचा उल्लेख थोडा विस्ताराने केला आहे.

वस्तुत: उत्तम चारित्र्याचे, परिश्रमी, त्यागी, शिस्तशीर व देशप्रेमी नागरिक निर्माण करण्याचे काम शाळा, महाविद्यालयें, विद्यापीठे यांतून व्हयवयास पाहिजे. परंतु शिक्षणाची ध्येयवादी रचना आपल्या देशात नाही. सरकारी यत्रणेत पोलीस, लष्कर,

१९२५ सालात रा. स्व. संघाची स्थापना झाली. त्यापूर्वी कित्येक वर्षांपासून खऱ्या देशभक्तांच्या मनात हिंदुसमाजाच्या सुधारणेचा विचार घोळत होताच. स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, डॉ. मुंजे आदि पुरुषांनी हिंदू समाजातील सुजाण व्यक्तींनी संघटित व्हावे असे विचार मांडून तशा संस्था व कार्यक्रम निर्माण केले होते. परंतु केवळ हिंदू संघटणा हेच एकमेव कार्य करण्याचा संकल्प करून डॉ. हेडगेवारांनी सुरू केलेला उपक्रम अखंडपणे चालत राहिला व तो प्रगती करीत गेला. संघाने ४०-४२ वर्षे सतत कार्य केल्यामुळे भारताच्या सर्व विभागात हिंदूंच्या चारित्र्यनिर्मितीचे कार्य पसरू शकले. मात्र त्या कार्याचा प्रभाव अगदीच मर्यादित स्वरूपात दिसून येत आहे. कारण संघाच्या संस्थापकांनी शेकडा तीन व शेकडा एक या प्रमाणातील संस्कारित व्यक्तींची जी किमान अपेक्षा व्यक्त केली होती, ती हिंदू समाजातून पूर्ण होऊ शकलेली नाही. चाळीस वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतर सर्व देशांत साधारणतः १५ लाख हिंदू व्यक्तीपर्यंत संघाने अपेक्षिलेले संस्कार पोहोचविता आले. त्याचा अर्थ अद्यापी पांचपटीने हे कार्य वाढविणे आवश्यक आहे. पंधरा लाख व्यक्तीपर्यंत संस्काराचे लोण पोहोचविण्यासाठी रा. स्व. संघाला निःस्वार्थी प्रचारकांची प्रचंड यंत्रणा उभारावी लागली. सुमारे पांचहजार तरुणांनी आपल्या आयुष्यातील कांही वर्षे व पांचशे कार्यकर्त्यांनी संपूर्ण आयुष्य या कार्याला वाहिले, तेव्हा कोठे पंधरा लाख संस्कारित व्यक्तींना समाजाभिमुख बनविता आले.

कार्याची वाढ त्रैराशिक पद्धतीने कधीच होत नसते. सुरुवातीस १०-१२ वर्षे संघकार्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेर फारसा झाला नाही. १९३६ नंतर देशाच्या विविध प्रांतात कार्यकर्ते पाठविण्यांत आले व पुढील दहा वर्षांत सर्व देशभर कार्याचा विस्तार थोड्या फार प्रमाणात झाला. म्हणजे पहिल्या २० वर्षांत संस्कारित स्वयंसेवकांची संख्या लाख दीड लाखाच्या पुढे जाऊ शकली नाही.

१९४८ मध्ये कांहीकाळ संघकार्यावर बंदी घालण्यात आली. संघाच्या कार्याविषयी गैरसमज पसरविले गेल्याने सुमारे दहा वर्षे कार्यवाढीला मोठाच अडथळा आला. महत्प्रयासाने एकादे सुंदर मंदीर उभे करावे आणि अचानक भूकंपाचा धक्का बसून त्याचे बांधकाम विस्कळित व्हावे तसे संघाच्या उभारलेल्या कामाचे झाले. त्यामुळे १९४८ ते १९६० हा सुमारे बारा वर्षाचा काळ विस्कळित झालेले काम पुन्हा ठीक करण्यात घालवावा लागला. तरीही संघसंस्काराचे लोण सुमारे पांच लाख व्यक्तींपर्यंत पोहोचू शकले.

मध्यंतरीच्या काळात संस्कारित व्यक्तींच्या कुटुंबातील नवी पिढी उदयास येत होतीच. त्यामुळे जुनी पिढी व नवोदित पिढीतील तरूण स्वयसेवक यांच्या संयुक्त प्रयत्नाने कामाची गती वाढून चाळीस वर्षात १५ लाखाचे आसपास हिंदूव्यक्ती समाजाभिमुख बनू शकल्या. केवळ रा. स्व संघातच अशा समाजाभिमुख व्यक्ती आहेत असे नाही. संघाशिवाय इतर संस्थांतून, तसेच काही स्वतंत्रपणे काम करणाऱ्या व्यक्तींकडूनहि हिंदूंचे जीवन सुधारण्याचे काम चालू असतेच. उदा. आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, भारत सेवाश्रम संघ, मसुराश्रम, नायर सर्व्हिस सोसायटी, आदिमजाति सेवा संघ, हरिजन सेवक संघ, सर्वोदय मंडळ अशा कितीतरी संस्था हे काम आपापल्या परीने करीतच आहेत. तसेच अनाथाश्रम, विधवा व परित्यक्ता यांचेसाठी संस्था, कुष्टरोग निवारण संस्था, अपंग सेवा संस्था अशा संस्थाहि कार्यरत आहेतच. परंतु या सर्व संस्थांच्या तुलनेने संघाचे काम पुष्कळच मोठे, विस्तृत क्षेत्रात पसरलेले असल्याने व संपूर्ण हिंदुजीवनव्यापी असल्याने त्याचा उल्लेख थोडा विस्ताराने केला आहे.

वस्तुतः उत्तम चारित्र्याचे, परिश्रमी, त्यागी, शिस्तशीर व देशप्रेमी नागरिक निर्माण करण्याचे काम शाळा, महाविद्यालयें, विद्यापीठे यांतून व्हावयास पाहिजे. परंतु शिक्षणाची ध्येयवादी रचना आपल्या देशात नाही. सरकारी यंत्रणेत पोलीस, लष्कर,

वाहतूक, बांधकाम, महसूल इत्यादि विविध खाती असतात तसेच शिक्षण खाते, नावाचे एक खाते आपल्या देशात असते. लाचलुचपत, नोकरशाही, वशिलेबाजी, उधळपट्टी, खोटेपणा हे जे सरकारी यंत्रणेचे दुर्गुण इतर खात्यात असतात, ते सर्व भारताच्या शिक्षण खात्यात आहेत. त्यामुळे असल्या किडक्या यंत्रणेमार्फत चारित्र्य निर्मितीचेकाम होणे शक्य नाही.

अक्षरज्ञान देणे, पोट भरण्याच्या काही कला शिकवणे असे मनुष्य सुधारण्याच्या विद्येपैकी कांही शिक्षण, सरकारी शिक्षणखात्या-मार्फत होत असते. उद्योगव्यवसाय चालण्यासाठी ते शिक्षण उपयोगी पडते. पण व्यक्तींच्या अंतरंगाला उजळा देण्याची क्षमता त्या शिक्षणात नाही. पुस्तकी शिक्षणाने किंवा तांत्रिक पद्धतीच्या शिक्षण-क्रमाने मनोरचनेत बदल घडविण्याचे काम काही एका प्रमाणापर्यंतच साध्य होऊ शकते. लष्करी शिक्षणक्रमाच्या शाळा किंवा शरीर श्रौष्ठवासाठी निर्माण केलेल्या व्यायामशाळा यांचेमार्फत होणारे शिस्तीचे व बळसंवर्धनाचे उपाय हे सुद्धा व्यक्तींचे जीवन समाजा-प्रमुख बनविण्यास अपुरे पडतात. एन् सी. सी., स्काउट संस्था, रोटरी क्लब अशा संस्थांचे कार्यामागे असणारे उद्देश उदात्त असूनहि समाजासाठी सर्वस्वार्पण करण्याची प्रेरणा त्या सस्थांमधून निर्माण करता येऊ शकत नाहीं. बाजारात विक्रीसाठी ठेवलेल्या लाकडांच्या किंवा प्लॅस्टिकच्या फळाला खऱ्या फळासारखा रंग वा आकार दिलेला असतो. परंतु निसर्गात उत्पन्न होणाऱ्या फळाचा स्वाद या फळांना असणे शक्य नसते. चारित्र्य निर्मितीचे व समाजाभिमुख स्वभाव निर्मितीचे कार्य करण्यासाठी नैसर्गिक जिव्हाळा असावा लागतो. दुसऱ्याचे जीवन सुखी करण्यासाठी स्वतःच्या जीवनाला मुरड कशी घालावी, याचा आदर्श प्रत्यक्ष व्यवहारातून उभा करावा लागतो. संघकार्याचा भर अशा व्यवहारावर आहे.

संघाने हाती घेतलेल्या कामाविषयी अनेक तर्कवितर्क अज्ञानाने वा हेतुतः पसरविण्यात आले. अद्यापहि त्या कार्याला लाभावे

११८८५ ५२३ ग्रंथालय १०१ २.२.'७०

तसे सहकार्य हिंदूसमाजातून लाभू शकत नाही. परंतु ते कार्य इतकें मूलगामी आणि आवश्यक आहे कीं कशाही परिस्थितीला तोंड देऊन ते चालू ठेवले पाहिजे. कार्याची वाढ वा घट ही अनेक वेळा परिस्थितीच्या अनुकूलतेवर किंवा प्रतिकूलतेवर अवलंबून असते. पण कार्याची आवश्यकता ( अस्तित्व ) मात्र परिस्थिति-निरपेक्ष आहे. कितीही कालावधी लागला तरी ते पूर्ण होण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. सुमारे दोन पिढ्या प्रयत्न करून मोठा टप्पा गाठण्यात संघाला यश मिळाले आहे. पुढच्या पिढीने अधिक नेट धरून ते कार्य पुढे रेटलें पाहिजे. हिंदू समाज सर्वांगांनी सुदृढ होण्यासाठी तोच सर्वश्रेष्ठ उपाय आहे.

हिंदूसमाज सर्वांगांनी सुदृढ करावयाचा, म्हणजे त्याची शारीरिक, मानसिक, बौद्धिक, अध्यात्मिक, कलात्मक अशी सर्व दृष्टीने प्रगती घडवून आणावयाची. तसेच दारिद्र्यामुळे, अज्ञानामुळे, विषमतेमुळे, जातिभेदामुळे, दुष्ट रूढीमुळे, अंधश्रद्धेमुळे हिंदूसमाजाची होणारी हानी सर्व समाजघटकांचे नजरेस आणून द्यावयाची. समाजातील दलितवर्ग, वनवासी लोक, भटक्याजमाती यांना समाजातील इतर घटकाबरोबर आणून स्वावलंबी बनवावयाचे. अनाथ, अपंग, परित्यक्ता, वाट चुकलेल्या स्त्रिया, विधवा किंवा निराधार स्त्रिया यांचे संगोपन, संवर्धन करावयाचे. कुष्ट रोग्यांसाठी वसाहती व आरोग्य केंद्रे स्थापावयाची, भिक्षेवर जगण्याची प्रवृत्ती नष्ट करावयाची.

धार्मिक क्षेत्रात घुसलेली ढोंगबाजी नष्ट करून मंदिरे, देवस्थाने, आखाडे, मठ यातून सद्धर्माचा प्रसार व्हावा असा प्रयत्न करावयाचा. उत्सव, यात्रा, नामसप्ताह यांचेत शिस्त, व्यवस्था, स्वच्छता, सद् अभिरूची निर्माण करावयाची. पाठशाळा स्थापन करून भारतीय तत्वज्ञानाचा प्रचार करणारी केंद्रे स्थापावयाची. सेवाभावी धर्मप्रचारकांच्या योगक्षेमाची व्यवस्था धार्मिक उत्पन्नातून करावयाची.

भौतिक शास्त्रांचे ज्ञान वाढवून समाजाला विज्ञानाभिमुख करावयाचा. समृद्ध जीवन जगण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण करावयाची. उद्योगशीलता, एकतानता, चिकाटी, प्रामाणिकता, सहकार्य यांचे महत्त्व समाजाला पटवून द्यावयाचे. आळस, ऐतखाऊपण फुकटेपणा, लुबाडणूक याविषयी घृणा उत्पन्न करावयाची.

जगातील अन्य देशांच्या जीवनपद्धतींचा अभ्यास करून आपणाला इष्ट त्या बावींचा स्वीकार करावयाचा. त्याच बरोबर भारताच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचा प्रभाव जगातील सर्व राष्ट्रात निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा समाजात निर्माण करावयाची. भारतीय संस्कृतीच्या उदात्त विचारांचे सात्त्विक आक्रमण सुरू करून, भारतीय संस्कृतीचा झेंडा अभिमानाने घेऊन मिरविणारे लोक त्या त्या देशातील लोकांमधून निर्माण करावयाचे. हिंदुसमाज अंतर्बाह्य तेजस्वी बनवून संपूर्ण जगाचे गुरुस्थान त्याला पुन्हा प्राप्त करून द्यावयाचे. असा संकल्प करून अविरत कार्य करीत राहणे हाच यापुढे हिंदुसमाजाच्या, भारताच्या आणि विश्वाच्या कल्याणाचा एकमेव मार्ग आहे.

10002

फाल्गुन व. २ शके १८९३
तुकाराम बीज, गुरुवार
२-३-१९७२

# परिशिष्ट

## जगातील देश
## आणि
## त्यांची लोकसंख्या

( १९६१ च्या शिरगणतीनुसार )

# आशिया खंड

| क्र. | देश | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी | लक्ष | हजार |
| १ | एडन | ० | १० | ० |
| २ | अफगाणिस्तान | १ | ४६ | ८४ |
| ३ | बहारीन | ० | -१ | ५६ |
| ४ | ब्रुनेई | ० | ०० | ९० |
| ५ | ब्रह्मदेश | ० | २१ | ८३ |
| ६ | कंबोडिया | ० | ५३ | ३५ |
| ७ | श्रीलंका | १ | ०६ | ४५ |
| ८ | चीन | ६७ | ०० | ०० |
| ९ | तैवान | ०१ | ०० | ०० |
| १० | हाँगकाँग | ०० | ३२ | २३ |
| ११ | सायप्रस | ०० | ०५ | ८१ |
| १२ | भारत | ४४ | ९३ | ८१ |
| १३ | इंडोनेशिया | ०९ | ८६ | १५ |
| १४ | इराण | ०२ | १२ | २७ |
| १५ | इराक | ०० | ६७ | ३२ |
| १६ | इस्रायल | ०० | २२ | ९२ |
| १७ | जपान | ०९ | ५३ | ०० |
| १८ | जॉर्डन | ०० | १७ | २७ |
| १९ | कोरिया उत्तर | ०३ | ६६ | ०० |

| क्र. | देश | लोकसंख्या कोटी | लोकसंख्या लक्ष | लोकसंख्या हजार |
|---|---|---|---|---|
| २० | कोरिया दक्षिण | ०१ | ०५ | ०० |
| २१ | कुवेत | ०० | ०३ | २१ |
| २२ | लाओस | ०० | १८ | ८२ |
| २३ | लेबेनॉन | ०० | १७ | ६० |
| २४ | मलेशिया | ०१ | ०३ | ६४ |
| २५ | मंगोलिया | ०० | ०९ | ९८ |
| २६ | नेपाळ | ०० | ९५ | ५० |
| २७ | पाकिस्तान | ०३ | ६५ | ५८ |
| २८ | फिलिपाइन्स | ०२ | ९२ | ५७ |
| २९ | सौदी अरेबिया | ०० | ६४ | ०० |
| ३० | सीरिया | ०० | ५० | ०० |
| ३१ | थायलंड ( सयाम ) | ०२ | ७९ | ९५ |
| ३२ | तुर्कस्थान ( आशिया ) | ०२ | ६६ | ६० |
| | ( युरोप ) | ०० | २३ | ९३ |
| ३३ | व्हिएटनाम उत्तर | ०१ | ७२ | ०० |
| ३४ | दक्षिण | ०३ | ४९ | ६९ |
| ३५ | येमेन | ०० | ५० | ०० |
| ३६ | रशिया ( आशिया ) | ०५ | २० | ०० |
| | ( युरोप ) | १७ | ३० | ०० |
| ३७ | बांगलादेश | ०६ | ५० | ०० |

# आफ्रिका खंड

| क्र. | देश | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी | लक्ष | हजार |
| १ | अंगोला | ०० | ४९ | ३६ |
| २ | अल्जीरिया | ०१ | १३ | ०० |
| ३ | बासुटोलँड | ०० | ०७ | १३ |
| ४ | बेचुआनालँड | ०० | ०३ | ३५ |
| ५ | बुरुंडी | ०० | २२ | १३ |
| ६ | कॅमेरुन | ०० | ४३ | २६ |
| ७ | कॅनरी बेटे | ०० | ०९ | १० |
| ८ | केप व्हर्डे बेटे | ०० | ०२ | ११ |
| ९ | मध्य आफ्रिका | ०० | १२ | ५० |
| १० | छाद | ०० | २७ | २० |
| ११ | कांगो | ०१ | ४७ | ९७ |
| १२ | कांगो | ०० | ०८ | २० |
| १३ | दहोमी | ०० | २२ | ०० |
| १४ | इथिओपिया | ०२ | १० | ०० |
| १५ | गॅबॉन | ०० | ०४ | ५३ |
| १६ | गॅबिया | ०० | ०२ | ६९ |
| १७ | घाना | ०० | ७१ | ४८ |
| १८ | गिनि | ०० | ३२ | ५९ |
| १९ | पोर्तु. गिनिया | ०० | ०५ | ४९ |
| २० | स्पॅनि. गिनिया | ०० | ०२ | ५३ |

| क्र. | देश | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी | लक्ष | हजार |
| २२ | आयव्हरी कोस्ट | ०० | ३३ | ७५ |
| २३ | केनिया | ०० | ८५ | ९५ |
| २४ | लायबेरिया | ०० | १२ | ५० |
| २५ | लिबिया | ०० | १२ | ४४ |
| २६ | मालागासी | ०० | ५७ | ३० |
| २७ | मालावी | ०० | २९ | ५० |
| २८ | माली | ०० | ४३ | ०५ |
| २९ | मॉरिटानिया | ०० | ०७ | ७० |
| ३० | मोरोक्को | ०१ | २३ | ६० |
| ३१ | मोझांबिक | ०० | ६७ | ५० |
| ३२ | नायगर | ०० | २९ | ९५ |
| ३३ | नायजीरिया | ०५ | ५६ | ५४ |
| ३४ | रुनिऑन | ०० | ०३ | ५६ |
| ३५ | ऱ्होडेशिया | ०० | ३८ | ८० |
| ३६ | रुआंडा | ०० | २७ | ८० |
| ३७ | सेंट हेलेना | ०० | ०० | ०५ |
| ३८ | सेनेगल | ०० | ३२ | ८० |
| ३९ | सेचेलेबेटे | ०० | ०० | ४३ |
| ४० | सिएरालिओने | ०० | २४ | ५० |
| ४१ | सोमालिया | ०० | २२ | ५० |
| ४२ | सोमालीलँड फ्रेंच | ०० | ०० | ६९ |
| ४३ | दक्षिण आफ्रिका | ०१ | ६६ | ४० |

| क्र. | देश | लोकसंख्या कोटी | लक्ष | हजार |
|---|---|---|---|---|
| ४४ | सहारा | ०० | ०० | २४ |
| ४५ | सूदान | ०१ | २४ | ७० |
| ४६ | स्वाझीलँड | ०० | ०२ | ७५ |
| ४७ | टांगानिका झांझिबार | ०० | ९७ | ११ |
| ४८ | टोगो | ०० | १५ | २३ |
| ४९ | ट्यूनीशिया | ०० | ४२ | ९० |
| ५० | युगांडा | ०० | ७० | १६ |
| ५१ | ईजिप्त ( यू. ए. आर. ) | ०२ | ७२ | ८५ |
| ५२ | व्होल्टाइक | ०० | ४५ | ०० |
| ५३ | झांबिया | ०० | ३४ | ०० |

## – ऑस्ट्रेलिया खंड –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | आस्ट्रेलिया | ०१ | १० | ०० |
| २ | पापूआ, न्यूगिनी | ०० | २० | २५ |
| ३ | फीजी बेटे | ०० | ०४ | २१ |
| ४ | न्यूझिलंड | ०० | २४ | ८५ |
| ५ | पश्चिम समोआ | ०० | ०१ | १६ |

## – युरोप खंड –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अल्बानिया | ०० | १७ | ११ |
| २ | अंदोरा | ०० | ०० | ०८ |
| ३ | ऑस्ट्रिया | ०० | ७१ | २८ |

| क्र. | देश | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी | लक्ष | हजार |
| ४ | बेल्जम | ०० | ९२ | २१ |
| ५ | बल्गेरिया | ०० | ८० | १३ |
| ६ | झेकोस्लोव्हाकिया | ०१ | ३८ | ५६ |
| ७ | डेन्मार्क | ०० | ४६ | ५४ |
| ८ | फिनलँड | ०० | ४५ | ०५ |
| ९ | फ्रान्स | ०४ | ८० | ९० |
| १० | जर्मनी पूर्व | ०१ | ६० | ४४ |
| ११ | जर्मनी पश्चिम | ०५ | ४७ | ६७ |
| १२ | बर्लिन | ०० | ३२ | ३८ |
| १३ | जिब्राल्टर | ०० | ०० | २४ |
| १४ | ग्रीस | ०० | ८४ | ५१ |
| १५ | हंगेरी | ०१ | ०० | ६१ |
| १६ | आरसलँड | ०० | ०१ | ८२ |
| १७ | आयर्लंड | ०० | २८ | २४ |
| १८ | इटली | ०५ | ०१ | ७० |
| १९ | लक्झेंबर्ग | ०० | ०३ | २२ |
| २० | माल्टा | ०० | ०३ | २९ |
| २१ | नेदर्लंड | ०१ | १७ | ९७ |
| २२ | नॉर्वे | ०० | ३६ | ५५ |
| २३ | पोलंड | ०३ | ०३ | २४ |
| २४ | पोर्तुगाल | ०० | ८९ | ७१ |
| २५ | अझोरेस | ०० | ०५ | ९० |

| क्र. | देश | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी | लक्ष | हजार |
| २६ | रूमानिया | ०१ | ८६ | ८१ |
| २७ | स्पेन | ०३ | ०८ | १७ |
| २८ | स्वीडन | ०० | ७५ | ६२ |
| २९ | स्विट्झरलंड | ०० | ५६ | ६० |
| ३० | इंग्लंड | ०५ | ३४ | ४१ |
| ३१ | युगोस्लाव्हिया | ०१ | ८८ | ३७ |
| ३२ | लिस्टटीन | ०० | ०० | १६ |

रशिया व तुर्कस्थान हे देश आशिया व युरोपमध्यें विभागून आहेत. ( आशिया पहा )

## —अमेरिका खंड (उत्तर)—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | बहामा बेटे | ०० | ०१ | ११ |
| २ | बर्मुडा | ०० | ०० | ४६ |
| ३ | कॅनडा | ०१ | ८६ | ०० |
| ४ | कोस्टारिका | ०० | १२ | ७४ |
| ५ | क्युबा | ०० | ७० | ६८ |
| ६ | डोमिनि. रिप. | ०० | ३२ | २० |
| ७ | ग्वाटेमाला | ०० | ४० | १७ |
| ८ | हैती | ०० | ४३ | ४६ |

# – अमेरिका ( उत्तर - मध्य ) –

| क्र. | देश | लोकसंख्या कोटी | लक्ष | हजार |
|---|---|---|---|---|
| ९ | होंडुरास | ०० | १९ | ५० |
| १० | ब्रि. होंडुरास | ०० | ०० | ९६ |
| ११ | जमेका | ०० | १६ | ४१ |
| १२ | मार्टेनिक | ०० | ०२ | ९७ |
| १३ | मेक्सिको | ०५ | ७२ | ३३ |
| १४ | अँटीलस नेदरलंड | ०० | ०३ | ९५ |
| १५ | निगारॅग्वे | ०० | १५ | ७८ |
| १६ | पनामा | ०० | ११ | ४६ |
| १७ | पनामा कालवा | ०० | ०० | ४५ |
| १८ | पोर्टोरिका | ०० | २४ | ६० |
| १९ | सॅल्व्हाडोर | ०० | २६ | २७ |
| २० | त्रिनिदाद टोबॅगो | ०० | ०८ | २८ |
| २१ | अमेरिका | १८ | ६५ | ९१ |
| २२ | वेस्टइंडीज | ०० | ०६ | ८३ |
| २३ | ग्वाडेलूप | ०० | ०२ | ८९ |

# – दक्षिण अमेरिका –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | अर्जेंटिना | ०२ | १४ | १८ |
| २५ | बोलीव्हिया | ०० | ३९ | ९० |

| क्र. | देश | लोकसंख्या कोटी | लोकसंख्या लक्ष | लोकसंख्या हजार |
|---|---|---|---|---|
| २६ | ब्राझील | ०७ | ५२ | ७१ |
| २७ | चिली | ०० | ८० | ०१ |
| २८ | कोलोंबिया | ०१ | ४७ | ६९ |
| २९ | इक्वेडोर | ०० | ४५ | १६ |
| ३० | गियाना ब्रि. | ०० | ०५ | ९८ |
| ३१ | गियाना फ्रें. | ०० | ०० | ३४ |
| ३२ | पेराग्वे | ०० | १८ | ५७ |
| ३३ | पेरू | ०१ | १५ | ११ |
| ३४ | सुरिनाम | ०० | ०३ | ०७ |
| ३५ | उरुग्वे | ०० | २९ | १४ |
| ३६ | व्हेनेझुएला | ०० | ७८ | ७२ |
| ३७ | फल्क लॅंड बेटे | ०० | ०० | ०३ |

REFBK-0019002

* * * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.. दि:
नोंः दि 2.2.63